


# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

e paper www.janmadhyam.com

■ अमरावती, ■ रविवार ११ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०+ ४


# १२ ऑक्टोबरला ‘इंडिया’ आघाडीचे भव्य आंदोलन

## राहुल गांधी स्वतः करत आहेत नेत्यांना फोन




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-:** कॉकरोच जनता पक्षाच्या (ण्व्ङ) आंदोलनानंतर आता 'इंडिया' आघाडी सरकारची डोकेदुखी वाढवण्यासाठी सज्ज झाली आहे. १२ ऑक्टोबर रोजी जंतरमंतर येथे मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करत 'इंडिया' आघाडी आंदोलन करणार आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्वतः विरोधी पक्षांच्या नेत्यांना फोन करून या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. तसेच, सोमवारीच इंडिया आघाडीचे नेते सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांचीही भेट घेणार आहेत.

काँग्रेसचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी शनिवारी सांगितले की, जनतेच्या मतदानाच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी सुरू असलेल्या लढ्याचा भाग म्हणून 'इंडिया' आघाडी सोमवारी दिल्लीत मोठे आंदोलन करणार आहे. यापूर्वी, इंडिया आघाडीच्या नेत्यांनी शुक्रवारी राष्ट्रपती मुर्मू यांची भेट घेऊन 'मत चोरी'संदर्भात एक निवेदन दिले होते. यामध्ये मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची आणि गेल्या दोन वर्षांत झालेल्या सर्व विधानसभा निवडणुका रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांना आजीवन संरक्षण देणारा २०२३ चा कायदा रद्द करण्याची मागणीही विरोधकांनी केली आहे. राष्ट्रपतींनी निवडणुकीतील मत चोरीच्या आरोपांचे खंडन केले नाही, याचे आपल्याला आश्चर्य वाटले, असे विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले.

**सरन्यायाधीशांची भेट घेणार विरोधक** -राहुल गांधी म्हणाले की, विरोधी पक्षांचे नेते सोमवारी सर्वोच्च न्यायालयात जाऊन सरन्यायाधीशांची भेट घेतील आणि त्यांनाही निवेदन देतील, कारण ते उपलब्ध असलेल्या सर्व पर्यायांचा वापर करू इच्छितात.

**१२४ माजी सनदी अधिकाऱ्यांचे पत्र-** देशातील १२४ माजी सनदी अधिकाऱ्यांनी एक खुले पत्र लिहून निवडणूक आयोग आणि निवडणूक प्रक्रियेचे समर्थन केले आहे, तसेच मत गैरव्यवहाराचे आरोप फेटाळून लावले आहेत. त्यांनी सध्याची व्यवस्था पूर्णपणे सुरक्षित असल्याचे म्हटले आहे. बूथ कॅप्चरिंग, बॅलेट बॉक्समध्ये बनावट मते भरणे आणि निवडणुकीतील हिंसेच्या काळापासून भारतामध्ये झालेल्या बदलांचा उल्लेख करत अधिकाऱ्यांनी या खुल्या पत्रात म्हटले आहे की, आजच्या निवडणूक व्यवस्थेत अनेक स्तरांवर तपासणी आणि सुरक्षा उपाय उपलब्ध आहेत; ज्यामध्ये पोलिंग एजंट, ईव्हीएम (ङ्न्श्) सीलिंग, ☞(पान २ वर)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवेपर्यंत

# सीजेपी दररोज जंतर मंतरवर मोर्चा काढणार!



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** कॉकरोच जनता पक्षाने (सीजेपी) मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याच्या मागणीसाठी आपले आंदोलन अधिक तीव्र करण्याची घोषणा केली आहे. शनिवारी दिल्लीत आंदोलकांना मोठ्या प्रमाणावर ताब्यात घेण्यात आले असूनही, पक्षाने माघार घेण्यास नकार दिला आहे. सीजेपीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत अजिंक्य शिंदे म्हणाले की, जोपर्यंत ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवले जात नाही, तोपर्यंत दररोज जंतर मंतरवर मोर्चा काढला जाईल.

शनिवारी, जंतर मंतर येथील निदर्शनादरम्यान पोलिसांनी सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके यांच्यासह पक्षाचे अनेक नेते आणि शेकडो आंदोलकांना ताब्यात घेतले. आंदोलकांना वाईट वागणूक दिल्याचा आरोप करत पक्षाच्या नेत्यांनी पोलिसांच्या कारवाईवर टीका केली. ताब्यात घेतलेल्या दीपके यांच्यासह इतर कोणाच्याही ठिकाणाबद्दल आपल्याला कोणतीही माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. पक्षाच्या म्हणण्यानुसार, शनिवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास विमान दिल्लीत उतरल्यानंतर दीपके यांना ताब्यात घेण्यात आले. सीजेपीच्या नेत्यांनी असाही आरोप केला की, दीपके यांना अमानुष वागणूक दिली जात आहे आणि महाराष्ट्रातील त्यांच्या मूळ गावी होणाऱ्या आजीच्या अंत्यविधीला उपस्थित राहू दिले जात नाही. त्यांच्या आजीचे शनिवारी निधन झाले.

दीपके यांच्या अनुपस्थितीत आंदोलनाचे नेतृत्व करणारे सीजेपी नेते ☞(पान २ वर)

# आंदोलकाला ताब्यात घ्यायला गेलेल्या पोलिसांनाच गावकऱ्यांनी घेतले ताब्यात

## रोहतक मधील प्रकार, कॉकरोच पार्टीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर घडली घटना

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** निवडणूक आयोगाचे आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन झाले. या आंदोलनात सहभागी होणाऱ्या एका आंदोलकाला ताब्यात घेण्यासाठी पहाटे पोहोचलेल्या पोलिसांवर स्वतःच अडकून पडण्याची वेळ आल्याची घटना हरियाणामधील दिल्ली सिमेवरील रोहतक जिल्ह्यातील काबुलपूर गावात घडली आहे. जिल्हा परिषद सदस्य जय देव डागर यांना ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या पोलिसांना सुमारे ५०० गावकऱ्यांनी घेराव घालून रोखून धरले.

या बाबत अधिक माहिती अशी की शनिवारी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास शिवाजी कॉलनी पोलीस ठाण्याचे ऑफिसर राकेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील पथक रोहतक जिल्ह्यातील काबुलपूर गावात पोहोचले. दिल्लीतील जंतरमंतर येथे होणाऱ्या आंदोलनात सहभागी होण्यापासून रोखण्यासाठी पोलीस रोहतकमधील जिल्हा परिषद सदस्य जय देव डागर यांच्या घरी त्यांना ताब्यात घेण्यासाठी☞(पान २ वर)



# तुषार गांधी यांना सोडा; संजय राऊत, आदित्य ठाकरे यांचे पोलीस स्टेनशवरच ठिय्या आंदोलन

## सुटकेपर्यंत धरणे सुरू ठेवण्याचा निर्धार



**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पणतू आणि सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी यांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या नेत्यांनी अंधेरीतील डी. एन. नगर पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलन सुरू केले. तुषार गांधी यांची सुटका होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली. या आंदोलनामुळे डी. एन. नगर पोलीस ठाण्याबाहेर राजकीय वातावरण तापले असून, महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने गर्दी केली.

उद्धव सेनेचे नेते व खासदार संजय राऊत, आमदार आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे, विधान परिषदेचे आमदार अँड.अनिल परब, आमदार अजय चौधरी, आमदार हारून खान आणि आमदार अनंत(बाळा)नर, आमदार महेश सावंत यांच्यासह काँग्रेसचे मुंबई उपाध्यक्ष मोहसिन हैदर, उत्तर-पश्चिम जिल्हाध्यक्ष भावना जैन तसेच महाविकास आघाडीचे हजारो पदाधिकारी आणि कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले. तुषार गांधी यांची तातडीने सुटका करण्याची मागणी करत आंदोलकांनी पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या मांडला.

महाविकास आघाडीच्या नेत्यांचे आंदोलन लक्षात घेता त्यांना डी. एन. नगर पोलिसांनी दुसरीकडे नेले. त्यामुळे त्यांच्या सुटकेसाठी ☞(पान २ वर)

# राज्यभरात विशेष मतदार नोंदणी शिबीर

## १२ ऑक्टोबरपूर्वी प्रक्रिया पूर्ण करावी: CM फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी :** एकीकडे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी विरोधक आक्रमक झालेले असताना दुसरीकडे राज्यभरात विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन केले जात आहे. ही प्रक्रिया १२ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असून, या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

एक्सवरील एका पोस्टमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लिहिले आहे की, लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यासाठी मतदार यादीत आपले नाव नोंदवलेले असणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सोयीसाठी आज आणि उद्या, १० व ११ ऑक्टोबर रोजी राज्यभर विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

**वैध कागदपत्रे सादर करण्याची सुविधाही उपलब्ध**

प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांनी नमुना-६ भरून नोंदणीसाठी अर्ज करावा. एईं प्रक्रियेत नोटीस प्राप्त झालेल्या संबंधित मतदारांना आवश्यकतेनुसार पर्यायी वैध कागदपत्रे सादर करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. सर्व पात्र नागरिकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा आणि १२ ऑक्टोबरपूर्वी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

दरम्यान, निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार गेल्या दोन महिन्यांपासून राज्यात मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी मोहिम राबविली जात आहे. ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत यापूर्वीच्या मतदार☞(पान २ वर)

# ‘देशाचा कारभार संसदेतून चालतो, रस्त्यांवरून नाही’

## भाजपचा विरोधकांवर हल्लाबोल



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भारताची लोकशाही धोक्यात असल्याचा अपप्रचार (नॅरेटिव्ह) करण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष करत आहे, असा आरोप करत आजच्या आणि मागील तीन दिवसांतील घडामोडींवरून स्पष्ट झाले आहे की, भारतीय लोकशाहीने अराजकता माजवण्याचे प्रयत्न हाणून पाडले आहेत. तसेच देशाचा कारभार संसदेद्वारे चालवला जाईल, रस्त्यांवरील आंदोलनांद्वारे नाही,' असेही स्पष्ट झाले आहे, अशा शब्दांमध्ये भाजपचे प्रवक्ते रविशंकर प्रसाद यांनी आज (दि. १० ऑक्टोबर) 'कॉकरोच जनता पार्टी'च्या (ण्व्ङ) आंदोलनात सहभागी होण्याचा प्रयत्न करणाऱ्या विरोधी पक्षांवर हल्लाबोल केला.

**सर्वोच्च न्यायालयानेही विरोधकांची मागणी फेटाळली**

पत्रकार परिषदेत रविशंकर प्रसाद म्हणाले की, अनेक विरोधी पक्षांनी मतदार याद्यांच्या 'विशेष सखोल पुनरावलोकन' (एईं) प्रक्रियेला आव्हान देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. यात काही बिनमहत्त्वाचे लोकही सामील झाले होते. सर्वोच्च न्यायालयाने या याचिकांवर वारंवार सुनावणी केली. शेवटी काय सांगितले? तर 'एईं प्रक्रिया सुरूच राहील.'☞(पान २ वर)

# निलेगावात पाझर तलावात बुडून दोन सख्ख्या भावांचा मृत्यू



**अणदूर/वृत्तसंस्था- :** तुळजापूर तालुक्यातील निलेगाव शिवारात जनावरांना पाणी पाजण्यासाठी पाझर तलावावर गेलेल्या दोन सख्ख्या भावांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी (दि. १०) सकाळी घडली. अजय संतोष राठोड (वय १२) आणि रोहन संतोष राठोड (वय ११) अशी मृत मुलांची नावे आहेत. खेळण्या-बागडण्याच्या वयात दोन चिमुकल्या भावांचा दुर्दैवी अंत झाल्याने निलेगावसह परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अजय आणि रोहन हे दोघे भाऊ जनावरांना पाणी पाजण्यासाठी निलेगाव शिवारातील पाझर तलावावर गेले होते. मात्र, बराच वेळ उलटूनही दोघे घरी परतले नाहीत. त्यामुळे त्यांचे वडील संतोष राठोड यांनी तलावाच्या दिशेने जाऊन मुलांचा शोध घेतला. त्यावेळी तलावाच्या काठावर मुलांचे कपडे आणि चप्पल आढळून आल्याने त्यांना अनर्थाची शंका आली.

यानंतर तलावात शोधमोहीम राबविण्यात आली. दोन्ही मुलांना पाण्याबाहेर काढून तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेने राठोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावात हळहळ व्यक्त होत आहे.☞(पान २ वर)

# १३.५ टन बारूदचा कंटेनर ट्रेलरपासून निखळला

## महामार्गावर अनर्थ टळला !



**नागपूर/प्रतिनिधी :** हिंगणा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील धामणा शिवारात शुक्रवारी (दि. ९ ऑक्टोबर) रात्री ८ वाजताच्या सुमारास एक भीषण घटना घडली. तब्बल १३.५ टन बारूद भरून असलेला कंटेनर घेऊन जात असलेला ट्रेलर चालकाचा ताबा सुटल्याने दुभाजकावर धडकला आणि रोडवर उलटला. ट्रेलर उलटताच कंटेनर ट्रेलरपासून वेगळा झाला आणि रोडवर पडला. सुदैवाने आतील बारूद बाहेर आली नाही. यात ट्रेलर चालकास दुखापत झाली. रोशन धर्मराज हरिजन (३३, रा. उजगाव, जौतपूर, उत्तर प्रदेश) असे जखमी ट्रेलर चालकाचे नाव आहे. तो एपी-३९/डब्ल्यूक्यू-३३२८ ☞(पान २ वर)










जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अंजनगावात दुर्गा व शारदा देवी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक

## पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करण्याचे आवाहन

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः**-आगामी दुर्गा आणि शारदा देवी उत्सवाच्या अनुषंगाने आज, १० ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ ते २.१५ या वेळेत अंजनगाव येथील प्रभा मंगल कार्यालय येथे शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत अमरावती ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांनी उपस्थितांना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

या बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी (अंजनगाव उपविभाग) सुनील हूड, अंजनगाव सुर्जीचे ठाणेदार सुरज बोडे, तहसीलदार पुष्पा सोळंके, राहिमापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रशांत देशमुख आणि पथ्रोट पोलीस स्टेशनचे ठाणेदार अभय चौथनकर प्रामुख्याने उपस्थित होते.

तसेच अंजनगाव उपविभागातील शांतता समिती सदस्य, महिला दक्षता समिती सदस्य, पत्रकार, पोलीस पाटील, विविध दुर्गा व शारदा देवी मंडळांचे पदाधिकारी, साऊंड सिस्टीम व बँड पार्टी व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या संकल्पनेतून



यंदाच्या श्री गणेशोत्सव २०२६ मध्ये अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन हद्दीत 'उत्कृष्ट गणेश मंडळ' उपक्रम राबविण्यात आला होता.

सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या आणि पारंपरिक वाद्यांचा वापर करणाऱ्या उत्कृष्ट मंडळांची निवड करून, या बैठकीत अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या मध्ये प्रथम क्रमांक बालगोपाल गणेश मंडळ, पांढरी खा. तर द्वितीय क्रमांक न्यू विश्व हिंद व्यायाम व क्रीडा गणेश मंडळ, सुर्जी तृतीय क्रमांक (संयुक्तपणे): विदर्भ गणेश मंडळ (शनिवारा, अंजनगाव) आणि ज्वाला गणेश मंडळ (पार्डी, अंजनगाव). बैठकीच्या शेवटी, उपस्थित सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाच्या सर्व सूचनांचे पालन करून आगामी दुर्गा व शारदा उत्सव अत्यंत उत्साहात, आनंदाच्या आणि शांततेच्या वातावरणात साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला.

पोलीस प्रशासनाकडून मंडळांना महत्वाच्या सूचना करण्यात आल्या. उत्सव काळात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने सर्व मंडळांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

### उत्कृष्ट गणेश मंडळांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव

# शिवसेना महिला आघाडीची हिवरखेड येथे पदाधिकारी आढावा बैठक

## शाखा विस्तार व आरोग्य शिबिरावर चर्चा, पक्ष प्रवेश

**हिवरखेड/प्रतिनिधीः**-शिवसेना महिला आघाडी अमरावती जिल्ह्याच्या वतीने मोर्शी विधानसभा मतदारसंघातील हिवरखेड येथे पदाधिकारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत मोर्शी तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील शाखा विषयी सविस्तर माहिती घेण्यात आली तसेच आगामी आरोग्य शिबीर विषयी नियोजनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अनेक महिलांनी शिवसेनेत पक्ष प्रवेश केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख जयश्री प्रशांतराव कातकिडे या होत्या. यावेळी व्यासपीठावर उपजिल्हाप्रमुख लिना अंकुशराव गाडबैल, तालुका प्रमुख योगिता अमोलराव मस्के, विधानसभा



प्रमुख हर्षा विनोदराव गोरडे, तालुका समन्वय दिपीका हरिज नागपुरे, सर्कल प्रमुख संगीता संतोष काठोडे, उपतालुका प्रमुख प्रगती बाबुराव वानखडे प्रामुख्याने उपस्थित होत्या.

तसेच शाखा प्रमुख म्हणून रेखा भोजने, लता नागपुरे (हिवरखेड), लता नरेंद्र ढोरे (अंगणवाडी सेविका), उषा सुरेशराव ढोरे यांनी पक्ष प्रवेश केला. ज्योती राजू शेंडे, सुरेशराव ढेवले (माजी सरपंच मोकलकर ताई हिवरखेड), नरेंद्र ढोरे, सुधीर भोजने, संजय वासनकर, चि. अनुराग नेरकर यांच्यासह वंदना विनोदराव निमकर, ज्योती ढोले, मयुरी धुप, अनुराधा ढोरे, रंजना धोटे, प्रभा दिलीप कवटकर मंगला ठाकरे, हर्षा ठाकरे, रत्नमाला मोकलकर, मंगला पंचधुरे, शोभा माकोडे, जयश्री वेटे, शुभांगी शिरभाते, प्रमिला डाकरे, शिला वामनराव मढके, संगीता मैत्रे, अर्चना म्हस, दुर्गा बोरवाले, सुनितताई, दिपाली वाट, गिरजा नेहारे, प्रतिक्षा भुंते, नुतन काळे (माजी सदस्या), मोकलकरताई, अर्चना खोडसकर, बापू तडम, भाग्यश्री घाटोळे व अन्य असंख्य पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी जिल्हाप्रमुख कातकिडे यांनी महिला संघटन मजबूत करण्यासाठी प्रत्येक गावात शाखा उघडण्याचे आवाहन केले असून, लवकरच मोर्शी तालुक्यात भव्य महिला आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

आहे.

देवी विसर्जनाच्या मिरवणुका, गर्दीची ठिकाणे आणि संवेदनशील परिसरांवर पोलिसांची विशेष नजर राहणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरे आणि ड्रोनच्या मदतीने परिस्थितीवर देखरेख केली जाईल. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी स्वतंत्र २० पोलीस अंमलदार नियुक्त करण्यात आले आहेत.

**आक्षेपार्ह संदेशांवर कारवाई-**उत्सवाच्या काळात ध्वनिप्रदूषणविषयक नियमांचे पालन करण्याचे आवाहन मंडळांना करण्यात आले आहे. सोशल मीडियावर प्रक्षोभक मजकूर, आक्षेपार्ह गाणी किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट प्रसारित करणाऱ्यांवर लक्ष ठेवले जाणार आहे. यासाठी सायबर निरीक्षण पथक २४ तास कार्यरत राहणार आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता संशयास्पद हालचालींची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी केले आहे.

# दृष्टी तपासणी व जनजागृती शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/प्रतिनिधीः**- लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल आणि लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल सॅफायर यांच्या संयुक्त विद्यमाने जॉइंट सर्व्हिस वीक निमित्त डोळ्यांच्या मोफत तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी हरेणा नेत्रालय, आदर्श मराठी प्राथमिक शाळेजवळ, खापर्डे बगीच्यासमोर, समाधान नगर येथे सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत हे शिबिर घेण्यात आले. नागरिकांमध्ये नेत्र आरोग्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी आणि दृष्टीदोषाचे वेळीच निदान होऊन योग्य उपचार मिळावा, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची डोळ्यांची तपासणी करून त्यांना योग्य मार्गदर्शन केले. या उपक्रमाचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन लायन्स क्लब रियलचे अध्यक्ष ला. डॉ. दीपक क-हे, सचिव श्याम जडिया आणि रियल सॅफायर क्लबच्या अध्यक्षा नेहा उदासी, कोषाध्यक्ष कशिश किंगराणी, प्रोजेक्ट डायरेक्टर ओमप्रकाश खेमचंदानी यांच्या नेतृत्वात करण्यात आले. यासाठी दिनेश अग्रवाल, राजा किंगराणी, कांचन अग्रवाल यांचे विशेष सहकार्य लाभले. याप्रसंगी हरेणा संस्थेचे संयोजक सुरेंद्र पोफळी, डॉ दिनेश



वरनदानी ,रिजन चेअर पर्सन अ‍ॅड. प्रशांत देशमुख यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अ‍ॅड. प्रशांत देशमुख यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर सुरेंद्र पोफळी यांनी हरेणा संस्थेच्या कार्याची माहिती देऊन मदतीचे आवाहन केले. यावेळी ला. नितीन टवलारे, ला. विवेक भेटालू, कल्याणी भेटालू, गीता मिश्रा, ज्योती क-हे आदी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्राचार्य डॉ. जयंत कारमोरे यांना 'बेस्ट प्रिन्सिपल इन ज्युनिअर कॉलेज' पुरस्कार

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः**- शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी शैक्षणिक नेतृत्व आणि शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत चांदूर रेल्वे येथील स्व. मदनगोपाल मुंधडा कला, वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत देवराव कारमोरे यांना 'बेस्ट प्रिन्सिपल इन ज्युनिअर कॉलेज' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबई येथे आयोजित ' स्टार एज्युकेशन अवाड्‌र्स २०२६' या सोहळ्यात त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयासह चांदूर रेल्वे आणि अमरावती जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुंबई येथे नुकताच आयोजित 'स्टार एज्युकेशन अवाड्‌र्स २०२६' अंतर्गत झालेल्या विशेष सोहळ्यात शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. कारमोरे यांचा गौरव



करण्यात आला. प्राचार्य म्हणून त्यांनी बजावलेली जबाबदारी, शैक्षणिक गुणवत्तेसाठी केलेले प्रयत्न आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी राबविलेल्या उपक्रमांची दखल या पुरस्काराच्या माध्यमातून घेण्यात आली.

या पुरस्कार सोहळ्यात डॉ. जयंत कारमोरे यांच्या समवेत त्यांच्या पत्नी अर्चना कारमोरे आणि महाविद्यालयाचे प्रा. प्रवीण शिंगाणे हे ही मंचावर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत डॉ. कारमोरे यांनी हा सन्मान स्वीकारला.

डॉ. कारमोरे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल महाविद्यालयातील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली असून, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांसाठीही हे यश प्रेरणादायी ठरणार आहे. डॉ. जयंत कारमोरे यांच्या कार्याचा राष्ट्रीय स्तरावर झालेला गौरव ही संपूर्ण महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब असून, त्यांच्या यशामुळे चांदूर रेल्वेच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढला आहे.

# १ व १० वरील उर्वरित

### १२ ऑक्टोबरला 'इंडिया'

स्ट्राँग-रूमची सुरक्षा आणि व्हीव्हीपॅट (ऱ्ऱ्ईऊ) पडताळणी यांचा समावेश आहे. यापूर्वी काही माजी सनदी अधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाच्या कामकाजावर बोट ठेवले होते आणि आयोगाला निवेदन देण्याचा प्रयत्नही केला होता. मात्र, त्या अधिकाऱ्यांना निवडणूक आयोगापर्यंत जाऊ दिले गेले नव्हते. त्यानंतर या माजी अधिकाऱ्यांनी माध्यमांच्या माध्यमातून आपले आरोप देशासमोर मांडले होते.

### सीजेपी दररोज जंतर

अजिंक्य शिंदे म्हणाले की, अटक आणि पोलीस कारवाईचा आंदोलनावर परिणाम होणार नाही. जोपर्यंत ज्ञानेश कुमार यांना मुख्य निवडणूक आयुक्त पदावरून हटवले जात नाही, तोपर्यंत दररोज जंतर मंतरवर मोर्चा काढला जाईल, अशी घोषणा त्यांनी केली. या आंदोलनाला विद्यार्थी संघटनांकडूनही पाठिंबा मिळाला आहे.

### आंदोलकाला ताब्यात घ्यायला

गेले होते. त्यावेळी घरातील बहुतांश सदस्य झोपलेले होते.

काही फोन कॉल्स आणि ५०० गावकऱ्यांचा पहारा

पोलिस आल्याचे पाहून जयदीप डागर यांनी पोलिसांशी कोणताही वाद न घालता डागर यांनी काही फोन केले. अवघ्या काही मिनिटांतच गावकरी घराबाहेर जमायला लागले आणि बघता बघता सुमारे ५०० ग्रामस्थांनी घराला वेढा घातला. गावकऱ्यांनी पोलिसांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, डागर यांना कुठेही नेऊ दिले जाणार नाही.

### तुषार गांधी यांना सोडा

आम्ही सदर धरणे आंदोलन सुरु केल्याची माहिती सूत्रांनी लोकमतला दिली. ऑगस्ट क्रांती मैदानावरील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कारवाई दिल्लीतील जंतरमंतर येथे 'कॉक्रोच जनता पार्टी'ने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आयोजित केलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुंबईतील ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती मैदानावर आज आंदोलन आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी जात असताना तुषार गांधी यांना वांद्रे परिसरातून पोलिसांनी ताब्यात घेतले आणि डी. एन. नगर पोलीस ठाण्यात आणले. तुषार गांधी यांनी समाजमाध्यमांवरून आपल्याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती दिली.

### राज्यभरात विशेष मतदार

यादीतील २ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. या मतदारांना पुन्हा मतदार यादीत नांवे नोंदविण्यासाठी संधी देण्यात आली आहे.

### 'देशाचा कारभार संसदेतून

निवडणुकीतील पराभवानंतर विरोधी पक्ष या प्रक्रियेचे राजकारण करत आहे, असा पुनरुच्चारही त्यांनी केला. तुमचा लोकशाहीवर विश्वास नाही, कशावरच विश्वास नाही विरोधक भारतीय लोकशाही धोक्यात असल्याचा अपप्रचार करत आहेत आणि परकीय शक्ती देशाबद्दलचे जनमत किंवा धारणा प्रभावित करण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र निर्माण करत आहेत. 'प्रश्न असा आहे की, तुम्ही न्यायालयांचे अधिकार मान्य करण्यास नकार देता, मतांवर विश्वास ठेवण्यास नकार देता. तुमचा लोकशाहीवर विश्वास नाही, कशावरच विश्वास नाही, मग याचा अर्थ काय?' असे ते म्हणाले.

### निलेगावात पाझर तलावात

अजय हा सहावीत, तर रोहन हा पाचवीत शिकत होता. एकाच कुटुंबातील दोन मुलांचा अशा प्रकारे दुर्दैवी मृत्यू झाल्याने ग्रामस्थांमधून तीव्र दुःख व्यक्त केले जात आहे. दोन्ही मुलांच्या पश्चात आई-वडील आणि एक बहीण असा परिवार आहे. या दुःखद घटनेमुळे संपूर्ण निलेगाव शोकसागरात बुडाले आहे.

### १३.५ टन बारूदचा कंटेनर

क्रमांकाच्या ट्रेलरवर मोठा कंटेनर घेऊन बाजारगाव (ता. नागपूर ग्रामीण) शिवारातील सोलर एक्स्प्लोझिव्ह कंपनीतून नागपूर मार्गे चेन्नई (तामिळनाडू) येथे जात होता. हा ट्रेलर धामणा (ता. नागपूर ग्रामीण) शिवारात पोहोचताच चालकाचा ताबा सुटला आणि दुभाजकाला धडक देत टेलर उलटला. यात चालक जखमी झाला.

काही काळ वाहतूक विस्कळीत

अतिरिक्त वजनामुळे कंटेनर ट्रेलरपासून वेगळा झाला व रोडवर पडला. त्यात १३.५ टन बारूद असल्याची माहिती जाणकार व्यक्तींनी दिली तर त्यात कच्चा माल असल्याचे कंपनी व्यवस्थापनाने स्पष्ट केले. कंटेनर व्यवस्थित पॅक केला असल्याने आतील बारूद बाहेर न येता सुरक्षित राहिली. कंटेनर व टेलर रोडवर पडून असल्याने नागपूरकडे जाणाऱ्या लेनवरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. खुर्सापार येथील वाहतूक पोलिस केशवदास मोहतुरे, विका वाईलकर, रवींद्र ठाकरे यांनी घटनास्थ गाठून जखमीला उपचारासाठी पाठविले आणि वाहतूक सुरळीत केली. जोगेंदरसि बावरी, सौरभ व अरमान या तिघांनी त्यांन मदत केली. हिंगणा पोलिसांनी घटनास्थ गाठून पाहणी व पंचनामा केला. ठाणेद प्रमोद घोंगे यांच्या मार्गदर्शनात शिपा केशव उईके तपास करीत आहेत.

### मुलाने गळा आवळून केली आईची हत्या

पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी तुषारला अटक करण्यात आली असून, हत्येमागील नेमकी पार्श्वभूमी तपासली जात आहे. घरातील मतभेद इतक्या टोकाला पोहोचल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांच्या पुढील तपासातून या घटनेतील अन्य बाबी स्पष्ट होणार आहेत.

### नालवाडा येथे ४५ वर्षीय

राहत होता.रात्रीच्या सुमारास घरात झोपला असतांना त्याच्या शेजारीच राहणाऱ्या सुमित हिरामण दांडगे रा. नालवाडा व त्याचा मावसभाऊ विधीसंघर्षित बालक रा. कोळंबी या दोघांनी धारधार शस्त्राने निर्घृणपणे हत्या केली. सकाळच्या सुमारास घटना उघडकीस येताच पोलिस पाटील आशिष गावंडे यांनी घटनेची माहिती खल्लार पोलिसांना दिली. ठाणेदार अमोल मुडे यांनी पोलिस सहका-यासह घटनास्थळ गाठून मृतकाचा व घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर येथे पाठविला.घटनास्थळी उपविभागीय पोलिस अधिकारी सतिश कुलकर्णी यांनी भेट देऊन पाहणी केली.फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळाची तपासणी केली.हत्या कोणत्या कारणाने केली हे अद्याप स्पष्ट व्हायचे असून आरोपीविरुध्द खल्लार पोलिस स्टेशनमध्ये बिएनएस कलम १०३(१),व ३(५)नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली खल्लार पोलिस करीत आहेत.

घटनास्थळ परिसरातील सिसिटीव्ही फुटेज पाहणीवरुन आरोपी व विधीसंघर्षित बालक हे हत्या केल्यानंतर दोन्हीजण खल्लार पोलिस स्टेशन हद्दीच्या बाहेर पळून गेले होते. पळून जात असलेल्या दोन्ही आरोपीना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हत्येचे नेमके कारण काय? हे पोलिस तपासात समोर येईल.**-अमोल मुडे, ठाणेदार, खल्लार**

### वंचित उमेदवार गाजी जाहेरोश यांचे

उद्या सोमवार रोजी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहे.

उर्दू टीचर असोसिएशन च्या माध्यमातून शिक्षकांचे जाळे निर्माण करत गेल्या अनेक वर्षापासून शिक्षक मतदारसंघ निवडणूक करिता तयारीत असलेले पूर्वाश्रमीचे काँग्रेस समर्थक गाजी जाहेरोश यांना काँग्रेसने उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांनी काँग्रेस पक्षाला अल्पसंख्याक समूहाची मते चालतात परंतु अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व पचत नाही असा आरोप करत वंचित बहुजन आघाडीचा झेंडा हाती घेतला होता तसेच अमरावती शिक्षक मतदार संघाकरिता आपली उमेदवारी दाखल केली होती. परंतु नामांकन छाननीचे वेळी शिवसेना शिंदे गटाचे बंडखोर उमेदवार तथा माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांनी गाजी जाहेरोश यांच्या नामांकन अर्जावर आक्षेप घेतला असता देशपांडे यांचा आक्षेप मान्य करत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी गाजी जाहेरोश यांचे नामांकन अवैध ठरवले होते. याच अवैधतेला वंचित बहुजन आघाडीने उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने गाजी जाहेरोश यांची अपील मान्य करत येत्या सोमवार रोजी अंतिम सुनावणी ठेवलेली आहे. याच सुनावणीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना नागपूर खंडपीठ येथे उपस्थित राहण्याचे आदेश न्यायालयाने दिले असून गाजी जाहेरोश यांच्या बाजूने निकाल लागल्यास शिक्षक मतदारसंघ निवडणुकीत नवा ट्विस्ट येणार आहे.अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने मुस्लिम चेहरा असलेल्या गाजी जाहेरोश यांना रिंगणात उतरवले असल्याने सोमवारी लागणाऱ्या निकालाकडे सर्वच राजकीय पक्षाचे लक्ष लागलेले आहे.

### इंडिया आघाडीच्या वतीने तिवसा

आंदोलनात भूषण यावले, दिलीप शापामोहन, विलास माहुरे, प्रकाश सोनाने, हेमंत बोबडे, शेतू देशमुख, प्रणव गौरखेडे, अतुल गवड, दिलीप केने, प्रशांत कांबळे, शफीक राहा, सिद्धार्थ मुंद्रे, मिलिंद यावले, गौरव चौधरी, मंगेश पोल्हाड, आशिष थातोडे, राज निकाळजे, मनोज दिगंबरे, देवदत्त खोंडे, मुकुंद खाकसे, अनिल कायंदे आदीं विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

### हॉटेल रिमझिममध्ये भीषण

सिलेंडर आणि ज्या सिलेंडरच्या लिकेजमुळे आग लागली होती, त्याचा रेग्युलेटर तोडून सिलेंडर बाहेर काढला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. घटनास्थळी बडनेरा पोलिसांचे पथकही दाखल झाले होते. आग आटोक्यात आल्यानंतर सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

### सीजेपीच्या दिल्ली आंदोलनाच्या

चौकातून होते. याच कारणाने येथे बंदोबस्त लावण्यात आला आहे. या शिवाय वेळोवेळी येथे धरणे-प्रदर्शनही आयोजित केले जातात. त्यामुळे या ठिकाणी काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दक्षता घेतली जात आहे. इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी तैनात आहेत.जेणेकरून कोणत्याही संभाव्य परिस्थितीला तोंड देता येईल.सीजेपीच्या दिल्लीतील प्रस्तावित आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शहरात एकूण ११५ पोलीस अधिकारी- कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात तीन पोलीस निरीक्षक, ९ उपनिरीक्षक आणि १०३ पोलीस कर्मचारी यांचा समावेश आहे. आयुक्त राकेश ओला आणि उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे आणि प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष नजर ठेवण्यात येत आहे. पोलिस प्रशासनाचा उद्देश शहरात शांतता राखण्यासोबतच कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती कोणत्याही प्रकारे बिघडू नये, याची काळजी घेणे हा आहे.

### राधानगरात विद्यार्थ्यावर चाकूने

आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासण्यात आले. तसेच गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे संशयितांची ओळख पटविण्याचे काम करण्यात आले. त्यानंतर शहराच्या विविध भागांतून पाच जणांना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये यश संतोष पवार (वय १९, रा. गाडगेनगर, अमरावती), करण संतोष मुंदाने (वय २०, रा. राणी लक्ष्मीबाई वॉर्ड, आर्वी, जि. वर्धा), समाधान गणेश कोल्हे (वय १८, रा. गाडगेनगर, अमरावती), दर्शन शंकर राऊत (वय १९, रा. अमरावती) आणि एका अल्पवयीन मुलाचा समावेश आहे.

या हल्ल्यामागील कारण काय होते, वाहनांची तोडफोड कोणत्या हेतूने करण्यात आली आणि आरोपींचा यापूर्वीच्या गुन्ह्यांशी काही संबंध आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोलीस निरीक्षक अतुल वर, सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे आणि दशरथ आडे यांच्यासह गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

### नवरात्रोत्सवासाठी ग्रामीण पोलिसांची

दलाची एक कंपनी, दंगल नियंत्रणाची तीन पथके आणि ८८० होमगार्डची मदत घेतली जाणार आहे. जिल्ह्यातील ३९५ गावांमध्ये 'एक गाव, एक दुर्गा' अभियान राबविण्यात येत आहे. उत्सव शांततेत पार पडावा, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर दिला जाणार

### मंदिरांच्या दानपेट्यांवर चोरट्यांचा

त्यानुसार त्याला तळणी फाटा परिसरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने दोन साथीदारांच्या मदतीने चोरी केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी हिरो कंपनीच्या दुचाकीने परसापूर येथे आले होते. पेचकसच्या साहाय्याने दोन्ही मंदिरांच्या दानपेट्या फोडून त्यांनी रोकड चोरली. या प्रकरणातील दोन विधिसंघर्षग्रस्त बालकांची त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत चौकशी करण्यात आली. पोलिसांनी एमएच २७ डीवाय २१९९ क्रमांकाची दुचाकी, पेचकस आणि रोकड असा एकूण ५१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील कारवाईसाठी आरोपी आणि जप्त साहित्य पथ्रोट पोलिसांकडे सोपविण्यात आले.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

### चाकूहल्ल्यात दोघे

कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. हल्ला कोणत्या कारणावरून झाला, हल्लेखोरांची संख्या किती होती आणि घटनेच्या वेळी नेमके काय घडले, याबाबतची सविस्तर माहिती अद्याप समोर आलेली नाही. जखमींचे जबाब आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे घटनेचा उलगडा होण्याची शक्यता आहे. खोलापुरी गेट पोलीस या प्रकरणाचा तपास करीत आहेत. पोलिसांच्या पुढील तपासानंतर हल्ल्यामागील कारण स्पष्ट होणार आहे.

### अंबादेवी-एकवीरा देवी यात्रेसाठी

गर्ल्स हायस्कूल चौक, इर्विन चौक, मालवीय चौक आणि दीपक चौक या पर्यायी मार्गाचा वापर करता येईल. जड व हलक्या मालवाहू वाहनांच्या प्रवेशासंदर्भातील ३ सप्टेंबर रोजीच्या अधिसूचनेतील नियमही लागू राहतील. राजकमल-गद्रे चौक मार्गे बडनेराकडे जाणाऱ्या एसटी बसेसना राजापेठ-इर्विन उड्डाणपूल, गर्ल्स हायस्कूल चौक, अकोला वाय-पॉइंट, सुपर हायवे आणि जुना बायपासमार्गे जाण्याचे निर्देश आहेत. नागपुरी गेटमार्गे बाहेरगावी जाणाऱ्या एसटी बसेस रेल्वे स्टेशन चौक, इर्विन चौक आणि चित्रा चौक या मार्गाने जातील.

**सहा ठिकाणी पार्किंगची सुविधा-**भाविकांसाठी नेहरू मैदान, ओसवाल भवन मैदान, मुधोळकर पेठ मैदान, ओसवाल भवन ते गद्रे चौक मार्गाच्या एका बाजूला, एचव्हीपीएम वळणापासून रवी नगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या एका बाजूला तसेच साबणपुरा चौक ते जवाहर गेट मार्गावर पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. गांधी चौकातील देवस्थानचे पार्किंग बंद राहणार असून, दोन्ही मंदिरांच्या २०० मीटर परिसरात वाहनतळास मनाई असेल. रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि अन्य अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना या निर्बंधांतून वगळण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायदा आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असा इशारा सहायक पोलीस आयुक्त (वाहतूक) संजय खताळे यांनी दिला आहे. गर्दीत सोनसाखळी व मोबाईल चोरीच्या घटना टाळण्यासाठी भाविकांनी मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी आणि वाहतूक विभागाला सहकार्य करावे, असे आवाहनही पोलिसांनी केले आहे.

### विवांता इन्फिनिटी प्रोजेक्टचे

एका पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी सांगितले की, वर्ष २०२२ मध्ये सुरू झालेल्या या प्रोजेक्टमध्ये सुमारे ६० हजार चौरस फूट क्षेत्रात १५ मजली दोन टॉवर्सचे बांधकाम प्रस्तावित आहे. जवळपास २.५० लाख चौरस फूट एकूण बांधकाम क्षेत्र असलेल्या या प्रोजेक्ट मध्ये १३५ निवासी आणि ५५ व्यावसायिक युनिट्सचा समावेश आहे. अत्याधुनिक सुविधांनी युक्त या प्रोजेक्टला सुरुवातीला गुंतवणूकदारांचा जबरदस्त प्रतिसाद मिळाला होता. बघता बघता जवळपास ६० टक्के युनिट्सचे बुकिंगही झाले होते. गुंतवणूकदारांना अपेक्षा होती की या प्रोजेक्ट मध्ये त्यांचे स्वतःचे घर लवकरच बनेल.पण सुमारे दोन वर्षांपूर्वी एका संचालक वेगळे झाल्यामुळे प्रोजेक्टसमोर आर्थिक आणि इतर तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे बांधकामाची गती मंदावली होती. आता शहरातील प्रसिद्ध उद्योजक राजेश मिश्रा हे कंपनीत संचालक आणि भागीदार म्हणून जोडले गेल्याने कंपनीला नवी आर्थिक ताकद मिळाली आहे. आर्थिक स्थिती सुधारल्याने बांधकाम वेगात आहे. त्यामुळे आधी गुंतवणूक केलेल्या फ्लॅटधारकांना ताबा देण्यास सुरुवात होईल.तीन फ्लॅटमध्ये इंटेरियरचे काम सुरू आहे.गुंतवणूकदारांशी संवादासाठी कोर कमिटी स्थापन करण्यात आली आहे. कंपनीची आर्थिक स्थिती सुधारली असून लवकरच सर्व फ्लॅटधारकांना त्यांचे घर मिळेल, असा दावा पत्रकार परिषद मध्ये करण्यात आला आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, ११ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# आंदोलनाचा इशारा अन महापालिकेची धावपळ!

## डॉ. आंबेडकर खुले नाट्यगृहाची स्वच्छता; नगरसेवक पराग गवई उतरले थेट रंगकामासाठी

■ प्रतिनिधी | अकोला ■

आंदोलनाचा इशारा मिळताच महापालिका प्रशासनाला जाग आली! भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृहाच्या दुरवस्थेचा मुद्दा वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक पराग गवई यांनी लावून धरल्यानंतर शनिवारी, १० ऑक्टोबर रोजी महापालिकेने सकाळीच परिसराची स्वच्छता केली. मात्र, रंगरंगोटीचे काम अपूर्णच राहिल्याने गवई यांनी स्वतः रंगकाम हाती घेतले. महापुरुषांच्या नावाने असलेल्या वास्तूची स्वच्छता करण्यासाठीही आंदोलनाचा इशारा द्यावा लागतो, ही बाब प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करणारी ठरली आहे.

अकोला शहराचे वैभव असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृहाची अवस्था गेल्या काही काळापासून दयनीय झाली होती. परिसरातील अस्वच्छता आणि रंगरंगोटीअभावी वास्तूचे विद्रूप झालेले स्वरूप पाहून आंबेडकरी अनुयायांमध्ये नाराजी व्यक्त होत होती. या गंभीर बाबीकडे नगरसेवक पराग गवई यांनी महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले. महापालिका आयुक्तांना निवेदन देऊन नाट्यगृहाची तातडीने स्वच्छता, दुरुस्ती आणि रंगरंगोटी करण्याची मागणी करण्यात आली होती.





धम्मचक्र प्रवर्तन दिनापूर्वी आवश्यक कामे पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला होता. या इशाऱ्यानंतर प्रशासनाने तत्परता दाखवत स्वच्छता मोहीम राबवली.

### कार्यकर्ते, अनुयायांचा उत्स्फूर्त सहभाग

या उपक्रमात संकेत शिरसाट, यशपाल जाधव, आशिष इंगोले, चिरायू पळसपगार, रोशन ताजने, निलेश वरोटे, अजय अरबड पाटील, भारत पहुरकर, सुशांत प्रधान, शुभम डहाके, आकाश सोनवणे, सम्राट वाहूरवाघ, राहुल खंडारे, प्रवीण शिरसाट, प्रफुल थोरात, महबूब खान, ?ड. अनिकेत राठोड, मंगेश गवई, विशाल गोपनारायण, रवी पाटील, अरुण बलखंडे, प्रवीण गायगोले पाटील, राज गोपनारायण, सनी शेगोकार, प्रमोद तायडे, राहुल इंगळे, राष्ट्रपाल सावळे, राज खिल्लारे, राहुल तायडे, प्रवीण खरात, अमित तेलगोटे, तुषार गिरी, रामदास तायडे, अभिजीत किरतकर, अमोल भोजने, सचिन जगताप, मीठाराम लोंढे, शेख इरसाद, धम्मपाल चक्रनारायण, रोहित डोंगरे, सूर्यम देशमुख, परीस गवई, शौर्य पहुरकर, मैत्रीय गवई, छोटू सुरवाडे, निखिल कुकडे, अजिंक्य शिरसाट, योगेश किर्तक, कुलदीप क्षीरसागर, प्रतीक इंगोले, विशाल वाघ, विशाल इंगळे, विशाल तेलगोटे, अभिषेक साखरकर, अंशराज तेलगोटे, मुन्ना मोहोळ, सतीश शिरसाठ, राजकिरण बागडे, अश्विन खांडेकर आणि नितीन थोरात यांच्यासह रमाबाई महिला संघ, छत्रपती शिवाजी महाराज युवा प्रतिष्ठान, धम्मपाली महिला संघ, रमाबाई चौक महिला संघ, सावित्रीबाई फुले महिला संघ, पराग गवई मित्रपरिवार, शिवणी-मलकापूर येथील कार्यकर्ते, महापुरुषांचे अनुयायी आणि जागरूक नागरिक सहभागी झाले होते.

### स्वच्छता झाली; रंगरंगोटीचे काय?

महापालिकेने परिसर स्वच्छ केला, मात्र नाट्यगृहाच्या रंगरंगोटीचा प्रश्न कायम राहिला. त्यामुळे प्रशासनाकडून काम पूर्ण होण्याची वाट न पाहता नगरसेवक पराग गवई यांनी स्वतः रंगकाम सुरू केले. लोकप्रतिनिधीने पुढाकार घेऊन सार्वजनिक वास्तूच्या सुशोभीकरणासाठी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्याने या विषयाची चर्चा सुरू झाली आहे.ष्महापुरुषांच्या नावाने असलेल्या वास्तूंचे जतन आणि देखभाल करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. केवळ तात्पुरती स्वच्छता करून प्रश्न निकाली निघणार नाही. नाट्यगृहाची नियमित स्वच्छता, रंगरंगोटी आणि आवश्यक दुरुस्तीसाठी कायमस्वरूपी व्यवस्था उभारावी, अशी मागणी गवई यांनी केली.

# गुटख्याच्या हप्त्यासाठी अधिकाऱ्यांचीच रस्सीखेच!

## ● दुसऱ्याच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप केल्याचा आरोप
## ● 'वसुलीवीर' प्रमाणपत्राचीही रंगली चर्चा

■ ॲड. समीर ठाकूर ■

अकोला : गुटखा माफियांवर कारवाई करण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांमध्येच कथित हप्तेवसुलीवरून जुंपल्याची चर्चा रंगली आहे. दुसऱ्याच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करून गुटखा विक्रेत्याकडे पैशांची मागणी केल्याच्या आरोपातून दोन अधिकाऱ्यांत जोरदार शाब्दिक चकमक उडाल्याचे सांगितले जात आहे. वरिष्ठांच्या मध्यस्थीने वाद मिटविण्यात आल्याची माहिती असून, या प्रकारामुळे संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### कार्यक्षेत्र वाटप, पण लक्ष कथित वसुलीवर?

जिल्ह्यातील संबंधित विभागात वरिष्ठांनी अधिकाऱ्यांना स्वतंत्र कार्यक्षेत्रे वाटून दिली आहेत. आपल्या हद्दीत बेकायदेशीर प्रकारांवर लक्ष ठेवणे, गैरप्रकार आढळल्यास कारवाई करणे आणि अवैध व्यवसायांना आळा घालणे, ही त्यांची जबाबदारी आहे. मात्र, या जबाबदारीसोबतच कार्यक्षेत्रातून कथित आर्थिक वसुली करून देण्याचे अलिखित लक्ष्यही असल्याची चर्चा कर्मचारी वर्तुळात सुरू आहे.

### 'वसुलीवीर' ठरण्याची स्पर्धा?

संबंधित विभागात अधिक वसुली करून देणाऱ्या अधिकाऱ्याला महिनाअखेरीस वरिष्ठांकडून कथितरीत्या 'वीर' प्रमाणपत्र दिले जात असल्याची चर्चा आहे. या कथित प्रकाराची अधिकृत पुष्टी झालेली नसली, तरी त्यातून वसुलीच्या स्पर्धेला प्रोत्साहन मिळत असल्याची कुजबुज कार्यालयीन वर्तुळात ऐकायला मिळते. याच कथित आर्थिक व्यवहारांच्या मुद्द्यावरून एका अधिकाऱ्याने दुसऱ्याच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप केल्याचा आरोप आहे. तेथील गुटखा विक्रेत्याकडे पैशांची मागणी केल्याच्या कथित प्रकारानंतर दोन्ही अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक उडाल्याची माहिती सूत्रांनी दिली. प्रकरण चिघळण्याची शक्यता लक्षात घेऊन वरिष्ठांनी मध्यस्थी केल्याने वाद शांत झाल्याचे सांगितले जाते.

### गुटखा माफियांवर कारवाईचा बडगा कधी?

जिल्ह्यात गुटख्याचे अवैध नेटवर्क सक्रिय असल्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर हा कथित प्रकार अधिक गंभीर ठरतो. अवैध विक्री रोखण्याऐवजी कथित वसुलीवरून अधिकाऱ्यांमध्ये संघर्ष होत असल्याचे आरोप समोर येत असतील, तर त्यांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची तपासणी, कथित आर्थिक व्यवहारांची शहानिशा आणि गुटखा विक्रीविरोधातील कारवाईचा आढावा घेण्याची गरज आहे. वादावर पडदा टाकल्याने प्रश्न संपत नाहीत. कथित वसुलीच्या आरोपांमागील सत्य काय, 'वसुलीवीर' प्रमाणपत्राच्या चर्चेत तथ्य आहे का आणि गुटखा माफियांवर प्रत्यक्षात किती कारवाई झाली, याची उत्तरे संबंधित विभागाच्या वरिष्ठांनी द्यावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

( क्रमश : )

# अकोटमध्ये १५ ऑक्टोबरला भूमी फाउंडेशनचा भव्य गरबा महोत्सव!

## प्रवेश विनामूल्य; दास मोबाईलतर्फे लाखोंची आकर्षक बक्षिसे



■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरातील भूमी फाउंडेशनच्या वतीने गुरुवार, १५ ऑक्टोबर रोजी भव्य गरबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सरस्वती विद्यालय, कॉलेज रोड, अकोट येथे सायंकाळी ६ वाजता या महोत्सवाला सुरुवात होणार असून, प्रवेश पूर्णपणे विनामूल्य ठेवण्यात आला आहे. दास मोबाईल, अकोला यांच्या वतीने विजेत्या स्पर्धकांना लाखो रुपयांची आकर्षक बक्षिसे दिली जाणार असल्याने गरबा प्रेमींमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

अकोट शहराला सांस्कृतिक परंपरेचा समृद्ध वारसा लाभला आहे. शहरातील तरुण-तरुणींना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी मिळावी, स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कलेला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने भूमी फाउंडेशनने या महोत्सवाचे आयोजन केले आहे. शहरासह ग्रामीण भागातील गरबा प्रेमींनाही या उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

### विनामूल्य प्रवेशामुळे विशेष आकर्षण

गरबा महोत्सवांच्या आयोजनाला शहरात मोठा प्रतिसाद मिळत असताना, भूमी फाउंडेशनने विनामूल्य प्रवेशाची भूमिका घेतली आहे. दुसरीकडे, काही गरबा महोत्सवांच्या आयोजनामागील आर्थिक गणिताबाबतही शहरात चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर विनामूल्य प्रवेश आणि लाखोंच्या बक्षिसांमुळे भूमी फाउंडेशनचा महोत्सव गरबा प्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरण्याची शक्यता आहे.

### चंचल पितांबरवाले यांचे आवाहन



भूमी फाउंडेशनच्या अध्यक्षा कु. चंचल पितांबरवाले यांनी पालकांनी आपल्या पाल्यांना या महोत्सवात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन केले आहे. तसेच अकोट शहर आणि ग्रामीण भागातील गरबा प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सवाची शोभा वाढवावी, असेही त्यांनी म्हटले आहे.

# मालेगाव तालुक्यातील ८ ३ ग्राम पंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर!

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव तालुक्यातील ८३ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत शुक्रवारी, ९ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयाच्या मुख्य सभागृहात काढण्यात आली. उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांच्या उपस्थितीत तहसीलदार दीपक पुंडे यांनी ही प्रक्रिया पार पाडली.

यापूर्वी ८ जुलै २०२५ रोजी काढण्यात आलेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या आरक्षणात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. या दोन्ही प्रवर्गांचे आरक्षण पूर्वीप्रमाणेच कायम ठेवण्यात आले आहे. त्यामुळे यावेळच्या सोडतीत केवळ नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) आणि सर्वसाधारण प्रवर्गातील जागांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले.

नागरिकांचा मागास प्रवर्गातील एकूण १२ जागा, तर सर्वसाधारण प्रवर्गातील ४२ जागांसाठी ही सोडत काढण्यात आली. यामध्ये महिला आरक्षणाचाही समावेश आहे.

या आरक्षण सोडतीकडे तालुक्यातील ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरिकांचे लक्ष लागले होते. तहसील कार्यालयात पार पडलेल्या या प्रक्रियेस तालुक्यातील ८३ ग्रामपंचायतींमधील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. सरपंचपदाच्या आरक्षणामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

# रिसोड तालुक्यातील ८० ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण सोडत

■ प्रतिनिधी | रिसोड ■



रिसोड तालुक्यातील ८० ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण आज ९ ऑक्टोबर रोजी रिसोड तहसील कार्यालयातील सभागृहात उपविभागीय अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी, वैशाली देवकर, तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी प्रतीक्षा तेजनकर यांचे अध्यक्षतेखाली तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नायब तहसिलदार गजानन जवादे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. आरक्षण सोडती मध्ये निघालेल्या आरक्षणामध्ये मात्र काही दिग्गजांचा हिरमोड झाला असल्याचे दिसून आले तर काही ठिकाणी मात्र आरक्षण हे खुल्या प्रवर्गात असल्याने या ठिकाणी सरपंच पदाचे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी आनंदाचघ बाब ठरलेली आहे.

**८० ग्रामपंचायतीचे आरक्षण पुढीलप्रमाणे :**

अनुसूचित जाती: ग्रामपंचायतीचे नाव : दापुरी खु,किनखेडा,घोटा,महागाव,हराळ,चिखली,चाकोली ,हिवरापेन,आसेगाव पेन,लोणी बु अनुसूचित जाती स्त्री : ग्रामपंचायतीचे नाव : जोगेश्वरी,पेनबोरी,मोप,लोणी खुर्द,वडजी,गौढाळा,पिपरी सरहद, सवड,नावली अनुसूचित जमाती : ग्रामपंचायतीचे नाव : कोयाळी खुर्द (रि),धोडप बु अनुसूचित जमाती स्त्री : ग्रामपंचायतीचे नाव : मसला पेन,वाकद सर्वसाधारण: ग्रामपंचायतीचे नाव : गोहगाव,पार्डी तिखे,कोयाळी बु (के),कळम गव्हाण,गणेशपूर (रि),देऊळगाव बंडा,मांगुळ झनक,शेलू खडसे,मोहजा इंगोले,वाडी रायताळ, कवठा खुर्द, केनवड, जवळा, मांडवा, बाळखेड, पिंपरखेड, रिठद, येवती, बिबखेडा, मोरगव्हान सर्वसाधारण स्त्री : ग्रामपंचायतीचे नाव : वनोजा, लिंगा कोतवाल, बेलखेड, शेलगाव राजगुरे, गोवर्धन, येवता, भर जहागीर, चीचांबापेन, गोभनी, भापूर, अचळ, नेतंसा, एकलासपूर, केशव नगर, कुकसा, अगरवाडी, वाघी खुर्द, कुऱ्हा, मांगवाडी, घोन्सरवाडी नागरिकांचा मागास प्रवर्ग : ग्रामपंचायतीचे नाव : व्याड, नंधना, धोडप खुर्द, मोठेगाव, खडकी सदार, कंकरवाडी, करडा, निजामपूर नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री: ग्रामपंचायतीचे नाव : कोयाळी बु(रि),मोहजा बंदी, पळसखेड, बोरखेडी,जाब आढाव, देगाव, करंजी, लेहणी, चीचांबा भर

# शेतकऱ्यांप्रमाणे बांधकामांनाही पाणी वापरावर निर्बंध घाला! - सुभाष देवढे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. मात्र, दुसरीकडे वाशिम शहरासह ग्रामीण भागात सुरू असलेल्या सिमेंट रस्ते, पूल आणि व्यावसायिक इमारतींच्या बांधकामांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर होत असल्याने ही कामेही तातडीने बंद करण्यात यावीत, अशी मागणी सुभाष पाटील देवढे यांशनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पाणीटंचाईवर उपाययोजना करताना प्रशासनाने सर्वांसाठी समान निकष लागू करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी पाणी उपसण्यावर निर्बंध घालण्यात आले असताना बांधकामांसाठी होणाऱ्या पाण्याच्या वापराकडेही गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. एक किलोमीटर सिमेंट रस्ता किंवा मोठ्या प्रमाणातील बांधकामासाठी लागणाऱ्या पाण्यातून शेतकऱ्याला हळदीसारख्या पिकाला सिंचन करता येऊ शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शहर व ग्रामीण भागातील सिमेंट रस्ते, पूल तसेच व्यावसायिक इमारतींची बांधकामे तातडीने थांबविण्याचे आदेश प्रशासनाने जारी करावेत. पाणीटंचाईच्या काळात केवळ शेतकऱ्यांवरच निर्बंध लादून इतर क्षेत्रांना सूट दिल्यास प्रशासनाकडून दुजाभाव होत असल्याची भावना जनतेमध्ये निर्माण होऊ शकते, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. पाणीटंचाईच्या प्रश्नावर प्रशासनाने सर्व घटकांसाठी समान धोरण राबवून बांधकामांमधील पाण्याचा वापर नियंत्रित करावा आणि याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी सुभाष पाटील देवढे यांची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# श्री वाघामाय देवी नवरात्र उत्सवाला प्रारंभ!

**मानोरा :** तालुक्यातील मौजा रुई (गोस्ता) येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री वाघामाय देवी नवरात्र उत्सव २०२६ मोठ्या भक्तिभावात साजरा होत आहे. हा सोहळा रविवार आज दि. ११ ते सोमवार दि. १९ ऑक्टोबर२०२६ पर्यंत चालणार आहे. सर्व भाविक भक्तांना या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, रुई गोस्ता यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# एक नवा उपक्रम; स्वावलंबनाच्या दिशेने एक नवे पाऊल!



'मदतीचा हात, स्वावलंबनाची साथ आणि उज्ज्वल भविष्याची नवी सुरुवात!'
आरती ताई ठोके (इंगोले)
अध्यक्षा, वज्रादेही महिला विकास संघ वाशिम जिल्हा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील बेरोजगार युवकांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वङ्कादेही महिला विकास संघाच्या वतीने एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे.उपक्रमांतर्गत मुस्लिम समाजातील बांधव सय्यद मोसीन यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करून स्वावलंबी होण्याच्या उद्देशाने फळफळावळ विक्रीचे दुकान सुरू करून देण्यात आले आहे.

# कुलस्वामिनी श्री कामाक्षा देवीचा शारदीय नवरात्रोत्सव

■ प्रतिनिधी | कारंजा ■





कारंजा नगरीचे आराध्य दैवत आणि कारंजेकरांची कुलस्वामिनी असलेल्या ऐतिहासिक श्री कामाक्षा देवी संस्थानात रविवार, दि. ११ ऑक्टोबरपासून शारदीय नवरात्रोत्सवाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ होत आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवानिमित्त विविध धार्मिक विधी, महिला भजनी मंडळांचे भजन, भक्तिसंगीत, सप्तशती पाठ, होमहवन आणि दीपमाळ प्रज्वलन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विजयादशमीच्या दिवशी, २० ऑक्टोबर रोजी उत्सवाची सांगता होणार आहे.

कारंजा नगरीच्या धार्मिक आणि ऐतिहासिक परंपरेत श्री कामाक्षा देवी मंदिराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आदिशक्तीचे जागृत स्थान म्हणून या मंदिराची भाविकांमध्ये श्रद्धा असून, देवीच्या दर्शनासाठी नवरात्रोत्सवात विदर्भासह महाराष्ट्रातील विविध भागांतून आणि शेजारील प्रांतांतून भाविक मोठ्या संख्येने येतात.

# रस्त्याच्या कडेला झाडे नाहीत, मग निधी खर्च झाला कुठे ?



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

राज्य सध्या भीषण दुष्काळाचा सामना करीत असून पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी शासनाच्या प्रत्येक विभागाकडून वृक्षारोपण व संवर्धनासाठी दरवर्षी शेकडो कोटी रुपये खर्च केले जात आहेत. मात्र प्रत्यक्षात शासकीय निधी न वापरता कागदोपत्री वापरल्याचा वनविभागानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचा प्रताप सावरगांव कान्होबा- कोळंबी - कळंबा- धानोरा या रस्त्यावर प्रत्यक्ष बघितल्यास निदर्शनास आल्याशिवाय राहत नसल्याची उघड वास्तविकता समोर आली आहे.

### प्रत्यक्ष जागेवर काय दिसते? - फोटोतून उघड

कळंबा बोडखे ते कोळंबी या साडेसहा किमी रस्त्याच्या दुतर्फा एकही झाड लावलेले दिसत नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजूला केवळ काटेरी झुडपे, वाळलेले गवत आणि खड्डे पडलेला डांबरी रस्ता दिसत आहे. रस्ता निर्मितीच्या अंदाजपत्रकात (र्ग्सू) प्रत्येक नव्या रस्त्यावर दुतर्फा झाडे लावणे, त्यांना जाळी लावणे, तीन वर्षे जगविणे व पाणी देणे यासाठी लाखो रुपयांची तरतूद असते. मात्र येथे एकही झाड अस्तित्वात नाही.

### मंजूर निधीचे गबन झाल्याची संभावना

नियमाप्रमाणे रस्त्याच्या दुतर्फा १० ते १५ फुट अंतरावर वड, पिंपळ, कडुनिंब, गुलमोहर अशी देशी झाडे लावणे बंधनकारक आहे. या रस्त्याचे काम होऊन २ ते ३ वर्षे झाली तरी झाडे लावलेली नाहीत, याचा अर्थ मंजूर निधी कागदावर खर्च दाखवून गबन झाला आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

वनविभागाच्या ७५ एकर कागदोपत्री वृक्षारोपण घोटाळ्याची चौकशी अजून सुरू नसतानाच सा.बां. विभागानेही तोच कित्ता गिरवल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या प्रकरणी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, वाशिम यांनी संबंधित ठेकेदार व उपअभियंता यांच्याकडून खुलासा मागवून मंजूर निधी, झाडांची संख्या, जगलेल्या झाडांची माहिती जनतेसमोर आणावी व दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून निधी वसूल करावा, अशी मागणी पर्यावरणवादी जगदीश कमलाबाई धांदू जाधव यांच्या वतीने करण्यात आली आहे.

धानोरा- कळंबा बोडखे -कोळंबी रस्त्यादरम्यान कंत्राटदारा मार्फत झाडे व झाडांना लोखंडी आवरण असलेल्या जाळ्या पाच सहा महिन्यांपूर्वी लावल्याची माहिती या रस्त्याचे काम बघणारे सार्वजनिक बांधकाम विभागाचे ज्युनिअर इंजिनिअर गणेश वानखडे यांनी दिली. मात्र सध्या जिवंत झाडे किती आहेत याबाबत ते निश्चित माहिती देऊ शकले नाहीत. झाडे जगली नसतील तर ते पुन्हा कंत्राटदारामार्फत लावली जातील, कंत्राटदाराचे पुढील बिल रोखल्या जाईल अशी सारवासारव सुद्धा श्री वानखेडे यांनी प्रस्तुत प्रतिनिधीकडे केली.

### ७५ एकर वनजमिनीनंतर आता सा.बां. विभागाचा प्रताप

सावरगांव येथील तब्बल ७५ एकर वनजमिनीत कागदोपत्री झाडे लावून शासनाच्या निधीला चुना लावण्याचा प्रकार तत्कालीन वनाधिकाऱ्यांनी केल्याची तक्रार शासन व प्रशासनाकडे प्रलंबित असतानाच, आता सावरगावातूनच कोळंबी - कळंबा मार्गे धानोरा ला जोडण्यासाठी सा.बां. विभागाने जो रस्ता तयार केलेला आहे त्या रस्त्यावर दुतर्फा झाडे लावण्यासाठी मंजूर झालेल्या निधीचा वापर कागदोपत्री झाडे लावून केल्याचे धक्कादायक चित्र दिसत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३१४ ■ रविवार, ११ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## आजपासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ

### पाताळमाता गडावर भक्तीचा जागर; धार्मिक कार्यक्रमांसह आरोग्य शिबिर

**वर्धा जनमाध्यम :** आदिशक्तीचा जयघोष, भक्तीचे सूर आणि अखंड तेवणाऱ्या श्रद्धेच्या ज्योतीने पाताळमाता गड परिसर भक्तिमय होणार आहे. अश्विन शारदीय नवरात्रोत्सवाला रविवार, ११ ऑक्टोबरपासून प्रारंभ होत असून, मौजा पवनूर परिसरातील पाताळमाता मंदिरात उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. दहा दिवस विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांतून आई पाताळमातेचा जागर केला जाणार आहे.

रविवारी सकाळी ७ वाजता पंडित मनोहर जोशी, पवनूर यांच्या हस्ते घटस्थापना आणि अखंड दीपप्रज्वलन होईल. रात्री ७ वाजता गोंधळ आणि जागरणाचा कार्यक्रम



होणार आहे. सोमवार, १२ ऑक्टोबरला सत्संग सेवा गुरुदेव भजन मंडळ, तर १३ ऑक्टोबरला महिला भजन मंडळाचा भजन कार्यक्रम होईल. १४ ऑक्टोबरला नरसुळा येथील बाल गोपाल भजन मंडळ भक्तिसेवा सादर करणार आहे.

शुक्रवार, १६ ऑक्टोबरला सकाळी ७ वाजता रांगोळी आणि दुर्गास्तोत्र स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. शनिवार, १७ ऑक्टोबरला सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत श्री गुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, गुरुकुंज आश्रम, मोझरी यांच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिर होईल. सायंकाळी ६ वाजता अमरावती येथील नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयाचा लोकगीतांचा कार्यक्रम रंगणार आहे.

श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक सेवेचा संगम असलेल्या या उत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन देवीचे दर्शन घ्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## वर्ध्यातील हॉटेलमध्ये यवतमाळच्या व्यक्तीचा मृत्यू

### तिसऱ्या मजल्यावरील खोलीत आढळले बेशुद्ध अवस्थेत, पोलिसांकडून तपास सुरू

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील हॉटेल रामाकृष्णा येथे यवतमाळ जिल्ह्यातील एका ५५ वर्षीय व्यक्तीचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची घटना शनिवारी उघडकीस आली. प्रवीण नवलमल कोठारी असे मृत व्यक्तीचे नाव असून ते यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील कामठवाडा येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, प्रवीण कोठारी हे शनिवारी दुपारी सुमारे ३.४५ वाजताच्या सुमारास वर्ध्यातील हॉटेल रामाकृष्णा येथे आले होते. त्यांनी हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावरील खोली क्रमांक ३०२ बुक केली होती. काही वेळानंतर एक महिला या खोलीत दाखल झाली. त्यानंतर काही वेळाने ती महिला



घाबरलेल्या अवस्थेत खोलीबाहेर आली.

तिने हॉटेलच्या काउंटरवर उपस्थित असलेल्या व्यवस्थापकाला कोठारी यांची प्रकृती बिघडल्याची माहिती दिली. ही माहिती मिळताच हॉटेलमधील दोन कर्मचारी तातडीने तिसऱ्या मजल्यावरील खोली क्रमांक ३०२ येथे पोहोचले.

तेथे कोठारी हे बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन हॉटेल कर्मचाऱ्यांनी तातडीने शहर पोलिसांना घटनेची माहिती दिली.

माहिती मिळताच पोलिसांचे पथक हॉटेलमध्ये दाखल झाले. पोलिसांनी परिस्थितीची पाहणी केल्यानंतर रुग्णवाहिकेच्या मदतीने कोठारी यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

#### मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट

कोठारी यांचा मृत्यू नेमका कोणत्या कारणामुळे झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. हॉटेलमधील घटनाक्रम आणि मृत्यूपूर्वीच्या हालचालींची माहिती मिळविण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज तपासणे, संबंधित व्यक्तींची माहिती घेणे तसेच खोलीतील परिस्थिती आणि उपलब्ध पुराव्यांची पडताळणी करण्यावर पोलिसांचा भर आहे.

या प्रकरणात वैद्यकीय तपासणी आणि आवश्यक न्यायवैद्यक प्रक्रियेद्वारे मृत्यूचे कारण स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. शहर पोलिसांनी घटनेची नोंद करून तपास सुरू केला असून, तपासातून पुढे येणाऱ्या बाबींनंतरच मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## कर्जमाफीच्या प्रतीक्षेत बळीराजा; तिसरी यादी कधी

### पावसाने पाठ फिरवली, हाताशी आलेले पीक कोमेजण्याच्या मार्गावर, शेतकऱ्यांची चिंता वाढली

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** आधी निसर्गाची अवकृपा आणि आता कर्जमाफीची प्रतीक्षा, अशा दुहेरी संकटात आष्टी तालुक्यातील शेतकरी सापडले आहेत. पावसाने दडी मारल्याने कपाशी, सोयाबीनसह इतर पिके पाण्याअभावी कोमेजण्याच्या मार्गावर आहेत. त्यातच कर्जमाफीच्या पहिल्या दोन याद्या जाहीर होऊनही अनेक शेतकरी लाभापासून वंचित असल्याने तिसरी यादी कधी जाहीर होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मोठ्या कष्टाने पेरणी करून उभे केलेले पीक वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. मात्र, पावसाच्या लहरीपणामुळे उत्पादन घटण्याची भीती निर्माण झाली आहे. शेतीचा वाढता खर्च, कर्जाची परतफेड आणि घरखर्च यांचा ताळमेळ घालताना शेतकऱ्यांची दमछाक होत आहे. उत्पादन घटले तर आर्थिक संकट अधिक गडद होण्याची चिंता त्यांना सतावत आहे. कर्जमाफीच्या पहिल्या दोन याद्यांमध्ये काही शेतकऱ्यांना लाभ मिळाला असला, तरी अनेक शेतकरी अद्याप प्रतीक्षेत आहेत. पात्र शेतकऱ्यांची प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढून तिसरी यादी जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## वर्धा बसस्थानकावर महिलेच्या पर्समधून ४१ हजारांचा ऐवज लंपास

### सोन्याचे मंगळसूत्र आणि तीन हजारांची रोकड चोरीला, नऊ दिवसांनंतर शहर पोलिसांत तक्रार

**वर्धा जनमाध्यम :** मुलीला सासरी सोडण्यासाठी वर्ध्यात आलेल्या महिलेच्या पर्समधून सोन्याचे मंगळसूत्र आणि तीन हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्याने लंपास केली. २० सप्टेंबर रोजी सकाळी वर्धा बसस्थानकावर घडलेल्या या प्रकारात एकूण ४१ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला. याप्रकरणी महिलेने ९ ऑक्टोबर रोजी वर्धा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून, अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



वंदना मडावी (५७, रा. नरेंद्रनगर, नागपूर) या २० सप्टेंबर रोजी मुलगी मिनल हिला वर्ध्यात सोडण्यासाठी नागपूर येथून विद्युत बसने आल्या होत्या. सकाळी १०.१५ वाजताच्या सुमारास त्या वर्धा बसस्थानकावर पोहोचल्या. मुलीला जावई आशिष मोहर्ले यांच्या स्वाधीन केल्यानंतर त्या नागपूरला परत जाण्यासाठी माहूर ते नागपूर जाणाऱ्या बसमध्ये चढल्या. तिकीट काढण्यासाठी पर्समधून पैसे काढताना त्यांना तीन हजार रुपयांची रोकड आणि सोन्याचे मंगळसूत्र गायब असल्याचे लक्षात आले.

मंगळसूत्राला सोन्याचे पदक असून त्याचे वजन नऊ ग्रॅम आणि किंमत ३८ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे. चोरीची माहिती त्यांनी जावयाला दिल्यानंतर बसस्थानकावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. मात्र, संशयित व्यक्ती दिसून आली नाही.

नागपूर येथे महत्त्वाचे काम असल्याने त्या जावयाकडून पैसे घेऊन घरी परतल्या. मंगळसूत्राचा घरी आणि इतर ठिकाणी शोध घेतल्यानंतरही ते मिळाले नाही. अखेर ९ ऑक्टोबर रोजी त्यांनी पोलिसांत तक्रार नोंदवली. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वर्धा शहर पोलीस करीत आहेत.



आज पहिला दिवस. आजचा कलर केसरी (ऑरेंज). मॉ दुर्गा पूजा उत्सव समिती, दयाल नगर (काली माता)

## पुलाच्या १५ फूट खोल खड्ड्यात दुचाकीसह दोघे कोसळले

### कंत्राटदाराच्या निष्काळजीपणावर ग्रामस्थांचा संताप

**सेलू जनमाध्यम :** विकासकाम सुरू आहे की मृत्यूचा सापळा रचला आहे, सुरगाव-येळाकेळी मार्गावरील कोंगा बाभुळगाव येथील अपूर्ण पुलाच्या बांधकामस्थळी सुरक्षेचा अभाव दोन दुचाकीस्वारांच्या जीवावर बेतण्याची वेळ आली. शुक्रवारी, ९ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास दुचाकीसह १५ फूट खोल खड्ड्यात कोसळून दोघे जखमी झाले. सुदैवाने लोखंडी सळ्यांवर न पडल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, या घटनेने बांधकामस्थळी प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

रुपेश सिंदी मेश्राम (२६) आणि रितीक चेनकार (२३), दोघेही रा. सुरगाव, हे दुचाकीने येळाकेळीकडे जात होते. अंधारात अपूर्ण पुलाचा अंदाज न आल्याने त्यांची दुचाकी



थेट खोल खड्ड्यात कोसळली. रुपेश यांच्या चेहऱ्याला गंभीर स्वरूपाच्या खरचटण्याच्या जखमा झाल्या, तर रितीक यांच्या खांद्याला दुखापत झाली. दुचाकीचेही मोठे नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत दोघांना खड्ड्याबाहेर काढले. त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. शनिवारी सकाळी ग्रामस्थांच्या मदतीने दुचाकी बाहेर काढण्यात आली.

**दिवे नाहीत, रिफ्लेक्टर नाहीत, सुरक्षेची व्यवस्थाही नाही**

बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी रात्री वाहनचालकांना धोक्याची सूचना देणारे दिवे, रेडियम रिफ्लेक्टर आणि सुरक्षित कठडे नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कंत्राटदार आणि संबंधित प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे. आणखी एखाद्या निष्पापाचा बळी जाण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने सुरक्षा उपाय करावेत, अशी संतप्त मागणी नागरिकांनी केली आहे.



## चारचाकीतून बकऱ्या चोरणारा नागपुरातील आरोपी २४ तासांत जेरबंद

### रामनगर पोलिसांची कारवाई, तीन लाखांची कार आणि १५ हजारांची रोकड जप्त

**वर्धा जनमाध्यम :** रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चारचाकी वाहनात बकऱ्या भरून चोरी करणाऱ्या आरोपीला रामनगर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत नागपुरातून ताब्यात घेतले. नितीन माहुरे असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली तीन लाख रुपये किमतीची कार आणि १५ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तुकाराम वॉर्ड येथील संजय शंकरराव ठाकरे यांच्या २० ते २५ बकऱ्या आहेत. त्यांच्या आई बकऱ्या चारण्यासाठी रामनगरमधील सुखकर्ता नगर परिसरात घेऊन गेल्या होत्या. दुपारच्या सुमारास त्या जवळच्या मंदिरात पाणी पिण्यासाठी गेल्या असता, चार बकऱ्या बेपत्ता झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. परिसरात शोध घेऊनही बकऱ्या मिळून आल्या नाहीत. दुसऱ्या दिवशी संजय ठाकरे यांनी शोध घेतला असता, परिसरातील नागरिकांनी सिल्वर रंगाच्या चारचाकी वाहनातून बकऱ्या नेल्याची माहिती दिली. चोरीला गेलेल्या दोन बोकड आणि दोन बकऱ्यांची एकूण किंमत ३२ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले.

गुन्हा दाखल होताच रामनगर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. टोलनाक्यांवरील माहितीच्या आधारे वाहनाचा माग काढत नागपुरातील पाचपावली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तांडापेठ, हावडा रेल्वे लाइन परिसरातून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून तीन लाख रुपये किमतीची एमएच ३१ डीके ५५९६ क्रमांकाची कार आणि बकऱ्या विकून मिळालेल्या पैशांपैकी १५ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक आणि रामनगरच्या पोलीस निरीक्षक पौर्णिमा राखुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिनेश कांबळे तसेच पोलीस अंमलदार कैलास वालदे, विशाल देवकते, गजानन मस्के आणि प्रसाद शिंदे यांनी ही कारवाई केली.

## हिंदी विद्यापीठात स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान

### 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत कुलगुरूंच्या हस्ते ७२ स्वच्छता कर्मचाऱ्यांचा गौरव

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांच्या वतीने भारत सरकारच्या 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत ८ ऑक्टोबर रोजी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांच्या हस्ते स्वच्छता कर्मचाऱ्यांचा त्यांच्या मोलाच्या योगदानाबद्दल गौरव करण्यात आला.

तुलसी भवन येथील गालिब सभागृहात आयोजित या कार्यक्रमात एकूण ७२ स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. बालाजी चिरडे यांनी कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी विद्यापीठातील स्वच्छता व्यवस्था



सुरळीत ठेवण्यात स्वच्छता कर्मचाऱ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. स्वच्छ आणि निरोगी परिसराच्या निर्मितीत स्वच्छता कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे असून, त्यांच्या श्रमांचा आणि समर्पणाचा सन्मान करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विधू खरे दास आणि डॉ. हेमचंद्र ससाणे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी बुद्धदास मिरगे यांनी केले.

७२ स्वच्छता कर्मचाऱ्यांचा गौरव करून विद्यापीठाने त्यांच्या श्रम, सेवा आणि समर्पणाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. भारत सरकारच्या 'स्वच्छता ही सेवा' अभियानाच्या भावनेशी सुसंगत असलेला हा उपक्रम स्वच्छतेविषयी जनजागृती वाढविण्यासोबतच स्वच्छतेच्या कार्यात योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचा सन्मान करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

## विजय वडेट्टीवारांकडून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला २५ हजारांची मदत

**साहूर जनमाध्यम :** नापिकी आणि आर्थिक विवंचनेने रामरावजी बोटरे यांचे आयुष्य संपविले. २६ सप्टेंबर रोजी त्यांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. घरचा कर्ता पुरुष गेल्याने उघड्यावर पडलेल्या त्यांच्या कुटुंबाची व्यथा ऐकताना पत्नीला अश्रू अनावर झाले. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी धाडी येथे भेट देत कुटुंबाला २५ हजार रुपयांची आर्थिक मदत केली.

पतीच्या निधनानंतर कुटुंबाच्या भविष्याचा प्रश्न बोटरे यांच्या पत्नीसमोर उभा ठाकला आहे. घरचा आधारच हरपल्याने त्यांच्या संसारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आपले दुःख व्यक्त करताना त्यांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली. या हृदयद्रावक प्रसंगाने उपस्थितांचेही मन हेलावले.

वडेट्टीवार यांनी कुटुंबाचे सांत्वन करून काँग्रेस पक्ष त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले. भविष्यातही सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या वेळी अभ्युदय



मेघे, शेखर शेंडे, अनंत मोहोड, सुनील कोल्हे, चंद्रशेखर चोरे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. २५ हजारांची मदत दुःख भरून काढणारी नसली, तरी संकटाच्या काळात माणुसकीचा आधार देणारी ठरली.

## तार कुंपणाचे कंत्राट देऊनही काम नाही; नागपूरच्या वृद्धाची एक लाखाने फसवणूक

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** शेताला तार कुंपण घालण्याचे कंत्राट देत नागपूर येथील ६५ वर्षीय वृद्धाने तीन लाख रुपये दिले. मात्र, संबंधितांनी शेतात कुंपणाचे काम केले नाही. वारंवार मागणी केल्यानंतर दोन लाख रुपये परत करण्यात आले; परंतु उर्वरित एक लाख रुपये देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कारंजा पोलिसांनी वाशीम जिल्ह्यातील दोघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

राजू निमजे (वय ६५, रा. नागपूर) यांच्या राहटी शिवारातील शेताला तार कुंपण घालण्याचे काम भीमदास इंगोले (रा. कारंजा लाड) आणि राजेश मोहिते (रा. मंगरूळपीर) यांना देण्यात आले होते. या कामासाठी निमजे यांनी दोघांना तीन लाख रुपये दिले होते. मात्र, पैसे घेऊनही संबंधितांनी शेतात कुंपणाचे काम पूर्ण केले नाही.

### तीन लाख रुपये दिले, दोन लाख परत मिळाले, उर्वरित रक्कमेसाठी टाळाटाळ, कारंजा पोलिसांत दोघांविरुद्ध गुन्हा

काम होणार नसेल तर दिलेली रक्कम परत करण्याची मागणी निमजे यांनी केली. त्यानंतर संबंधितांकडून दोन लाख रुपये ऑनलाइन व्यवहाराद्वारे परत मिळाले. मात्र, उर्वरित एक लाख रुपये अद्याप मिळालेले नाहीत. रक्कम परत करण्याचे आश्वासन देऊनही दोघांकडून टाळाटाळ होत असल्याचे निमजे यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

पोलिसांनी चौकशीसाठी संबंधितांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी फोन स्वीकारला नसल्याने व्हॉट्स?पद्वारे नोटीस बजावण्यात आली. तरीही ते चौकशीसाठी हजर झाले नसल्याचे पोलिसांच्या अहवालात नमूद आहे.

प्राथमिक चौकशीत फसवणुकीचा संशय व्यक्त करण्यात आल्याने पोलीस उपनिरीक्षक सतीश जायभाये यांच्या अहवालावरून ९ ऑक्टोबर रोजी कारंजा पोलिसांत भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.


## जाहीर नोटीस

माझे पक्षकार श्री. दिगंबर मुरलीधर चांदेकर हे मौजा बाबुळगाव (खोसे), तहसील देवळी, जिल्हा वर्धा येथील, ग्रामपंचायत बाबुळगाव (खोसे) यांच्या हद्दीतील मिळकत अनुक्रमांक ३२६, घर क्रमांक ३२६ (जुना घर क्रमांक ३१०), क्षेत्रफळ १५०० चौ. फूट या स्थावर मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. सदर मिळकतीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत. पूर्वेस : दावरावजी कानडे यांचे घर, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : कुलदीप तापरे यांचे घर, दक्षिणेस : गजानन बोबडे यांचे घर, माझे पक्षकार श्री. दिगंबर मुरलीधर चांदेकर हे सन २०१३-२०१४ पासून सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार असून, त्याबाबत ग्रामपंचायत बाबुळगाव (खोसे) यांनी निर्गमित केलेले सन २०१३-२०१४ ते सन २०१७-२०१८ या कालावधीतील मिळकत कर आकारणीचे उतारे उपलब्ध आहेत. तसेच, भूमी व महसूल विभागाने दिनांक २१/०८/२०२६ रोजी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्रानुसार सदर मिळकत गावठाण क्षेत्रात समाविष्ट असल्याचे नमूद आहे.माझे पक्षकार सदर मिळकतीबाबत श्री. आकाश चांदेकर यांच्या नावे बक्षीसपत्र (गिफ्ट डीड) निष्पादित करणार आहेत. श्री. आकाश चांदेकर यांनी सदर मिळकतीच्या अनुषंगाने जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्याकडे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.तरी सदर मिळकतीवर किंवा प्रस्तावित व्यवहारासंदर्भात कोणत्याही व्यक्तीचा, बँकेचा, वित्तीय संस्थेचा किंवा अन्य कोणत्याही संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, बोजा, तारण, गहाण, धारणाधिकार, अन्य भार किंवा कायदेशीर स्वरूपाचा अधिकार असल्यास, अशा संबंधित व्यक्तींनी किंवा संस्थांनी आपला दावा अथवा हरकत आवश्यक त्या पुराव्यांसह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात सादर करावी.विहित मुदतीत कोणताही दावा अथवा हरकत प्राप्त न झाल्यास, उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे व लागू कायद्याच्या अधीन राहून सदर प्रस्तावित व्यवहार पुढे नेण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दाव्यांबाबत कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

ठिकाण : वर्धा
दिनांक : ११/१०/२०२६

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा.**

# आमिर खान वर्षा निवासस्थानी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत विशेष बैठक

**मुंबई** - राज्यात लवकरच सुरु होणाऱ्या वॉटर कप अभियानाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंधारण विषयक कामाच्या अनुषंगाने बैठक घेतली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने काम करावे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला प्राधान्य देऊन पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. पानी फाउंडेशनसह विविध स्वयंसेवी



संस्थांच्या कामांना प्रशासकीय यंत्रणेने सक्रिय सहकार्य करून या मोहिमेला गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जानेवारी ते मे या कालावधीत शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती उपक्रम राबवून पावसाळ्यापूर्वी जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात येईल.

यंदाचे वर्ष आव्हानात्मक असले, तरी निराशेचे रूपांतर आशेत करून जनतेमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे आवश्यक आहे. राज्यातील प्रत्येक गावातील प्रत्येक घराने जलसंवर्धनाच्या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन पानी फाउंडेशनचे संस्थापक आणि अभिनेते आमिर खान यांनी केले.

दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. अडचणीच्या काळात समर्पित भावनेने जलसंधारणाच्या कामांसाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. या बैठकीत निश्चित झालेल्या संकल्पनांच्या आधारे एकात्मिक कार्ययोजना तयार करावी.

# दिवस अन् ठिकाण ठरले! काँग्रेसकडून सर्व आमदार, खासदारांसाठी आदेश सुटले

**नवी दिल्ली:** दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू असताना दुसरीकडे काँग्रेसच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. सरकारविरोधात मोठं आंदोलन उभारण्याची तयारी इंडिया आघाडीनं सुरू केली आहे. काँग्रेस हायकमांडकडून सर्व आमदार , खासदारांना दिल्लीत उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी काँग्रेसनं लावून धरली आहे. यासाठी गेले तीन दिवस काँग्रेसनं दिल्लीत आंदोलनं केली. लोकसभेचे



विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी आंदोलनांचं नेतृत्त्व केलं. दिल्ली पोलिसांनी दोनवेळा त्यांना ताब्यात घेतलं. राहुल गांधी यांच्यासह इंडिया आघाडीच्या १० नेत्यांनी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करण्याची मागणी इंडिया आघाडीनं राष्ट्रपतींकडे केली.

सलग तीन दिवस दिल्लीत आंदोलनं केल्यानंतर आता सोमवारी म्हणजेच १२ ऑक्टोबरला पुन्हा एकदा प्रचंड आंदोलन उभारण्याची तयारी काँग्रेसनं सुरू केली आहे. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनं पक्षाच्या सगळ्या आमदार, खासदारांना १२ ऑक्टोबरला दिल्लीत उपस्थित राहण्याच्या सूचना केल्या आहेत. सध्याच्या घडीला देशात काँग्रेसचे १२८ खासदार आणि सव्वा सातशेच्या वर आमदार आहेत. या सगळ्यांना उद्या रात्रीपर्यंत दिल्ली गाठण्याच्या सूचना दिल्या गेल्या आहेत. सर्व प्रदेशाध्यक्ष आणि महत्त्वाच्या नेत्यांनादेखील दिल्लीत पोहोचण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## संक्षिप्त

### केकमध्ये मिळाले रबराचे तुकडे

**छत्रपती संभाजीनगर :** नागरिकांच्या आरोग्याशी खेळणारा एक अत्यंत संतापजनक प्रकार चिकलठाणा एमआयडीसी परिसरात उघडकीस आला आहे. एका प्रसिद्ध बेकरीत तयार केलेल्या कप केकमध्ये थेट रबर आणि प्लास्टिकचे तुकडे आढळल्याने खळबळ उडाली आहे. या गंभीर तक्रारीची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाने तातडीने धाड टाकून 'रॉयल बेकर्स अँड कन्फेक्शनर्स'च्या अस्वच्छ कारभाराची पोलखोल केली असून, या बेकरीचा अन्न परवाना तडकाफडकी निलंबित केला आहे. रॉयल बेकर्सकडून विक्री करण्यात येणाऱ्या कप केकमध्ये रबर आणि प्लास्टिकचे तुकडे निघाल्याची तक्रार एका सजग ग्राहकाने एफडीएकडे केली होती. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अन्न सुरक्षा अधिकारी पी. एस. अजिंठेकर यांनी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी या बेकरीची अचानक पाहणी केली. या तपासणीदरम्यान बेकरीच्या उत्पादन युनिटमध्ये आरोग्याच्या नियमांचा पुरता बोजवारा उडाल्याचे निदर्शनास आले.



### प्रियकराने अपहरण करून दरीत ढकलले

**कोल्हापूर** - तरन्नुम बशीर नाईक ही तरुणी बेपत्ता होती, मात्र तिचे प्रियकर श्रीपाद दिनकर वडरने अपहरण केले होते. शिवडाव-नाईकवाडी इथल्या दरीकडे तिला घेऊन जाऊन तिला दरीत ढकलून दिले.कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील शिवडाव-नाईकवाडीत थरकाप उडवणारी आणि मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. प्रेयसीचे लग्न ठरल्याच्या रागातून तिच्याच प्रियकराने तिचे अपहरण करून तिला दरीत ढकलून खून केल्याची कबुली दिली. मृत तरुणीचे नाव तरन्नुम बशीर नाईक असून ती इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होती. शुक्रवारपासून ती अचानक बेपत्ता झाल्यामुळे तिच्या कुटुंबीयांनी आणि पोलिसांनी तिचा शोध सुरू केला होता. या प्रकरणात तिचा प्रियकर श्रीपाद दिनकर वडर यानेच तिचे अपहरण करून खून केल्याचे भुदरगड पोलिसात कबुल केले.



### पैशाचा गंडा घालणाऱ्या आरोपीला वाशी पोलिसांनी अटक

**नवी दिल्ली** -लग्नासाठी जोडीदार शोधणाऱ्या महिलेला मॅट्रिमोनियल साइटवरून संपर्क साधत तब्बल ६ लाख २५ हजार रुपयांचा गंडा घालणाऱ्या आरोपीला वाशी पोलिसांनी अटक केली आहे. नागेश अर्जुन पवार असं मुख्य आरोपीचं नाव असून, पोलिसांना गुंगारा देण्यासाठी तो गेल्या चार दिवसांपासून वेगवेगळ्या ठिकाणी लपून राहत होता. अखेर तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी मीरा-भाईंदरमधील एका लॉजचा शोध घेतला. मात्र, आरोपीला संशय येऊ नये म्हणून पोलिसांनी चक्क डिलिव्हरी बॉयचा वेश धारण केला आणि त्याला ताब्यात घेतलं. या प्रकरणात आणखी एका आरोपीलाही अटक करण्यात आली असून, दोघांची चौकशी सुरू आहे.



### अभिनेता इम्रान खान पोलिसांच्या ताब्यात

**मुंबई :** दिल्लीतील कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुंबईतही निदर्शने करण्यात आली. या पार्श्वभूमीवर बॉलिवूड अभिनेता इम्रान खान याला मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे वृत्त समोर आले आहे. ऑगस्ट क्रांती मैदानावरील प्रस्तावित आंदोलनाच्या ठिकाणी ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. ताब्यात घेतल्यानंतर इम्रानने पोलिसांच्या व्हॅनमधील स्वतःचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला. त्यासोबत त्याने मिश्कील कॅप्शन दिल्याने सोशल मीडियावर त्याची चर्चा सुरू झाली आहे.अभिनेता आमिर खानचा भाचा असलेल्या इम्रान खानने पोलिसांच्या व्हॅनमधील फोटो शेअर करत, 'बहुतेक मी फिरायला चाललो आहे' असे लिहिले. या पोस्टनंतर त्याच्या चाहत्यांसह सोशल मीडिया युजर्समध्ये चर्चा सुरू झाली. पोलिस कर्मचारी त्याला वाहनात बसवून घेऊन जात असल्याचे कथित दृश्य असलेला व्हिडीओही सोशल मीडियावर समोर आला आहे.एएनआयच्या वृत्तानुसार, प्रसारमाध्यमांशी बोलताना इम्रानने आपण कोणतीही विशिष्ट मागणी घेऊन आंदोलनाच्या ठिकाणी आलो नसल्याचे सांगितले. मुंबईचा रहिवासी आणि एक सामान्य नागरिक म्हणून लोकांच्या हालचालींवर निर्बंध का घातले जात आहेत, तसेच त्यांचा आवाज का दाबला जात आहे, हे जाणून घेण्यासाठी आपण येथे आल्याचे त्याने स्पष्ट केले.'माझ्या कोणत्याही मागण्या नाहीत. मी या शहरात राहणारा एक नागरिक म्हणून येथे आलो आहे. लोकांच्या मुक्तपणे फिरण्याच्या स्वातंत्र्यावर निर्बंध का घातले जात आहेत आणि त्यांचा आवाज का दाबला जात आहे.



# आता भाजपची राजवट जाणार- आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल

**मुंबई :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीच्या मुद्यावरुन देशातील वातावरण चांगलच गरम झाल्याचं पाहायला मिळत आहे. आज मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानावर आंदोलनाची हाक देण्यात आली होती. मात्र तत्पूर्वीच मुंबईतील अनेक भागात कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्याचं काम मुंबई पोलिसांकडून करण्यात आले. महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांना देखील पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. दरम्यान, या सगळ्या मुद्याव शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सरकारवर टीका केली आहे. देशभरात आंदोलन सुरु आहेत.

अभिजित असेल सौरव असे त्यांना ताब्यात घेतलं आहे. भाजपची राजवट आता जाणार हे ठरलं आहे अशी टीका आदित्य



ठाकरेंनी केली. आता भाजप विरुद्ध भारत असा संघर्ष असल्याचे ठाकरे म्हणाले.

**कोणाला जरी ताब्यात घेतलं तिथे आम्ही जाणार**

देशभरात आंदोलन सुरु आहेत. अभिजित असेल सौरव असे त्यांना ताब्यात घेतलं आहे. तुषार गांधी शांततापूर्ण आंदोलन करणार होते पण त्यांना आधीच ताब्यात आणलं गेलं. आधी त्यांना डी. एन. नगर पोलीसस्थानकात घेऊन गेलो होतो. देशप्रेमी लोकांना अटक केली जात आहे. परिवर्तन होणारच असेही ठाकरे म्हणाले. इथून आता आम्ही डोंगरी पोलीस स्थानाकात जात आहोत. तुषार गांधी यांना आता सोडलं आहे. दिवसभर त्यांचा छळ केल्यावर सोडल्याचे ठाकरे म्हणाले.

आजपासून आम्ही सगळ्या मित्रपक्षांनी ठरवलं आहे की कोणाला ताब्यात घेतलं तिथे आम्ही जाणार आहोत. एकाला जरी हात लागला तरी आम्ही शांत बसणार नाही असा इशारा ठाकरेंनी दिला.

आणीबाणी लागू केली आहे. विमानातून उचलल गेलं. तरुण पिढीची इतकी भीती का वाटत आहे असा सवाल ठाकरेंनी केला. आम्ही सगळे आता रस्त्यावर उतरणार आहोत. भाजप विरुद्ध भारत आता असा संघर्ष आहे. आम्हाला जसं कळलं की ताब्यात घेतलं आहे, आम्ही सगळे इथे निघून आलो. ज्या प्रकारे देशात आंदोलन सुरु आहे, त्यामुळं आता दिल्ली दूर नाही असेही ते म्हणाले.

# अभिजीत दिपके यांच्या आजीचे निधन

**नवी दिल्ली** - मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीने दिल्लीत जंतर-मंतर येथे आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनासाठी दिल्लीत पोहोचलेले सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना विमानतळावरच पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. एकीकडे दिल्लीत आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला असतानाच दुसरीकडे दिपके कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## नातू दिल्लीत पोलिसांच्या ताब्यात, अंत्यसंस्कारासाठी गावी परतण्याची शक्यता



अभिजीत दिपके यांच्या आजी सावित्रीबाई शंकर दिपके यांचे आज सकाळी निधन झाले. हिंगोली जिल्ह्यातील संतुक पिंपरी या मूळ गावी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

सावित्रीबाई दिपके गेल्या काही महिन्यांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. मात्र, शनिवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. अभिजीत दिपके दिल्लीतील आंदोलनासाठी गेले असतानाच त्यांच्या आजींच्या निधनाची बातमी समोर आली. सावित्रीबाई यांनी नातवाच्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. त्यांच्या निधनामुळे कुटुंबीयांसह संतुक पिंपरी परिसरात शोक व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सावित्रीबाई दिपके यांच्या अंत्यसंस्कारासाठी कुटुंबीय हिंगोलीतील संतुक पिंपरी येथे जाणार आहेत. अभिजीत दिपके हेदेखील आजींच्या अंत्यसंस्कारासाठी दिल्लीतून महाराष्ट्रात परतण्याची शक्यता आहे. मात्र, ते सध्या दिल्ली पोलिसांच्या ताब्यात असल्याने त्यांना गावी परतण्यासाठी परवानगी मिळणार का, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

# रोहित पवारांचे डोके मेंढराच्या डागनीने डागले पाहिजे- पडळकर

**नवी दिल्ली** - एमपीएससीच्या वतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षांमध्ये गोंधळ सुरूच आहे. यावरून राज्यात वातावरण चांगलंच तापलं आहे. एमपीएसचीच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विद्यार्थ्यांमधून होत आहे. त्यासाठी पुण्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांनी मोठं आंदोलन देखील उभारलं. आता या आंदोलनावरून गोपीचंद पडळकर यांनी रोहित पवारांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. रोहित पवार



यांचे डोके मेंढराच्या डागनीने डागले पाहिजे, त्यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा तमाशा केला असं पडळकर यांनी म्हटलं आहे. दरम्यान पडळकर यांच्या या विधानामुळे आता वातावरण तापण्याची शक्यात आहे.

# त्यांनी अंधारात ठेवून संधी साधली सुनेत्रा पवार यांचा बंडखोरांवर पलटवार

**बारामती-** सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत विद्यमान चेअरमन पुरूषोत्तम जगताप यांनी वेगळी वाट चोखंदळली. अजितदादांचे विश्वासू सहकारी असलेल्या जगताप यांच्या या निर्णयाने राष्ट्रवादीला धक्का बसला. त्यावरून काल झालेल्या सभेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली. दादांना जाऊन आठ महिने झाले, त्यांच्या नंतरची ही पहिली निवडणूक आहे. आपण सर्वजण पोरके झालो. आम्ही जास्त पोरके झालो, दादाची शिकवण होती. आपण रडायचं नाही, लढायचं असा ठाम निर्धार त्यांनी या सभेतून व्यक्त केला.

त्यांनी जवळच्याच व्यक्तींच्या वर्तनावर टीका केली. या निवडणुकीत आपल्याला अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. ज्यांच्यावर भरोसा, विश्वास ठेवला, त्यांनी आपल्याला बेसावध ठेवून अगोदरच सर्व तयारी केली होती. अंधारात ठेवून त्यांनी ऐनवेळी संधी साधली. त्या भस्मासुराच्या विरोधात आपला लढा आहे, असा इशारा त्यांनी नाव न घेता पुरूषोत्तम




जगताप यांना दिला.

दादा गेल्याचं आपण अजिबात भांडवलं केलं नाही. जे आता बाजूला गेले, दादा हे त्यांची खरंच प्रेरणा होते का? की दादांची त्यांना अडचण होती? असा खणखणीत सवालही त्यांनी केला.

मी भावनिक आहे, मी तर त्यांचं कुटुंब आहे. यांनी पहिल्या दिवसापासून दिशाभूल करण्याचा कार्यक्रम केला. दादांचे फोटो वापरले. दादांचा आवाज वापरला. शेवटी माझ्याही आवाजाचा वापर केला. सर्वांना कोण भुलवतं आहे? कुठलं मार्केटिंग सुरू आहे, अशी जोरदार टीका त्यांनी विरोधकांवर केली.

जिल्हा परिषद निवडणूक झाली की कुटुंबाला वेळ देण्याचा शब्द दिला होता असे सांगत सुनेत्रा पवार यांना अश्रु अनावर झाले.

तुमची ही वहिनी, शेवटपर्यंत तुमच्यासोबत राहील असे त्या म्हणाल्या. पुढील पॅनलमध्ये उमेदवार पाहिले तर पाच नावं जुनी आहेत.

बाकीचे उमेदवार नवीन आहेत. कारखान्याचा कारभार समजायला त्यांची टर्म संपेल. त्यांना ताटाखाली राहणारं मांजर हवंय असा टोला त्यांनी पुरूषोत्तम जगताप यांना लगावला.

# तुषार गांधींना एका पोलीस ठाण्यातून दुसऱ्या ठाण्यात नेले

**मुंबई :** राजधानी दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीने एसआयआर आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन पुकारले होते. तर, मुंबईतही सीजेपीचे कार्यकर्ते आझाद क्रांती मैदानावर आंदोलनासाठी एकत्र आले होते. त्यासाठी, महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी हेही आपल्या घरातून क्रांती मैदानाकडे निघाले असता मुंबई पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं होतं. अखेर, ८ तासांच्या स्थानबद्धतेनंतर आणि शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांच्या इशाऱ्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले आहे. मात्र, पोलिसांनी त्यांची एका पोलीस ठाण्यातून दुसऱ्या पोलीस ठाण्यात रवानगी केली होती, अशी माहितीही समोर आली आहे.तुषार गांधींना एका पोलीस ठाण्यातून दुसऱ्या ठाण्यात नेण्यात आलं होतं. त्यातच, याबाबत माहिती मिळताच खासदार संजय राऊतांसह आमदार आदित्य ठाकरेंनी पोलीस स्टेशन गाठत पोलिसांना इशारा दिला होता. जोपर्यंत तुषार गांधी



यांना सोडून दिले जात नाही, तोपर्यंत पोलीस स्टेशन न सोडण्याचा इशारा आदित्य यांनी दिला होता. त्यानंतर, अखेर ८ तासांनी तुषार गांधींची सुटका करण्यात आली. तुषार गांधी ८ तासांहून अधिक वेळ मुंबई पोलिसांच्या ताब्यात होते, आदित्य ठाकरे येणार कळताच मुंबई पोलिसांनी तुषार गांधी यांना दुसऱ्या पोलीस स्थानकात फिरवलं. गांधी यांना वांद्रे येथून ताब्यात घेतल्यानंतर आधी डी.एन.नगर पोलीस स्थानकात ठेवण्यात आले होते.

# विहिरीत पडलेल्या बिबट्याला बाहेर काढण्यात सहा तासानंतर यश



## वनविकास महामंडळाची यशस्वी कामगिरी

**चंद्रपूर :** कोठारी येथे वनविकास महामंडळाच्या वन वसाहतीतील विहिरीत मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्या पडल्याची घटना शनिवारला सकाळी उघडकीस आली. वनविभागाचे अधिकारी तथा कर्मचारी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बिबट्याला बाहेर काढण्यासाठी बचाव मोहिम राबविण्यात आली. तब्बल सहा तासानंतर बिबट्याला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. वन विकास महामंडळाच्या कक्ष क्रमांक चार मध्ये सोडण्यात आले.

वनविकास महामंडळाच्या वन वसाहतीतील विहिरीतुन सकाळी बिबट्याचा आवाज ऐकू येत होता. अश्यातच या विहिरीजवळ गेलेल्या एका व्यक्तीला विहिरीत बिबट्या दिसला. त्याने लगेचच ही माहिती वन विकासमहामंडळाचा अधिकाऱ्यांनी दिली. महामंडळ आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठले. यावेळी वनविकास महामंडळाचे सहाय्यक व्यवस्थापक कल्पना चिंचखेडे व कोठारी क्षेत्राचे सहाय्यक वनसंरक्षक आदेशकुमार शेडगे उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनात बिबट्याला सुरक्षितपणे विहिरीतून बाहेर काढण्यासाठी मोहीम सुरू झाली.विहिरीत खाट टाकून त्यास काढण्याचा प्रयत्न केला मात्र यश आले नाही.अखेर विहिरीत पिंजरा टाकण्यात आला.पिंजऱ्यात बिबट्याला खाण्यासाठी कोंबड्या ठेवण्यात आल्या. ही योजना कामी आली.

पिंजऱ्यात बिबट्या जाताच पिंजराचा दरवाजा बंद करण्यात आला.विहिरीतून सुरक्षित बाहेर काढल्यानंतर बिबट्याला वन विकास महामंडळाच्या कक्ष क्रमांक चारमध्ये मुक्त करण्यात आले.या बचाव मोहिमेत झरण वनाधिकारी संदीप मडावी, क्षेत्रसाहाय्यक परमेश्वर कर्नेवाड, रुपाली मडावी,अविनाश गुगलोत,दिनेश आडे,अतुल मोहूर्ले तसेच इतर वनकर्मचारी व वनमजुरांचा सहभाग होता.

सध्या शेतात कापूस धान, मिरची, सोयाबीन पिके उभे आहेत. वन्यजीवांच्या शेतात हैदोस सुरु आहे. त्यामुळे शेतकरी जागलीला जात आहेत.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## तरुणाई आणि आंदोलन

एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेतील कथित त्रुटी, भरतीतील विलंब आणि वयोमर्यादेच्या प्रश्नांमुळे पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. या अस्वस्थतेची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेत चौकशीसाठी घटनात्मक प्रक्रियेचा मार्ग सुचवला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर संवादातून तोडगा निघण्याची आशा निर्माण झाली आहे. महाराष्ट्राची शैक्षणिक आणि सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभाराविरोधात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. राज्यभरातून आलेल्या तरुणांनी आपल्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. १ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या आंदोलनातून विद्यार्थ्यांमधील अस्वस्थता आणि व्यवस्थेकडून असलेल्या अपेक्षा स्पष्ट होत आहेत. परीक्षांमधील कथित गैरव्यवहार, उत्तरतालिकांमधील चुका आणि वारंवार पुढे ढकलले जाणारे वेळापत्रक यांमुळे विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. या तरुणांच्या मागण्यांकडे केवळ आंदोलन म्हणून न पाहता, स्पर्धा परीक्षा व्यवस्थेतील सुधारणा करण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारा विद्यार्थी हा केवळ स्वतःच्या भवितव्यासाठी धडपडत नसतो, तर त्याच्यामागे त्याच्या कुटुंबाच्या अनेक अपेक्षा असतात. शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी मर्यादित आर्थिक साधनांमध्ये राहून अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगतात. पुण्यासारख्या शहरात राहण्याचा आणि अभ्यासाचा खर्च पेलत अनेक तरुण वर्षानुवर्षे परीक्षांची तयारी करतात. अशा परिस्थितीत परीक्षा वेळेवर न होणे, उत्तरतालिकांमधील त्रुटी आणि भरती प्रक्रियेतील विलंबाचा त्यांच्या तयारीवर परिणाम होतो. अनेकदा वयोमर्यादा ओलांडण्याची वेळ येत असल्याने विद्यार्थ्यांची चिंता आणखी वाढते. त्यामुळे परीक्षा प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे आणि विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास टिकवणे ही महत्त्वाची जबाबदारी आहे. पुण्यात अलका टॉकीज चौक, शास्त्री रोडसह तीन ठिकाणी विद्यार्थी आंदोलन करत आहेत. काही विद्यार्थ्यांची यूपीएससीच्या धर्तीवर वर्णनात्मक परीक्षा पद्धतीची मागणी आहे, तर काहींना वस्तुनिष्ठ पद्धतीत सुधारणा अपेक्षित आहेत. परीक्षा पद्धतीबाबत मतभेद असले, तरी आयोगाच्या कामकाजात पारदर्शकता, प्रलंबित भरती प्रक्रिया पूर्ण करणे आणि कारभारातील त्रुटींना जबाबदार असलेल्यांची चौकशी करणे, या मुद्द्यांवर विद्यार्थ्यांचा भर आहे. आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणीही आंदोलनातून पुढे आली आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर चर्चा करून व्यवहार्य आणि न्याय्य मार्ग काढणे आवश्यक आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारल्यानंतर आंदोलन केल्याप्रकरणी ५१ विद्यार्थी आणि २९ खासगी शिकवणी व अभ्यासिका चालकांना नोटिसा बजावल्याची बाब समोर आली आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी प्रशासनाची असली, तरी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर संवादातून मार्ग काढण्यालाही तितकेच महत्त्व आहे. आंदोलनातील विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन, नियमांच्या चौकटीत राहून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेतल्यास तणाव कमी होण्यास मदत होईल. या संपूर्ण प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली दखल महत्त्वाची आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे विद्यमान आणि माजी अध्यक्ष तसेच सदस्यांविरोधात भारतीय संविधानाच्या कलम ३१७ अंतर्गत कारवाईसंबंधी चौकशी समिती स्थापन करण्याची शिफारस मुख्यमंत्र्यांनी राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांच्याकडे केली आहे. आयोगाच्या कामकाजाबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची गंभीर दखल घेऊन घटनात्मक प्रक्रियेच्या माध्यमातून चौकशीचा मार्ग स्वीकारण्याची तयारी शासनाने दर्शवली आहे. ही बाब विद्यार्थ्यांच्या तक्रारींची दखल घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानता येईल. मात्र, या प्रक्रियेचे पुढील टप्पे घटनात्मक तरतुदींनुसार पार पडणे आवश्यक आहे. चौकशीतून वस्तुस्थिती स्पष्ट होऊन जबाबदारी निश्चित व्हावी आणि आयोगाच्या कामकाजात आवश्यक सुधारणा घडाव्यात, ही अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला राजकीय नेत्यांनीही पाठिंबा दिला आहे. रोहित पवार, सुप्रिया सुळे, विश्वजित कदम आणि राज ठाकरे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला आहे. फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून समस्येवर तोडगा काढण्याची विनंती केली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना विविध स्तरांवरून मिळणारा प्रतिसाद सकारात्मक आहे. मात्र, या विषयाचे राजकीय आरोप-प्रत्यारोपांमध्ये रूपांतर होण्याऐवजी शासन, आयोग आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यात समन्वय साधला जाणे अधिक आवश्यक आहे. त्यातूनच विद्यार्थ्यांना ठोस दिलासा मिळू शकतो. महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही स्वायत्त संस्था असली, तरी तिच्या कामकाजातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांबाबत विद्यार्थ्यांच्या मनात विश्वास असणे गरजेचे आहे, परीक्षा वेळापत्रकाचे काटेकोर पालन, उत्तरतालिकांमधील त्रुटींचे वेळेत निराकरण आणि प्रलंबित भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी स्पष्ट कृती आराखडा तयार केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या वयोमर्यादेबाबतच्या मागणीचाही नियम आणि उपलब्ध पर्याय लक्षात घेऊन सहानुभूतीपूर्वक विचार व्हायला हवा. मुख्यमंत्री आणि शासनाने या प्रश्नांची दखल घेतल्याने संवादातून मार्ग निघण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. आता या सकारात्मक भूमिकेचे रूपांतर ठोस निर्णयांत होणे महत्त्वाचे आहे. राज्याचा तरुण हा महाराष्ट्राच्या विकासाचा आधार आहे. त्याच्या मेहनतीला योग्य संधी आणि न्याय्य परीक्षा व्यवस्था मिळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आंदोलन करण्याची वेळ का आली, याचा विचार करून त्यांच्या तक्रारींचे निराकरण केले पाहिजे. शासनाने दाखवलेली तत्परता, आयोगाची जबाबदारी आणि विद्यार्थ्यांचा सहभाग यांची सांगड घातल्यास या प्रश्नावर मार्ग निघू शकतो. विद्यार्थ्यांचा विश्वास पुनर्स्थापित करणे, भरती प्रक्रियेतील अनिश्चितता दूर करणे आणि स्पर्धा परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणणे, हेच या आंदोलनातून साध्य होणारे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरावे.





# राहूल गांधीचे रिट्वीट...

राहूल गांधीने मस्कच्या ट्विटला उगाच रिट्वीट केलले नाही. इलॉन मस्क सारखा अब्जाधीश सध्या ट्विटरवर भयानक संतापलेला आहे. त्याचे एक ट्विट नुकतेच राहूल गांधींनी रिट्वीट करत अजुन एकाच नाव येणे बाकी आहे असे सांकेतिक सुचवले आहे. पण मुळात एलॉन मस्क का एवढा चिडलेला त्याची मुळं ही स्टारलिंकच्या भांडणात आहे. आणि याची सुरूवात झाली ती ४ वर्षांपूर्वी. खूप सोप्पे आहे समजणे. मुकेश अंबानीने त्याच्या साम्राज्याचे दोन भाग केलेत एक भाग दिला अनंत अंबानीकडे ज्यात रिलायंस आहे आणि दुसरा भाग आकाश अंबानीकडे ज्यात टेक्नोलॉजी, कम्यूनिकेशन आणि डेटा व सॅटेलाईट इंटरनेट. हे सॅटेलाईट इंटरनेट प्रकरण येत्या काळात सगळ्यात जास्त पैसा देणारे आणि जगावर अमर्याद सत्ता मिळवून देणारे शस्त्र असणार आहे. या विषयावरून ट्रंम्प आणि मस्कचे पहिलं भांडण वाजले होते. त्या भांडणामुळे मस्कने ट्रंपसोबत फारकत घेतली.

भारतातले राजकारण हे कधीच साधे सोप्पे राहीलेले नव्हते. आपण जगाची सर्वात मोठी बाजारपेठ आहोत. कन्झ्यूम करणारी मोठी बाजारपेठ. ज्याच्या हाती भारताचा कन्झ्यूमर तो सर्वसत्ताधीश. त्यामुळे अनेकांची घुसखोरी आणि हस्तक्षेप इथं सातत्याने होत आलेला आहे.

राहूल गांधीला हे खूप नेमके माहीत आहे. आणि म्हणून योग्य वेळेला स्टारलिंकचा विषय चव्हाट्यावर आणलेला. याने अंबानी अडचणीत येईल का.. तर नाही. याने अचणीत येईल आधी मोदी मग ट्रंप आणि अदानी. यासाठी चार वर्षांपूर्वी घडलेल्या एका घटनेचा इतिहास जरा आपण पुन्हा आठवून पाह्यला पाहीजे.

विसावे शतक सोने आणि पेट्रोडॉलर साठी इतिहासात कायम लक्षात राहील. एकविसाव्या शतकातले नवे इंधन आहे तो म्हणजे डेटा. तुमचा, माझा डेटा हाच आजच्या जगात सर्वात जास्त नफा मिळवून देणारे इंधन आहे. त्यामुळे आता तेलासाठी युद्धे व्हायची ती होत नाहीत. बदललेल्या तंत्रज्ञानाने मॉडर्न टाईम वॉरफेअर सिस्टीमच बदलवून टाकली आहे.

नुकतेच आपले सुप्रीम लीडर अमेरिका दौऱ्याहून भारतात परतले. तिथे त्यांनी इलॉन मस्कची भेटही घेतली. इलॉनचे इंग्रजी असेही नीट कळत नाही. युट्यूबच्या सीसी सेक्शनला ऑन केल्यानंतर सबटायटल्समुळे इलॉन मस्क नेमका काय बोलतोय हे कळायला मदत होते. इलॉनसोबतच्या या भेटीनंतर जगभरातील भारतीय बिलेनिअर्सना व्हाईट हाऊस मध्ये आमंत्रित करून आपल्या सुप्रीम लीडर साहेबांनी त्यांच्यासोबत जेवण देखील केले. हे सगळे करण्याची नेमकी गरज काय होती ह्यावर गोदी मिडीयाने रकानेच्या रकाने लिहीलेत. स्पेशल शोज, बुलेटीन केलेत. पण, त्यात तथ्य असं काहीच आढळलं नाही. मात्र अमेरिकन मिडीयामध्ये एक पुसटसा उल्लेख मात्र पाहण्यात आला... तो उल्लेख होता ऍ्रत्ह्र्ॅत्तू ग्हीहू म्दहूर्त्ॅिदह संदर्भात.

वर उल्लेख केलेल्या अनेक स्थिती आणि प्रश्नांवर येण्याआधी आपण ऍ्रत्ह्र्ॅत्तू ग्हीहू म्दहूर्त्ॅिदह बद्दल जुजबी माहीती घेऊयात. स्टारलिंक इंटरनेट कॉन्स्टेलेशन ही सॅटेलाईट द्वारे अतिजलद इंटरनेट सेवा प्रदान करणारे तंत्रज्ञान असून त्याची उभारणी इलॉन मस्क ची एर्ज्मे ही कंपनी मागील सात वर्षांपासून करत होती. २०१९ साली एकाच वेळी ६० छोटे छोटे सॅटेलाईट अवकाशात पृथ्वीच्या लोअर ऑरबिटमध्ये सोडून ही सेवा सुरू करण्यात आली होती. आज जगभरातील ५६ देशांत स्टारलिंक त्यांची इंटरनेट सेवा पुरवत आहे. २०२३ जून महिन्यात पृथ्वीच्या याच लोअर ऑरबिट मध्ये ४००० हून अधिक सॅटेलाईट पृथ्वीच्या प्रदक्षिणा घालण्यासाठी स्पेसएक्स ने लॉंच केले आहेत. यातील प्रत्येक उपग्रहाचे वजन हे २६० किलो ते २९० किलो इतके आहे. आज आपल्याकडे ऑप्टीकल फायबर द्वारे इंटरनेट सेवा दिली जात आहे. ही ग्राऊंड बेस्ड सिस्टीम असल्यामुळे आजही भारतातील अनेक भागांत इंटरनेट सेवा पोहोचवण्यात आपण कमी पडत आहोत. परंतू स्टारलिंक इंटरनेट जगातील प्रत्येक कानाकोपऱ्यात इंटरनेट सेवा पोहोचवण्याइतरी सक्षम यंत्रणा राखून आहे.

या तंत्रज्ञानासाठी इलॉन मस्कने अफाट अशी गुंतवणूक केली आहे. त्यासाठी ओपन एआय या कंपनीतून त्याने २०१८ साली एक्झिट घेऊन सॅम अल्टमन या ज्यू लॉबीच्या सिक्रेट सोसायटीच्या लाडक्या लेकराला प्रमुखपदी विराजमान केले. त्यानंतर लगोलग ट्वीटर विकत घेऊन ट्विटरवर एकछत्री अंमल प्रस्थापित केला. सर्व महत्त्वाच्या पदांवरील बिगर ज्यू लोकांची नाटकीय पद्धतीने हकालपट्टीसत्र सुरू केले. यात जॅक डॉर्सी, इवान विलीयम्स वरचा राग जास्त होता. पण या दोघांसोबतचा तिसरा ट्विटर को फाऊंडर क्रिस्तोफर आयझॅक स्टोन मात्र अलगद बचावला. इलॉन मस्क ने हळूहळू जगातील सर्व डेटा कंपन्यांवर आपला कंट्रोल घट्ट करण्याची सुरूवात खूप आधीच केली होती. ट्वीटरच्या अधिग्रहणामुळे तो अधिकच प्रभावी झाला. ओपन एआय, चॅटजीपीटीच्या लॉंच नंतर तर इलॉन ला शह देईल इतकी ताकद गुगलला सुद्धा आजवर दाखवता आलेली नाही. कदाचित भविष्यात गुगल बार्डला तेवढं ताकदवर बनवेल देखील. पण ज्यू लॉबी एकमेकांसोबत निकोप स्पर्धा करते. एकमेकांवर नाही. असो.. मूळ मुद्द्याकडे येऊयात.

तर, अब्जावधी डॉलर्स खर्चून उभ्या केलेल्या स्टारलिंक इंटरनेट सिस्टीम साठी उपग्रहांचे (इथे शब्दशः अर्थ म्हणून स्टार किंवा तारे किंवा चांदण्या असे वाचून पहा) जे एकमेकांशी इंटरलिंक्ड असे जाळे तयार केले गेले आहे त्यासाठी भारतीय उपखंड ही इलॉन मस्कसाठी सर्वात मोठी बाजारपेठ आहे. आणि गोंधळ नेमका इथेच आहे. मस्क ने उभ्या केलेल्या तंत्रज्ञानासारखेच तंत्रज्ञान भारतातही तयार होत आहे. आणि ते दुसरं तिसरं कुणी करत नसून अनंत अंबानीची जिओ कंपनी करत आहे. स्टारलिंक जर भारतात आलं तर जिओ चे सर्व मनसुबे धुळीला मिळतील. मोबाईल सेवा देण्याच्या माध्यमातून सुप्रीम लीडरना आपलं मॉडेल बनवून जिओ ने देशातील किमान शंभरेक कोटी लोकांचा डेटा स्वतःच्या खिशात घातलेला आहे. तो डेटा जिओ असा सहजासहजी इलॉन मस्कच्या हाती लागू देईल याची सुतराम शक्यता नाही. आणि इलॉन मस्क भारतीय बाजारपेठ अशीच ऑप्शनला सोडून निवांत धंदा करेल अशीही शक्यता नाहीच. आणि सगळं भांडण नेमके इथेच सुरू झालेले आहे.

सुप्रीम लीडर साहेबांनी अमेरिकन काँग्रेसमध्ये केलेल्या भाषणात ऑप्टीकल फायबर संदर्भातील उच्चार करताना अडखळले होते. ती चूक टेलिप्रॉम्प्टरचीच असावी यात वाद नाही. पण तो शब्द का उच्चारला गेला किंवा तो उच्चारण्याची गरज काय होती याचं उत्तर वरच्या फाफट पसाऱ्यात आहे. मुकेश अंबानींची इच्छा आहे की भारतात इंटरनेट कॉन्स्टेलेशन टेक्नोलॉजी च्या परिघात इंटरनॅशनलच काय तर अगदी कोणतीही देशी कंपनी उतरायला नकोय. जिओची इच्छा आहे की, इंटरनेट कॉन्स्टेलेशनचे सुद्धा २३, ३३, ४३ प्रमाणे स्पेक्ट्रम वाटले जावेत. ते देशांतर्गत असलेल्या सरकारने वाटावेत.

तर इलॉन मस्कने याआधीही कॉन्स्टेलेशनचे स्पेक्ट्रम लायसंस पद्धतीने वाटले जावेत. जेणेकरून मस्कला भारतात शिरणे सोपे होईल. यावरून अंबांनी आणि मस्क यांच्यात जोरदार झगडा सुरू आहे. कॉर्पोरेट मध्ये अशी भांडणं होत राहतात यात वाद नाही. भविष्यात हा झगडा थांबेल देखील. यात निर्विवादपणे अंबानीच विजयी होतील यात तीळमात्र शंका नाही. पण, या निर्णयामुळे ज्यू लॉबी भारताकडे, भारत सरकारकडे, मोदी सरकारकडे आणि विशेषतः मोदींजीकडे कोणत्या कोनातून पाहील यावर आता लगेचच सांगता येणार नाही. इलॉन मस्कला नाराज करण्याची भरपाई म्हणून महागड्या दरांवर ड्रोन खरेदीचे व्यवहार देखील करावे लागले आहेत. तो भाग वेगळा.

(दोन जायंट फिगर्स मधले थेट भांडण असे आंतरराष्ट्रीय पातळीवर सोडवण्यासाठी सुद्धा जिगर लागते. ते कौशल्य असंच कुणाकडे येत नाही. त्यासाठी कैक वर्षांची मेहनत, त्याग, संघर्ष, बलिदान, गरिबी, अनेक नामवंत विद्यापीठांतून शिक्षण पूर्ण करावे लागते. त्यातून मुत्सद्दीपणा येतो. नेहरू तसे मुत्सद्दी होते. जगातील अनेक देशांत त्यांच्या झालेल्या मुलाखती, त्यांचे घेतलेले सल्ले यावरून त्याची साक्ष पटते. हा जो प्रचार काँग्रेसवाले करतात तो मला बिल्कूल पटत नाही. असो...)

सरतेशेवटी इतकंच म्हणावंसं वाटतंय. हे उद्योजक लोकं खूप ताकदवार माणसं असतात. स्वतःच्या बिझनेस डीलच्या कोल्ड कॉल साठी थेट राष्ट्रप्रमुखांनांच नेमतात. हो खरंच जगातल्या अनेक देशांत हेच चालू आहे. मी पुतीनला घाबरतो म्हणून मी पुतीनचे नाव न घेता लिहीले आहे. रशियात तीन उद्योजक कुटूंबासाठी पुतीन कायम आग्रही असतात. पडताळून पाहा सत्य उमगेल.

बाकी काहीही असो... मोदीची लवकरच स्टारलिंकसारखी टेक्नोलॉजी आपल्या देशाला बहाल करतील. मी त्याच्याच भल्या मोठ्या इव्हेंटची वाट पाहतो.

बाय द वे... काही दिवसांतच बातमी येऊन धडकेल.. मुकेश अंबानी जगातली सर्वात मोठी ऑईल रिफाईनरी बांधत आहेत. टेक्सास आणि एरिझोना या प्रांतात. त्यात डोनाल्ड ट्रंपच्या मुलाच्या कंपनीची भागीदारी आहे. मुकेश अंबानी या ऑईल रिफाईनरी आणि सॅटेलाईट इंटरनेटच्या बळावर जगातला पहिला ट्रीलेनिअर भारतीय बनण्याच्या उंबरठ्यावर आहे. राहूल गांधीने मस्कच्या ट्विटला उगाच रिट्वीट केलेले नाही.

**वैभव छाया**

# जंतर मंतर...

विद्यार्थी, तरुण वर्ग शिक्षण, करिअर, पैसे कमावणे फक्त हे करायचे सोडून एसआयआर, निवडणुका, मतदानाचा हक्क याबद्दल आंदोलन करण्याएवढे आग्रही का झाले आहेत? समजून तर घेऊया. तरुण पिढीच्या भौतिक आकांक्षा वाढलेल्या आहेत हे वेगळे सांगायची गरज नाही. अनेक शासकीय प्रवक्ते दरवेळी नवनवीन आकडेवारीची भेंडोळी काढत आम्ही त्या आकांक्षा कशा पुऱ्या करत आहोत हे सांगायचा प्रयत्न करत असते. पण भाजपला केंद्रात बारा वर्षे एकहाती सत्ता देऊन देखील त्या पुऱ्या केल्या जात नाही आहेत हे कोट्यवधी तरुणांना कळून चुकले आहे. त्यांच्या आकलनाचा पुढचा भाग अधिक लक्षणीय आहे.

आपल्या आकांक्षा पुऱ्या करण्यासाठी आपल्यालाच ('च' महत्वाचा) झगडावे लागेल, आपण तेव्हाच झगडू शकतो ज्यावेळी देशात खरीखुरी लोकशाही प्रणाली नांदत असेल, आणि अशी प्रणाली टिकून राहण्यासाठी स्वातंत्र्यनंतर प्रौढ मतदानावर आधारित निवडणूक प्रणाली पारदर्शी, सर्व नागरिकनांच्या मतदानाच्या हक्काला सामावून घेणारी असणे ही पूर्वअट आहे हे या तरुण पिढीला कळून चुकले आहे. तरुणांच्या भौतिक आकांक्षा आणि त्यांचे लोकशाही हक्क यांची त्यांनी मनोमन घातलेली सांगड ही राज्यकर्त्यांची/राज्यकर्त्या भाजप पक्षाची डोकेदुखी झाली आहे.

गेल्या ऐंशी वर्षात देशात झालेली आर्थिक प्रगती कोणी नाकारू शकत नाही. आजच्या तरुणांच्या ऐंशी वर्षांपूर्वीच्या पिढयांच्या जे राहणीमान वाट्याला आले होते त्यात सुधारणा झाल्या आहेत हे कोणी नाकारू शकत नाही. मुद्दा पुढचाच आहे. अरे तुमचे पूर्वज तर आधी कुडाच्या, मातीच्या घरात रहात होतात ना; आता अर्धी कच्ची का होईना घर आहेत ना? यात समाधान नाही?; 'नाही आमचे स्वप्न आहे पक्की, भरपूर उजेड, हवा, पाणी असणारी, संडास, बाथरूम घरात असणारी, किमान वन बीएचके घराचे'; अरे तुमच्या आधीच्या पिढ्याना तर शिकायला बंदी होती; आता तुमच्या मुलांनाच नाही तर मुलींना देखील शाळा / कॉलेजचे दरवाजे खुले आहेत ; यात समाधान नाही?; 'नाही आम्हाला स्वतःला/ आमच्या मुलांना त्यांना हवे तेवढे शिकवायचे आहे , मुंबई पुण्याच्या कॉलेजात पाठवायचे आहे, जमले तर परदेशी पाठवायचे आहे. खाजगीकरणामुळे शाळा / कॉलेजचे शिक्षण महागले आहे ते आम्हाला परवडत नाही. म्हणून आमच्या मायबाप सरकारने जबाबदारी घ्यावी.

अरे तुम्हाला पूर्वी दोन वेळच्या खाण्याची ददात होती; आता काहीबाही घरात शिजतंय की? यात काय समाधान नाही ? ; 'नाही आम्हाला फक्त पोट भरण्यासाठी नाही , तर पौष्टिक अन्न हवे , आणि छानछोकी देखील हवी, आमच्या मुलाबाळांना पिझ्झा , आयस्क्रीम खायला द्यायचे आहे' सतत विकसित होणाऱ्या भौतिक राहणीमानाबद्दल / आत्मसन्मानाबद्दल / सामाजिक , राजकीय हक्कांबद्दलची ही यादी अजून वाढवता येईल.

प्रॉब्लेम काय आहे? प्रस्थापित व्यवस्थेचे अर्थतज्ञ अशी मांडणी करतात कि समाजात दारिद्र्य असले कि असंतोष तयार होतो. त्यातून जी राजकीय अस्थिरता येऊ शकते ती प्रस्थापित व्यवस्थेला परवडणारी नसते. दूरवर साचणारा असंतोष आणि राजकीय अस्थिरता यांना जोडणारा ब्रिज आहे एक नागरिक, एक मत, प्रौढ मतदानावर आधारित तळागाळात पोचलेली निवडणूक प्रणाली.

निवडणुका जिंकण्यासाठी, मतांसाठी दारिद्र्य निर्मूलनाच्या, गरिबी हटाव च्या घोषणा कराव्या लागतात, काही टोकन योजना राबवाव्या लागतात. टोकन योजना राबवल्या कि त्यांचे आकडेवारी तज्ञ सांगतात बघा अमुक कोटी लोकांना दारिद्र्यरेषेबाहेर कसे काढले! पण माणूस म्हणजे काही जनावर नाही, अमुक किलो कडबा टाकला कि दिवसभर रवंथ करीत राहील ; त्याला स्वप्ने , आकांक्षा असतात एवढेच नव्हे तर त्या पिढी दर पिढी विकसित होत असतात.

प्रस्थापित व्यवस्थेच्या साठी यात अजून एक गोची आहे.



कोट्यवधी सामान्य नागरिक / तरुण यांच्या वाढलेल्या भौतिक आकांक्षा, त्यांनी एखादा व्यायामशाळेत जाऊन स्वतःचा स्वतः स्नायू कमवतो , तशा कमावलेल्या नसतात. त्याचे पितृत्व पुन्हा प्रस्थापित व्यवस्थेकडेच जाते. जास्तीत जास्त ग्राहक मिळवण्यासाठी, स्वप्ने विकण्यासाठी, अहोरात्र केलेल्या तुफान दिलखेचक जाहिराती मोहिमा, ग्रामीण भागातून शहरांकडे झालेले स्थलांतरण, स्मार्टफोन आणि इंटरनेट आणि लोकशाहीच्या दडपणातून अर्ध्या मुर्ध्या कल्याणकारी योजनांतून मिळालेले त्यांना द्यावे लागलेले शिक्षण ष्ठष्ठ. अशा अनेक गोष्टींमुळे कोट्यवधी तरुणांच्या जगण्याच्या, आत्मसम्मानच्या , हक्काच्या कल्पनां आमूलाग्रपणे बदलत गेल्या.

स्वप्ने तर रुजवायची, उपभोगाच्या इच्छा तर तयार करायच्या पण कोट्यवधी लोकांच्या हातात क्रयशक्ती कशी तयार होईल याबद्दल आपल्या आर्थिक मॉडेलमध्ये काही तजवीज करायची नाही हा या प्रणालीतील सर्वात मोठा अंतर्विरोध आहे. त्या प्रणालीच्या मुखंडांना हे कळत नाही असे नाही. पण मॉडेल बदलले तर त्यांच्याच हितसंबंधनाच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतळ्यासारखे होईल.

देशात हुकूमशाही पद्धतीने राबवला जात असलेला एसआयआर, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी यासाठी देशभर तरुण वर्ग रस्त्यावर उतरला आहे त्याची पार्श्वभूमी ही आहे. सर्वांना चांगल्या भौतिक राहणीमानासाठी रसरसलेली , र्नेहू लोकशाही ही पूर्वअट आहे या अंतरदृष्टीचा बॅटन जेन झी जेन अल्फा कडे देणार आहे. आणि जेन अल्फा त्यांच्या सर्व कामगार, शेतकरी, सर्व कष्टकरी वर्गातील आईवडिलांना बदलणार आहेत.

नजिकच्या काळात भारतीय लोकशाही अधिक अर्थपूर्ण आणि बळकट होणार आहे. फक्त व्यक्तीच नाही, समाज, राष्ट्र, प्रणाली देखील वाईट पॅच मधून शिकत असते.

**संजीव चांदोरकर**

## अभिनयापलीकडील माणूस..

नभांगणी पोहचलेले प्रतिभावंत कलावंत नाना पाटेकर यांचे आकस्मिक निधन वेदनादायी आहे. आज देशाचा असा कोपरा नाही, जिथे नाना पाटेकरांची नक्कल करणारा मिमिक्रीवाला आढळत नाही. बंगाली किंवा दक्षिणी चित्रसृष्टीतही नाना पाटेकर हे नाव आदराने घेतले जाते. इतकी सर्वस्तरीय रसिकमान्यता मिळालेले कलावंत विरळच असतात. नाना पाटेकर हे महाराष्ट्राचे भूषण होते. ते फक्त कलावंत नव्हते, समाजाचे आपणही काही देणे लागतो, या भावनेने शेतकरी-श्रमिकांच्या जीवनातही समरसून गेलेला हा कलाकार होता. फिल्मी दुनियेचे वारे अंगाखांद्यावर खेळवतानाच नाना पाटेकरांनी आपला पाटेकरी बाणा कधी सोडला नाही, आणि ग्लॅमरच्या चमकील्या जगताला जास्त भावही दिला नाही. अत्यंत साध्या वेशात नाना सहज वावरत. या अभिनेत्याला साहित्य कळत होते, आणि शेकडो कविता तोंडपाठ होत्या. आजूबाजूचे तारे-सितारे कोट्यानुकोटीचे इमले खरेदी करुन आलिशान गाड्यांमध्ये फिरताना दिसत होते, तेव्हा हा अवलिया कलाकार आपले ग्लॅमर बांधाच्या पल्याड ठेवून शेतकऱ्याच्या थेट वावरात शिरला होता. दुष्काळी भागात मौन हातांनी कास्तकारांना 'नाम फाऊंडेशन'च्या माध्यमातून मदतीचा हात देत होता. कुठल्याशा नटीने केलेल्या भलत्या सलत्या आरोपांना उत्तरे देत न बसता आपले हात काळ्या मातीत घालून हिरवी स्वप्ने साकारु बघत होता. त्यांच्या आकस्मिक निधनाच्या वृत्ताने कलाविश्वच नव्हे, तर अवघा देश सुन्न झाला आहे.

नव्याजुन्या लेखक-कवीसाठी नाना पाटेकर हा हक्काचा श्रोता होता. नाना पाटेकरांची एण्ट्री जशी धूमकेतूसारखी अचानक झाली, तशीच झटपट एग्जिटही या कलंदर कलावंताने घेऊन टाकली. ज्यांनी ज्यांनी शिरवाडकरांचा 'नटसम्राट' रंगभूमीवर साकारला ते हृदयविकाराच्या धक्क्याने गेले, असा एक भयचकित करणारा योगायोग नाना पाटेकरांनी नुकताच मध्यंतरी बोलून दाखवला होता. नानांनीही नटसम्राट साकारला, पण तो चित्रपटात. तरीही व्हायचे ते झालेच.

**विजय पांडे**

संवाद

## अतिरेक नको

नवरात्रीच्या तोंडावर प्रसारित होणाऱ्या उत्सवाच्या नावाखाली केवळ रिल्स बनवणे, कृत्रिम नातेसंबंध दाखवणे आणि उथळ आकर्षण निर्माण करणे हे चालू राहणार असेल तर यात आदिशक्तीच्या जागरणाचा लवलेशही उरत नाही. नवरात्रीचा हा उत्सव केवळ 'नाईट आउट' किंवा 'ओपन - एअर -डिस्को' बनवून राहिला आहे. एकीकडे गरबा कार्यक्रमांमध्ये प्रवेशावरून धार्मिक वाद पेटला असताना दुसरीकडे गरबा पार्टनर देण्याच्या बहाण्याने वैयक्तिक सेवांचे उघड व्यवसायिकरण चालू आहे. विज्ञापनांमध्ये कोणती टोळी सक्रिय आहे का? आणि प्रत्यक्षात तिथे काय चालते? याचा शोध घेण्याचे मोठे आवाहन पोलिसांसमोर आहे. आजची तरुण पिढी पाश्चिमात्य विकृतीचे अंधानुकरण करताना हिंदू सणांचे पवित्र विसरत चालली आहे. समाज माध्यमांवरील 'लाईक्स' आणि 'व्ह्यूज' यांच्या हव्यासापोटी संस्कृतीचा असा बाजार मांडणे ही धोक्याची घंटा आहे. सणांमध्ये आनंद आणि उत्साह असावा पण त्याला मर्यादा आणि श्रद्धेचे अधिष्ठान हवे. यावर आता केवळ समाज माध्यमांवर प्रतिक्रिया देऊन भागणार नाही. तर गरबा आयोजक, समाज आणि पोलीस प्रशासन यांनीही अशा अनैतिक बाजारीकरणाला कठोरपणे आळा घातला पाहिजे. उत्सवातील भक्ती आणि पवित्र गहाण पडणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. गरब्याला पुन्हा त्याच्या मूळ संस्कृती आणि सात्विक स्वरूपात आणले नाही तर सणांमध्ये भक्ती कायमची लोप पावून बाजारी प्रदर्शन शिल्लक राहील.

**लीना गाडगीळ**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# दुष्काळाचे चटके प्रत्यक्ष पाहिले, मदतीचा चेंडू आता केंद्राच्या कोर्टात!

## केंद्रीय पथक शेतकऱ्यांच्या बांधावर,कापूस, सोयाबीन, तुरीच्या नुकसानीची पाहणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी









**यवतमाळ, दि. १० :** पावसाच्या दीर्घ खंडामुळे करपलेली पिके, डोळ्यांसमोर उभे राहिलेले आर्थिक संकट आणि मदतीची प्रतीक्षा करणारा शेतकरी... या विदारक परिस्थितीची दखल घेत केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा केला. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांची पाहणी करण्यात आली.

मात्र, शेतकऱ्यांच्या नजरा आता पाहणीपेक्षा प्रत्यक्ष मदतीच्या निर्णयाकडे लागल्या आहेत. यंदाच्या खरीप हंगामात पावसातील खंडामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळाचा ट्रिगर-१ लागू केला आहे. बाधित शेतकऱ्यांना केंद्राकडूनही आर्थिक मदत मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे मागणी केली होती. त्यानंतर नुकसानीचे प्रत्यक्ष मूल्यांकन करण्यासाठी केंद्रीय पथक जिल्ह्यात दाखल झाले. पथकाने यवतमाळ तालुक्यातील मडकोना व लासिना, तर नेर तालुक्यातील लोणी, मांडवगड, वटफळी आणि दोडकी येथे भेट देऊन पिकांची स्थिती जाणून घेतली. शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, नुकसान आणि अपेक्षा समजून घेतल्या. केंद्र सरकार मदतीबाबत सकारात्मक असल्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला. पाणीटंचाई, पशुधनाची ही घेतली दखल घेतल्या जाणार आहे. केंद्रीय पथकाने यवतमाळ येथील श्री गौरक्षण संस्थेतील गौशाळेची पाहणी करून चारा उपलब्धतेचा आढावा घेतला. किटा कापरा येथील लघुसिंचन प्रकल्पातील घटलेली पाणीपातळी, उपलब्ध जलसाठा आणि भूजलस्थितीचीही माहिती घेतली. याशिवाय आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. पथकप्रमुख अर्जेश कुमार मधोक यांच्यासह वित्त, कृषी आणि ग्रामीण विकास विभागातील अधिकाऱ्यांचा या पथकात समावेश होता. जिल्हाधिकारी विकास मीना व विविध विभागांचे अधिकारी दौऱ्यात उपस्थित होते. पाहणी झाली, आता मदतीची प्रतीक्षा! पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, पशुधनासाठी चारा आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींच्या आधारे केंद्रीय पथक अहवाल केंद्र सरकारला सादर करणार आहे. या अहवालानंतर मदतीबाबत पुढील कार्यवाही होईल. त्यामुळे प्रत्यक्ष बांधावर पोहोचलेल्या पथकाच्या पाहणीतून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला, तरी आर्थिक मदतीची घोषणा आणि प्रत्यक्ष खात्यात जमा होणारी रक्कम कधी मिळणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

# गांजा लागवडीवर पाटण पोलिसांचा छापा, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

### दोन शेतांमधून गांजाची ३५ झाडे जप्त,एकूण १ लाख ५० हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. १० :** पाटण पोलिसांनी कुंडी परिसरात गांजाची बेकायदेशीर लागवड करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत दोन वेगवेगळ्या शेतांमधून गांजाची एकूण ३५ झाडे जप्त केली. या कारवाईत सुमारे १ लाख ५० हजार ९०० रुपये किमतीचा गांजा हस्तगत करण्यात आला असून, याप्रकरणी दोन संशयित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोपनीय बातमीदारामार्फत कुंडी परिसरातील शेतांमध्ये गांजाची लागवड करण्यात आल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पाटण पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकून तपासणी केली. या कारवाईदरम्यान पहिल्या शेतातून सुमारे ३० गांजाची झाडे मिळून आली. त्यांचे एकूण वजन ६ किलो ७८० ग्रॅम असून, त्याची अंदाजे किंमत १ लाख ३५ हजार ६०० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. तसेच, दुसऱ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत गांजाची पाच झाडे जप्त करण्यात आली. त्यांचे वजन ७६५ ग्रॅम असून, त्याची अंदाजे किंमत १५ हजार ३०० रुपये आहे. अशा प्रकारे दोन्ही कारवायांत एकूण ३५ गांजाची झाडे जप्त करण्यात आली. या प्रकरणी प्रेस नोटमध्ये नमूद केलेल्या दोन्ही आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमली पदार्थांची बेकायदेशीर लागवड व संबंधित गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांकडून कारवाई करण्यात येत असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता यवतमाळ अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळवे वनी यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार मिलिंद सरकटे, उपनिरीक्षक नागोराव जाधव, पोलीस हवालदार रतिष वानखेडे, मुकेश करपते ,राम राठोड ,सचिन गाडगे ,सदाशिव माथनकर ,पोलीस शिपाई प्रशांत तलांडे, सचिन बोंडे, अरविंद जाधव हनुमंत सुरनर यांनी कारवाई केली.

## थोडक्यात

### दुर्गोत्सवात हरिकीर्तनाचा भक्तिरंग १२ ऑक्टोबरला प्रशांत महाराजांचे कीर्तन!

**श्री नवजागृत दुर्गामाता मंडळाचा ५१ वा सुवर्ण महोत्सव..**

**दिग्रस :** मांडवा नगरीत श्री नवजागृत दुर्गामाता मंडळाच्या ५१ व्या सुवर्ण महोत्सवी दुर्गोत्सवानिमित्त भक्ती, प्रबोधन आणि अध्यात्माचा सुरेल संगम अनुभवायला मिळणार आहे. स्व. सौ. निर्मलाबाई वसंतराव गावंडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सोमवारी, १२ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध कीर्तनकार झी टॉकीज फेम वाणीभूषण ह.भ.प. प्रा. डॉ. प्रशांत महाराज ठाकरे यांच्या जाहीर हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ९ ते ११ या वेळेत मांडवा येथील श्री विठ्ठल मंदिराच्या भव्य पटांगणात हा भक्तिमय सोहळा रंगणार आहे. ओघवती वाणी, प्रभावी निरूपण आणि भक्तिरसपूर्ण कीर्तनातून महाराज भाविकांना अध्यात्मिक विचारांची मेजवानी देणार आहेत. मंडळाच्या ५१ वर्षांच्या धार्मिक परंपरेचे औचित्य साधणाऱ्या या कार्यक्रमासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, तसेच कीर्तनानंतर महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री नवजागृत दुर्गामाता मंडळ आणि गावंडे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



### अतिक्रमण हटविण्याच्या घाईत विजेचा शॉक लागुन युवक जखमी

**हिवरा(संगम) येथील घटना ,जखमी युवकाची प्रकृती चिंताजनक**

**महागाव :** महामार्गालगत असलेले अतिक्रमण काढत असताना मुख्य वीज वाहिनीचा धक्का लागुन युवक जमिनीवर कोसळल्याने गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवार(दि.१०ऑक्टोबर) रोजी दुपारी साडेबारा वाजताच्या दरम्यान घडली. राष्ट्रीय महामार्ग ३६१लगत असलेले अतिक्रमण हटविण्याच्या सुचना देण्यासाठी महागाव तालुक्यातील हिवरा(संगम) येथील दुकानदार,रहिवासी नागरिकांना नोटिसा देण्याची प्रक्रिया दिलीप बिल्डकॉन कंपनीच्या वतीने बुधवार (दि.७ ऑक्टोबर) रोजी राबविण्यात येवून अतिक्रमण धारकांना १५दिवसात आपले कच्चे,पक्के स्वरूपाचे अतिक्रमण काढण्याचे सांगण्यात आले. परंतु सदर कंपनीने मनमानी कारभार करत शनिवार(दि.१०ऑक्टोबर)रोजी पोलिसांचा मोठा फौज फाटा व जेसीबी मशीन घेवुन दाखल होत अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली अशातच बसस्थानकालगत असलेल्या आपल्या दुकानासमोरील लोखंडी शेडचे अँगल काढण्यासाठी झाकीर इब्राहिम सय्यद(वय ३९वर्ष) हा शेडवर चढुन लोखंडी अँगल काढत असताना जवळूनच गेलेल्या मुख्य वीज वाहक तारांचा स्पर्श होवुन त्याला विजेचा धक्का लागल्याने तो वरून जमिनीवर खाली कोसळला यात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने नागरिकांनी त्याला उपचारासाठी पुसद येथे खाजगी रुग्णालयात हलविले परंतु त्याची प्रकृती चिंताजनक बनत चालल्याने त्याला नांदेड येथे हलविण्यात आल्याची माहिती आहे. अतिक्रमण काढण्यासाठी मुदत देवून दिलीप बिल्डकॉन कंपनीने(डी बीएल)त्याची अंमलबजावणी न करता मनमानी व पोलिस बळाचा धाक दाखवून अतिक्रमण हटविण्याचे काम केल्यामुळेच झाकीरचा अपघात झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

### शेतीच्या आड गांजाची लागवड,पारवा पोलिसांचा छापा!

**पाटपांगरा शिवारात ११० झाडे जप्त २३.६९ लाखांचा मुद्देमाल ताब्यात**

**घाटंजी :** कापूस आणि तुरीच्या पिकांच्या आड गांजाची बेकायदेशीर लागवड केल्याचा प्रकार घाटंजी तालुक्यातील पाटपांगरा शिवारात उघडकीस आला आहे. पारवा पोलिसांनी ८ ऑक्टोबर रोजी धडक कारवाई करत गांजाची ११० झाडे जप्त केली. या कारवाईत एकूण २३ लाख ६९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पाटपांगरा शिवारातील सर्वे क्रमांक ८४ मधील शेतावर छापा टाकण्यात आला. यावेळी इतर पिकांच्या आड गांजाची लागवड केल्याचे आढळले. पोलिसांनी पंचनामा करून गांजाची झाडे जप्त केली. या प्रकरणी विठ्ठल वसंत झाडे (वय ४८, रा. पोटी पारधी बेडा, ता. घाटंजी) यांच्याविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा (एनडीपीएस अॅक्ट), १९८५ मधील कलम ८(क) व २०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतीच्या आड प्रतिबंधित अमली पदार्थांची लागवड होत असल्याने ग्रामीण भागातील अवैध धंद्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या लागवडी मागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत चौधरी, पोलीस उपनिरीक्षक गजानन त्बस्टेवाड आणि पोलीस हवालदार विजय आत्राम पुढील तपास करीत आहेत.

# दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांवर आता रेल्वे प्रकल्पाच्या धुळीचे संकट!

## कापणीच्या तोंडावर पिकांचे नुकसान..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**पुसद, दि. १० :** यंदा पावसाच्या लहरीपणामुळे दुबार पेरणीचे संकट झेलणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणी संपण्याचे नाव घेत नाहीत. अत्यल्प पावसामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असतानाच, आता कापणीला आलेल्या पिकांवर रेल्वे प्रकल्पाच्या कामातून उडणाऱ्या धुळीचे थर साचत आहेत. विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या कामाचा फटका थेट शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या घासाला बसत असल्याची व्यथा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

पुसद तालुक्यातील वरुड, लोणी, इंदिरानगर, पुसद खंड-१ व २, कोपरा, शेलू, कृष्णनगर, वेणी, हर्षी, बिबी, बाळवाडी, गौळ खुर्द आणि शिळोणा परिसरातील भूसंपादित शेतजमिनींतून रेल्वे प्रकल्पाचे काम सुरू आहे. या कामासाठी माती व मुरूम वाहून नेणाऱ्या अवजड वाहनांची सतत ये-जा सुरू असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. ही धूळ ऊस, केळी, हळद, कापूस, सोयाबीन, मूग, उडीद आणि ज्वारीच्या पिकांवर साचत असून पिकांच्या वाढीवर आणि उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. रेल्वे मार्ग शेतजमिनीच्या मध्यभागातून गेल्याने शेतात जाण्या-येण्याचे मार्गही बाधित झाले आहेत. कापणीसाठी तयार असलेले पीक बाहेर काढण्यासाठी यंत्रसामग्री व वाहनांना मार्ग उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे ठाकले आहे. रेल्वे प्रकल्प विकासासाठी महत्त्वाचा असला, तरी त्याची किंमत शेतकऱ्यांनी का मोजावी, असा सवाल उपस्थित होत आहे. दुष्काळी पंचनाम्यांसोबतच रेल्वे प्रकल्पाच्या कामामुळे झालेल्या पीक नुकसानीचे स्वतंत्र पंचनामे करावेत, धूळ नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात आणि बाधित शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

# शिवजयंतीपूर्वी छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करा !

### नगरसेविका वंदना घाडगे यांची नगरपरिषद प्रशासनाकडे मागणी !!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. १० :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा अनेक वर्षांपासून बंदिस्त अवस्थेत असल्याने शिवप्रेमींच्या भावना दुखावत आहेत. त्यामुळे आगामी शिवजयंतीपूर्वी पुतळ्याचे उर्वरित काम पूर्ण करून त्याचे अनावरण करण्यात यावे, अशी मागणी नगरपरिषदेच्या सदस्य वंदना सचिन घाडगे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी ७ ऑक्टोबर रोजी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन सादर केले.

वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या सुशोभीकरणासाठी मंजूर झालेल्या निधीच्या अनुषंगाने नगरपरिषदेने स्वतंत्र ठराव घ्यावा. तसेच सुशोभीकरणाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, उमरखेड यांना आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावे, अशी मागणी घाडगे यांनी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून, त्यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे काम पूर्ण होऊन त्याचे अनावरण व्हावे, अशी शिवप्रेमींची अनेक वर्षांपासून अपेक्षा आहे. मात्र, महाराजांचा पुतळा अद्याप बंदिस्त अवस्थेत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन नगरपरिषद प्रशासनाने प्रलंबित बाबींचा तातडीने निपटारा करावा व पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासोबतच संबंधित ठेकेदाराला उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना द्याव्यात. आगामी शिवजयंतीपूर्वी सर्व कामे पूर्ण करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सन्मानपूर्वक अनावरण करण्यात यावे, अशी आग्रही मागणी नगरसेविका वंदना घाडगे यांनी केली आहे.

# दुर्गा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक संपन्न!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १० :** पुसद ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या काळी (दौ.) येथे दि.९ऑक्टोंबर रोजी आगामी नवरात्र दुर्गा उत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतांना काळी दौ. येथे कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी ग्रामीण पोलीस प्रशासनाकडून महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.

ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार आशिष चौधरी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व अध्यक्षतेखाली शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीला पोलीस उपनिरीक्षक राहुल देशमुख, जमादार प्रेम आडे, पोलीस कर्मचारी उत्तम चव्हाण यांनी उपस्थित राहून मंडळांना मार्गदर्शन केले. ठाणेदारांचे कडक निर्देश मिरवणुकीदरम्यान कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह गाणे वाजविण्यास सक्त मनाई डीजे मुक्त थेट होणार,प्रत्येक दुर्गा मंडपात सीसीटीव्ही कॅमेरे व अग्निशमन यंत्रणा, अफवांवर विश्वास ठेवू नये, सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यास कठोर कारवाई. व हंगामी महाराष्ट्र शासन निर्णय दुष्काळ जाहीर केलं आहे यासाठी पाणी जपून वापरा उत्सव हा आनंदाचा असतो, गावाची परंपरा जपत सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे, कोणीही कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केल्यास त्याची गय केली जाणार नाही असा सज्जड दम यावेळी ठाणेदार आशिष चौधरी यांनी दिला.या बैठकीला पोलीस पाटील प्रकाश दवणे,तंटामुक्ती अध्यक्ष उज्वल रणवीर ज्येष्ठ नागरिक उकंडा राठोड, हंसराज मोरे, निवास मोरे, शरद काळे, अनु आढाव, आकाश जाधव यांच्यासह गावातील सर्व ७ ते ८ दुर्गा मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी शांततेत व उत्साहात दुर्गा उत्सव साजरा करण्याचा संकल्प सर्वांनी केला.

# आसेगाव देवीत नवरात्रोत्सवाचा जागर..! लाखो भाविकांच्या आगमनाची तयारी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १० :** बाभुळगाव तालुक्यातील श्री क्षेत्र आसेगाव देवी येथे आजपासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ होत असून, घटस्थापनेनिमित्त मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. मनोकामना पूर्ण करणाऱ्या आई जगदंबेच्या दर्शनासाठी नऊ दिवसांत लाखो भाविक येथे दाखल होण्याची अपेक्षा संस्थानच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

आसेगाव देवी येथील आदिशक्तीच्या प्राचीन देवस्थानाला ऐतिहासिक आणि आध्यात्मिक परंपरा लाभली आहे. संस्थानच्या माहितीनुसार, सुमारे १६७० च्या काळात संत मराजी महाराज गोधनाची सेवा आणि गावाच्या समृद्धीसाठी कार्य करीत होते. त्यांच्या निस्सीम भक्तीवर प्रसन्न होऊन आई जगदंबेने त्यांना दर्शन दिल्याची आख्यायिका प्रचलित आहे. देवीच्या आदेशानुसार पुढे जात असताना मराजी महाराजांनी मागे वळून पाहिले आणि त्याच ठिकाणी देवी गुप्त झाल्याचे सांगितले जाते. याच स्थानी देवीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. मातीच्या परकोटातून सुरू झालेल्या या देवस्थानाचे आज भव्य मंदिरात रूपांतर झाले आहे. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या सहकार्याने संस्थानला 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्याची माहिती देण्यात आली. प्राप्त निधीतून भक्तनिवास, स्वयंपाकगृह आणि परिसर सुशोभीकरणाची कामे करण्यात आली आहेत. नवरात्रोत्सवानिमित्त १८ ऑक्टोबरला ग्रंथदिंडी, तर १९ ऑक्टोबरला भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानने केले आहे.

# बाभूळगाव कमीत कमी वीज पाण्याचा वापर करा

### तहसीलदार मीरा पागोरे यांचे आवाहन



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. १० :** बाभूळगाव हे दुष्काळाचे वर्ष आहे कमीत कमी वीज, पाण्याचा व नैसर्गिक साधनांचा वापर करावा कुठेही कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यावी असे आवाहन येथील तहसीलदार मीरा पागोरे यांनी केले. त्या बाभूळगाव पोलीस स्टेशनच्या प्रांगणात आयोजित केलेल्या शांतता समितीच्या सभेत अध्यक्षपदावरून बोलत होत्या.

ज्या मंडळांनी परवानगी करिता ऑनलाइन अर्ज केले नाही त्यांना परवानगी दिली जाणार नाही तसेच त्या मंडळाला अनधिकृत मंडळ म्हणून गृहीत धरण्यात येईल डीजे चा वापर होणार नाही याची सर्व दुर्गोत्सव मंडळांनी काळजी घ्यावी असे आवाहन पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे यांनी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना केले .

शांतता समितीच्या सभेला माजी सरपंच डॉ. रीखबचंद जैन, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब गौरकार, मयूर पिसे, माजी सरपंच विनोद महानुर, प्रेस क्लबचे अध्यक्ष आरिफ अली, राजू नवाडे, शहजाद शेख, माजी सरपंच वंदना दोडंगे, गोपनीय शाखेचे पोलीस शिपाई अर्णव अहिरे शिवाय तालुक्यातील सर्व दुर्गोत्सव मंडळाचे पदाधिकारी, महिला मंडळ उपस्थित होते.

# वन्यजीव संरक्षणाचा संदेश चिकणीच्या शाळेत. विद्यार्थ्यांसोबत ग्रामस्थही सहभागी!

### पाथ्रड वनवर्तुळाचा पुढाकार; जनजागृतीसोबत वृक्षारोपणातून निसर्ग संवर्धनाचा जागर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दारव्हा, दि. १० :** वन आणि वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ वनविभागाची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. निसर्गाचा समतोल टिकवण्यासाठी वनसंपदेचे जतन आणि वन्यजीवांचे संवर्धन आवश्यक असल्याचा संदेश दारव्हा तालुक्यातील चिकणी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत आयोजित जनजागृती कार्यक्रमातून देण्यात आला.

वन्यजीव सप्ताहानिमित्त आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांना आणि ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यासोबतच वृक्षारोपण ही करण्यात आले. यवतमाळ वनविभागाचे उपवनसंरक्षक नितीन कुमार सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक वनसंरक्षक नारा भुवनेश्वर बाबू तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी गौरव चराटे यांच्या उपस्थितीत हा उपक्रम राबविण्यात आला. पाथ्रड वनवर्तुळाच्या वतीने १ ते ७ ऑक्टोबरदरम्यान वनवर्तुळातील चारही बीटांमधील विविध गावांमध्ये आणि शाळांमध्ये वन व वन्यजीव संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमात वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास, जंगलांचे महत्त्व, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याबाबत विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना माहिती देण्यात आली. केवळ वृक्षारोपण करून न थांबता लावलेल्या झाडांचे संगोपन करणे आणि वन्यजीवांना हानी पोहोचणार नाही याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाला चिकणीचे पोलीस पाटील रवींद्र राऊत, वनपाल अनंत कोरडे, वनरक्षक विशाखा शेजव, समीर पथ्ये, विनोद मस्के आणि शेखर कुबडे यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखेर टीबी हॉस्पिटलच्या कॉटर्सवर बुलडोझर!

### न्यायालयीन सुनावणी १३ ऑक्टोबरला त्यापूर्वीच नगरपरिषदेची पोलीस बंदोबस्तात कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १० :** यवतमाळ शहरातील टीबी हॉस्पिटल परिसरातील शासकीय कॉटर्सवर अखेर १० ऑक्टोबर रोजी नगरपरिषदेने बुलडोझर चालविला. या जागेवर व्यापारी संकुल आणि भव्य सभागृह उभारण्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी प्रशासनाने ही कारवाई केली.

मात्र, या प्रकरणाची पुढील सुनावणी नागपूर खंडपीठात १३ ऑक्टोबर रोजी नियोजित असताना, त्यापूर्वीच पाडकाम सुरू झाल्याने या कारवाईची चर्चा शहरात रंगली आहे. टीबी हॉस्पिटल परिसरात व्यावसायिक संकुल उभारण्याचा निर्णय अनेक वर्षांपूर्वी घेण्यात आला होता. त्यासाठी शासनाची परवानगी घेण्यात आली असून, संबंधित जागेचा आवश्यक मोबदला दिल्यानंतर ती नगरपरिषदेच्या ताब्यात हस्तांतरित करण्यात आली होती. मात्र, या जागेवरील कॉटर्स रिकामे करण्यावरून नगरपरिषद प्रशासन आणि रहिवाशांमध्ये एकमत होत नसल्याने हा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहिला. अखेर प्रकरण न्यायालयात पोहोचले. नागपूर खंडपीठात या प्रकरणाची सुनावणी १३ ऑक्टोबरला होणार आहे. कॉटर्स रिकामे करण्यासाठी १३ ऑक्टोबरपर्यंत मुदत असल्याचे सांगितले जात असतानाच, नगरपरिषदेने १० ऑक्टोबरच्या सकाळी सात वाजल्यापासून पोलीस बंदोबस्तात पाडकाम सुरू केले.कारवाईदरम्यान काही रहिवाशांची सामान हलविण्यासाठी धावपळ उडाली. मालवाहू वाहनांतून घरातील साहित्य नव्या निवासस्थानी हलविण्यात आले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे रहिवाशांसमोर स्थलांतराचे आव्हान उभे राहिले. आता कॉटर्स हटविण्यात आल्याने प्रस्तावित व्यापारी संकुलाच्या उभारणीतील जागेचा अडथळा दूर झाला आहे. मात्र, न्यायालयीन सुनावणीच्या पार्श्वभूमीवर कारवाईची वेळ आणि रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न याबाबत प्रशासनाची भूमिका काय, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांग शिबीर

**दर्यापूर**-सेवासंकल्प अभियान अंतर्गत उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांग शिबिरा आयोजित करण्यात आले शिबिराचे अध्यक्ष उपजिल्हा रुग्णालय चे वैद्यकीय अधीक्षक डॉ डाबेराव उद्‌घाटक ज्येष्ठ पत्रकार गजानन देशमुख, शशांक देशपांडे, किरण होले, अमोल कंठाळे, सचिन मानकर या पत्रकार संघटनेच्या वतीने कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अंकुश कावडकर उपस्थित होते तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ कोरडे, डॉ मेश्राम,डॉ इंगळे, डॉ जठार, डॉ नाईक, गवळी मॅडम व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सी ए पवार यांनी केले आभार प्रदर्शन चंदूभाऊ हिरोळे यांनी केले.शिबिरात २३१ बांधवांची तपासणी करण्यात आली दिव्यांग शिबिरात तपासणी साठी अमरावती वरून विशेष चमू उपस्थित झाली होती. त्यात डॉ स्वाती सोनोने , डॉ श्रीकांत लाजुरकर, डॉ कुणाल वानखडे, डॉ जठार, प्रमोद भक्ते, सचिन टवलारे,अश्विनी म्हैसने,सुनील कळतकर, अमोल भातकुलकर,मृणाल हरले,प्रीतम शेंडे, सुमित खंडारे, मयुर अतकर, नागेश लुटे, सुनील पाटील हे उपस्थित होते.तपासणी अस्थिरोग विभाग, इनटी विभाग,नेत्र विभाग, मानसोपचार विभाग यात तपासणी करण्यात आली. कार्यक्रम व्यवस्थित रित्या पार पडावा यासाठी मेहकर,गीतें, गायकवाड,पवन बचाते, चेतन कांबळे सोळंके, हितेश, श्रीमती कोल्टक्के,मनिषा लाघे, शिल्पा बडे तसेच गुरुकुल नर्सिंग मधील विद्यार्थांनी सहभाग घेतला या मंडळींनी कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडला.

### आठ देवींचा नवरात्रोत्सव

**टाकरखेडा संभू**-येथे नवरात्री महोत्सवाला आजपासून सुरुवात झाली आहे. चार वर्षांपूर्वी घटस्थापनेच्या दिवशी येथील एका शेतामध्ये सुमारे ४०० वर्षे जुन्या आसरा माय, जाणा माय व ईना माय या देवींच्या मूर्त्या सापडल्या होत्या. त्यानंतर या मूर्त्यांची प्रतिष्ठापना करून नवरात्री महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याची परंपरा सुरू झाली.यापूर्वी गावात मरी माय, माता माय, तारा माय, देवगाय, सिरमाय व भिवसन बुवा या देवींची मंदिरे होती. तर २०२१ मध्ये सापडलेल्या तीन प्राचीन मूर्त्यांमुळे आता या परिसरात एकूण आठ देवींच्या पूजा-अर्चा सुरू आहेत. त्यामुळे नवरात्रीत येथे भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे.या मूर्त्या दशरथ सोनाजी इंगोले व जुना बाई दशरथ इंगोले यांच्या शेतात सापडल्या होत्या. सध्या तेच या मंदिराची देखरेख करीत असून गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे देवीची सेवा करत आहेत. तर मंदिराच्या व्यवस्थापनाची जबाबदारी विशाल तीरमारे सांभाळत आहेत.दरवर्षीप्रमाणे यावर्षीही नवरात्री महोत्सव थाटात साजरा होत असून परिसरात भक्तिभाव आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# आमदार नितीन देशमुख यांच्या वक्तव्याचा निषेध

## कठोर कारवाईची भाजपा अमरावती शहर जिल्ह्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**

राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्याबद्दल बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांनी केलेल्या कथित अपमानास्पद वक्तव्याचा भारतीय जनता पार्टी, अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित आमदारांवर योग्य ती कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भाजपा अमरावती शहर जिल्हा तर्फे करण्यात आली

७ ऑक्टोबर रोजी सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या एका व्हिडिओमध्ये आमदार नितीन देशमुख हे बाळापूर येथील एका शासकीय कार्यालयात जाऊन महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्याबद्दल आक्षेपार्ह व अपमानास्पद वक्तव्य करत असल्याचे दिसून येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक जीवनात बोलताना पदाची प्रतिष्ठा, सार्वजनिक सभ्यता आणि लोकशाहीतील परस्पर आदर यांचे भान ठेवणे आवश्यक आहे.

महसूल मंत्री म्हणून बावनकुळे राज्यातील महसूल प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी विविध निर्णय घेत आहेत. या निर्णयांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अशा परिस्थितीत जबाबदार लोकप्रतिनिधींकडून होणाऱ्या वक्तव्यांबाबत योग्य ती सार्वजनिक जबाबदारी राखली जाणे अपेक्षित आहे.या प्रकरणाची संबंधित वक्तव्याची सत्यता तपासावी आणि कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाजपा अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे.प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी.

अन्यथा, न्याय मिळविण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही भाजपा अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने देण्यात आला आहे

भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनाच्या वेळी महापौर श्रीचंदजी तेजवानी, भाजपा विदर्भ विभाग संयोजक प्रा. दिनेश सूर्यवंशी, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, भाजप नेते किरण पातूरकर, रवींद्र खांडेकर, मनपा सभागृह नेते चेतन गावंडे, बादल कुळकर्णी, चेतन पवार,अभिजीत वानखडे, संतोष कावरे, विनोद ठोसर, प्रफुल्ल बोके, उमेश निलगिरे, भारती गुहे, मोर्चा अध्यक्ष सुधा तिवारी, कुणाल टिकले, विक्की शर्मा, सुधीर थोरात, संजय नरवणे, नगरसेवक आशिष अतकरे, सुरेखा लुंगारे, लता देशमुख, विनोद तांबवेस, सुनीता लोणारे, जिल्हा पदाधिकारी कौशिक अग्रवाल, राजू मेटे, शैलेंद्र मिश्रा, सुनील खराटे, राजेश आखेगावकर, श्रीकांत धानोरकर, डॉ. प्रताप तिडके, बलदेव बजाज, विशाल कुलकर्णी, अलका सप्रे, तृप्ती वाट, विना चव्हाण, अमित कुळवंत, भैय्यासाहेब तिरपुडे, तुषार चौधरी, सागर खाकरे, अक्षय वेरूळकर, हेमंत श्रीवास्तव, नरेश चव्हाण, सुशील साहू, रोशन साहू, नरेश चव्हाण, योगेश ठाकरे, आकाश पाटील, प्रा.विजय कुलकर्णी, आकाश दानखडे, श्रवण, मोहन चव्हाण, प्रसन्न मार्कंडे, सचिन निंबोकार, श्रवण मेहेरे, सर्जेराव गलपत, वैभव पवार, ऋषिकेश थेलकर, महेंद्र रावेकर, राजेंद्र तांबेकर, गजानन गायकवाड, रवी पारवे, आकाश तायडे, आशिष बजाज, निखिल घुरडे, अशोक पंचारे, अक्षय देशमुख, आकाश जाधव, शुभम खंडारकर, अंकेश वर्मा, अविनाश खंडारे, संदीप सहारे, व मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# रघुनाथपूर येथील शेतकरी पुत्राची आत्महत्या

**तिवसा/वार्ताहर**

तालुक्यातील ग्राम रघुनाथपूर येथील शेतकरी पुत्र अमोल रामदासराव मुंद्रे (वय ३७) याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज शनिवार १० ऑक्टोबर रोजी उघडकीस आली. कर्जाच्या विवंचनेतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती आहे. शुक्रवारी ९ ऑक्टोबर रोजी तो शेतातून घरी परतल्यानंतर चिंताग्रस्त असल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर आज शनिवारी सकाळी कुटुंबीयांना घरातील बाजूच्या खोलीत त्यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. पुढील कार्यवाहीसाठी मृतदेह उपजिल्हा रुग्णालय, तिवसा येथे पाठविण्यात आला. अमोल मुंद्रे हे अविवाहित असून, त्यांच्या पश्चात आई-वडील व मोठा भाऊ असा परिवार आहे. या घटनेमुळे रघुनाथपूर गावात शोककळा पसरली आहे.



# वन्यप्राण्यांचा पिकांवर धुडगूस; अऱ्हाडच्या शेतकऱ्याचे नुकसान

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

अऱ्हाड परिसरात वन्यप्राण्यांकडून शेतपिकांची नासधूस होत असल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत. आधीच दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असताना तूर व कपाशी पिकांच्या नुकसानीने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. या नुकसानीची तातडीने पाहणी करून पंचनामा करावा आणि नियमानुसार भरपाई मंजूर करावी, अशी मागणी अऱ्हाड येथील शेतकरी किरण प्रकाश पोकळे यांनी वनविभागाकडे केली आहे.

किरण पोकळे यांची अऱ्हाड येथे दोन एकर शेती असून, त्यांनी यंदा तूर व कपाशीची लागवड केली आहे. मात्र, वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे पिकांचे मोठे नुकसान होत असल्याचे त्यांनी ८ ऑक्टोबर रोजी सादर केलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वडाळी, अमरावती यांच्याकडे ऑनलाइन अर्जाद्वारे तक्रार दाखल करून तातडीने पंचनामा व नुकसानभरपाईची मागणी करण्यात आली आहे.

**नुकसानभरपाईसाठी वनविभागाकडे धाव**

किरण प्रकाश पोकळे यांनी वन्यप्राण्यांमुळे झालेल्या पीक नुकसानीबाबत अर्ज दाखल केला असून, त्याची प्रत जिल्हाधिकारी, तहसीलदार, कृषी अधिकारी, अमरावती तसेच तलाठी, पार्डी (देवी) यांना पाठविण्यात आली आहे. शेताची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करावा आणि शासनाच्या नियमानुसार भरपाई मंजूर करावी, अशी त्यांची मागणी आहे. एकीकडे वन्यप्राण्यांचा उपद्रव, तर दुसरीकडे सिंगल फेज वीजपुरवठ्याचा अभाव; अशा दुहेरी संकटात सापडलेल्या अऱ्हाड-कुऱ्हाड व उदखेडच्या शेतकऱ्यांना आता संबंधित विभागांकडून ठोस दिलासा मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



'अऱ्हाड-कुऱ्हाड व उदखेड येथे ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम सुरू असून, त्यासाठी वेळ लागणार आहे. या प्रश्नावर वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा सुरू आहे.'

**अंकुश सोनवणे,**
कनिष्ठ अभियंता,
अंजनगाव बारी

# प्राध्यापकांच्या वेतनासाठी 'ई-कुबेर' प्रणालीचा महत्त्वपूर्ण टप्पा

## शैक्षिक महासंघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्रातील महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतन वितरण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडून आला असून, सप्टेंबर २०२६ चे वेतन ३० सप्टेंबर रोजी प्राध्यापकांच्या बँक खात्यांत जमा झाले आहे. ई-कुबेर प्रणालीच्या माध्यमातून यापुढे प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला प्राध्यापकांचे वेतन थेट त्यांच्या बँक खात्यांत जमा होण्याची अपेक्षा आहे.

प्राध्यापकांच्या वेतनाबाबत दीर्घकाळापासून असलेल्या अनिश्चिततेवर मात करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे व महाविद्यालयीन कर्मचार्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

ई-कुबेर ही भारतीय रिझर्व्ह बँकेची कोअर बँकिंग प्रणाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या १६ ऑगस्ट २०२४ च्या शासन निर्णयानुसार, १ ऑक्टोबर २०२४ पासून संबंधित कोषागारांमार्फत होणारी शासकीय देयके थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची व्यवस्था लागू करण्यात आली. तथापि या संरचनेत उच्च शिक्षणातील आस्थापनांचा समावेश करण्यासाठी तब्बल दोन वर्षांचा प्रदीर्घ कालावधी लागला.

या सकारात्मक बदलासाठी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ, महाराष्ट्र प्रदेश यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. महासंघाने या विषयाकडे केवळ वेतन जमा होण्याचा तांत्रिक प्रश्न म्हणून न पाहता, प्राध्यापकांची आर्थिक सुरक्षितता, आर्थिक नियोजन आणि शैक्षणिक व्यवस्थेतील प्रशासकीय पारदर्शकता यांच्याशी संबंधित महत्त्वाचा प्रश्न म्हणून पाहिले. विविध स्तरांवर करण्यात आलेल्या या पाठपुराव्यामुळे वेतन वितरण व्यवस्थेत सुधारणा होण्यास चालना मिळाली आहे.

वेतन वितरण व्यवस्थेत झालेली सुधारणा स्वागतार्ह असली, तरी महासंघाने मूळ निवेदनांमधून मांडलेले सर्व प्रश्न सुटले आहेत, असे म्हणता येणार नाही.

प्राध्यापकांना प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला वेतन जमा होण्याची निश्चित आणि सातत्यपूर्ण हमी मिळणे, प्रणालीच्या अंमलबजावणीबाबत स्पष्ट प्रशासकीय निर्देश उपलब्ध होणे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतील तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचणींचे निराकरण होणे आवश्यक आहे.

याशिवाय, वेतन थेट खात्यात जमा होण्याच्या व्यवस्थेचा लाभ घेताना प्राध्यापकांना बँकांकडून ओव्हरड्राफ्ट, कर्ज, विमा आणि अन्य आर्थिक सुविधांचा लाभ मिळण्यात कोणते अडथळे आहेत, याबाबतही स्पष्टता आवश्यक आहे. वेतन वितरणातील बदलामुळे अशा सुविधांवर कोणताही प्रतिकूल परिणाम होऊ नये, ही महासंघाची भूमिका आहे.

या प्रश्नांवर उच्च व तंत्र शिक्षण विभाग, उच्च शिक्षण संचालनालय, वित्त विभाग आणि संबंधित बँकांनी समन्वयाने कार्यवाही करणे गरजेचे आहे.

### प्राध्यापकांना विशेष सुविधा

प्राध्यापकांचे वेतन खाते चालविणाऱ्या बँकेने केवळ वेतन जमा करण्यापुरती सेवा न देता त्यांना विशेष वेतनधारक ग्राहकाचा दर्जा देऊन सर्वसमावेशक आर्थिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. यामध्ये विनातारण ओव्हरड्राफ्ट, सवलतीच्या व्याजदराने गृहकर्ज व वैयक्तिक कर्ज, आकर्षक विमा संरक्षण, शून्य किंवा नाममात्र शुल्कातील बँकिंग सेवा आणि प्राधान्याने कर्जमंजुरी यांचा समावेश असावा. शासनाने संबंधित बँकेसोबत यापूर्वी केलेल्या करारातील सुविधांची प्रत्यक्ष अंमलबजावणी तपासावी. तसेच, आजच्या डिजिटल बँकिंग युगात तांत्रिकदृष्ट्या सक्षम, तत्पर आणि ग्राहकाभिमुख बँकिंग सेवांचा विचार करून महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अधिकाधिक लाभ मिळेल, अशी पारदर्शक आणि प्रभावी व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी महासंघ प्रयत्नशील राहील.



**प्रा. प्रदीप खेडकर**

# अबॅकस स्पर्धेत ज्ञानोदय किड्स अकॅडमीची दमदार कामगिरी





**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अमरावती येथे पार पडलेल्या १५ व्या विभागीय स्तरावरील अबॅकस व मानसिक अंकगणित स्पर्धेत अंजनगाव सुर्जी येथील शिक्षक कॉलनीतील ज्ञानोदय किड्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली. अपेक्स ब्रेन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे विविध पारितोषिके व सन्मान पटकावत यश संपादन केले.स्पर्धेत श्रुतिका देवानंद हिरपूरकर हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला. नमस्वी गणेश झोंबाडे हिने द्वितीय क्रमांक, तर सक्षम अतुल तुरखडे याने तृतीय क्रमांक पटकावला. मानसिक गणितातील कौशल्याच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले.तसेच प्रियांशू मनोहरराव तायडे आणि आरुश निलेश मालगे यांनी विजेतेपद मिळवत अकॅडमीच्या यशात आणखी भर घातली.याच स्पर्धेत वियान विजय गौर, जय देवानंद हिरपूरकर आणि धवल मनोहर तायडे यांनीही उल्लेखनीय कामगिरी नोंदवत उत्कृष्ट कामगिरीचे मेडल मिळविले. अबॅकस आणि मानसिक अंकगणिताच्या सरावामुळे विद्यार्थ्यांच्या गणनावेगासोबतच स्मरणशक्ती, एकाग्रता, अचूकता व आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. या स्पर्धेतील विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय हे शितल घोडे यांना जाते असे विद्यार्थी व पालक वर्गांचे म्हणणे आहे.यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून ज्ञानेश्वरराव घोडे, आणि ज्ञानोदय किड्स अकॅडमीचे संचालक सुनील घोडे व शितल सुनील घोडे, यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आजपासून शक्तीच्या भक्तीचा जागर

**चांदूरबाजार/वार्ताहर**

शक्ती व भक्तीचा अनोखा संगम म्हणजे नवरात्र. या नऊ दिवसात दुर्गेच्या रूपाने शक्तीची आराधना केल्या जाते.शक्तीच्या आराधनेने सकरात्मक ऊर्जा प्राप्त होते.या ऊर्जे मुळे कर्तव्य परायणता,सत्कर्म करण्याची प्रवृत्ती, सद्भावना व मानवतावाद ही मुल्ये व सेवाभावी,मानवी मनात कायम स्वरूपी रूजविलेली जाता.म्हणूनच हिन्दू धर्मात नवरात्रातील,शक्तीच्या आराधनेला अन्यन्य साधारण महत्त्व आहे.असा हा शक्ती चर्या भक्तीचा जागर सोहळा,आज पासून सुरू होत आहे.

नवरात्रा आधीच दुर्गारूपी शक्तीच्या आगमनाच्या स्वागताची तयारी,घरोघरी व सार्वजनिक मंडळां कडून दहा दिवस आधीपासूनच सुरू केल्या जाते.नवरात्राच्या तयारी साठी घरोघरीच नव्हे तर सार्वजनिक ठिकाणीही अबाल वृध्दांपासून महिला व युवा वर्गाचाही सहभाग असतो. त्यामुळे चहुदिशेला उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले असते. याचाच परिणाम म्हणून की काय, नवरात्राच्या नऊ दिवसात प्रत्येक देवी भक्तांच्या चेह-यावर आनंद ओसंडून वाहत असतो. आज सुमुहूर्तावर घटस्थापना करून,आई भवानीच्या रूपाचे शक्तीच्या आराधनेचा जागराला प्रारंभ होतो. शैलपुत्री, ब्रम्हाचारीणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी, सिध्दिदात्री अशा नवदुर्गेच्या रूपाचे शक्तीची नऊदिवस जागराने आराधना केल्या जाते.तर महाराष्ट्रात तुळजाभवानी, रेणुका देवी, सप्तशृंगी, महालक्ष्मीच्या रूपाने शक्तीची उपासना केल्या जाते. तर अमरावती जिल्ह्यात अंबादेवी, एकविरा देवी, पिंगळा देवी, रूक्मिणी मातेच्या रूपाने शक्तीचा नवरात्रात या शक्तिचा जागर केल्या केला जातो.तर काही ठिकाणी दुर्गेच्या रूपाचे, कालीमातेच्या रुपाने,चामुण्डा मातेच्या रूपाने ही, शक्तीची आराधना व उपासना नऊ दिवस केल्या जाते. आराधनेसाठी किंवा उपासने साठी,देविची नांवे वेगवेगळी आहेत.परंतू नवरात्रीच्या नऊ दिवसांत या देवींच्या रूपाणे फक्त आणि फक्त शक्तीचीच आराधणा केल्या जाते. या नऊ दिवसातील शक्तीच्या रूपाणे मिळालेली उर्जा,मानवी मनाला भक्तीच्या रूपाने अवकाशात उंच भरारी घेण्यासाठी प्रेरणादायी ठरते.नवरात्रात शक्ती व भक्तीच्या संगमातून मिळालेली ऊर्जा, दसर्याच्या दिवसी सीमोल्लंघन करून विविध क्षेत्रात पराक्रम गाजवीस प्रेरणा देते. म्हणूच हे शारदीय नवरात्र शरद ऋतूतील आल्हाददायी वातावरणात व अवकाशातील प्रसंन्न चांदण्याचे दिवसात येते.



# अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी विभागातील ८१ मतदान केंद्रांना निवडणूक आयोगाची मान्यता

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक-२०२६ अंतर्गत अमरावती विभाग मतदारसंघातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाणा या ५ जिल्ह्याच्या क्षेत्रात एकुण ८१ मतदान केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावास भारत निवडणूक आयोगाने मान्यता प्रदान केली आहे, अशी माहिती अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी दिली.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीकरीता पाठविण्यात आलेल्या ८१ मतदान केंद्रांच्या प्रस्तावास भारत निवडणूक आयोगाने मान्यता प्रदान केली असल्याचे उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी एका पत्राद्वारे विभागीय आयुक्त यांना काल कळविले आहे. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातील जिल्हानिहाय मतदान केंद्रांची संख्या अनुक्रमे पुढील प्रमाणे आहे. अमरावती- २५, अकोला- १३, बुलढाणा- १८, वाशिम- ७, यवतमाळ- १८ अशा एकुण ८१ मतदान केंद्रांना मान्यता मिळाली आहे. येत्या २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत अमरावती विभागातील या मतदान केंद्रांवर निवडणुकीसाठी मतदान होणार आहे.

# कलावंतातील माणूस !



१९८२-८३ चा काळ असेल. मी तेव्हा नागपूर पत्रिकेत शहर प्रतिनिधी म्हणून काम करीत होतो. विद्यार्थीदशा होती. प्रमोद वाठोडकर, प्रमोद बिंड, नितीन इंगोले असे आम्ही सगळे श्री. प्रदीप देशपांडे यांच्या नेतृत्वात नागपूर पत्रिका परिवारात होतो. एक दिवस प्रदीपभाऊ म्हणाले, 'नाटकाला जाता का रे! आपल्याजवळ पास आहे.' आम्ही 'हो' म्हटले. सुप्रसिद्ध नाटककार श्री. प्रेमानंद गज्वी यांचे 'तनमाजोरी' हे सामाजिक विषयावरील नाटक होते. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या अनंत क्रीडा मंदिरात. नाना पाटेकर यांची जमीनदाराची मुख्य भूमिका होती . अनंत क्रीडा मंदिर हे व्यावसायिक नाट्यगृह नसल्याने तिथे नाटकाला लागणाऱ्या खूप सुविधा नव्हत्या. सेट तसा उघडाच होता. स्वतः नाना पाटेकर रंगमंचावर व्यवस्था बघत होते.

मी आणि प्रमोद वाठोडकर नाटकाला गेलो. नाना पाटेकरांनी जमीनदाराची खूप प्रभावी भूमिका केली. प्रेक्षक खिळून होते. नाना तेव्हा प्रसिद्धीच्या खूप झोतात नव्हते. नाटकाच्या शेवटच्या अंकात जमीनदारावर हल्ला होतो आणि तो कोसळतो. नाना जमीनदाराच्या भूमिकेतच होते. अंधार झाला, नाटक संपले. आम्ही खूप प्रभावित झालो. माझ्यातला पत्रकार जागा झाला. प्रमोदला म्हटले 'चल नाना पाटेकरांची मुलाखत घेऊ.' आम्ही पडद्याच्या मागे गेलो. पाहतो तर काय; स्टेजवर कोसळलेल्या जमीनदाराच्या भूमिकेतील नाना तसेच पडून होते. एखादा कलावंत भूमिकेशी कसा समरस होतो हे आम्ही तेव्हा अनुभवले.

पाच- सात मिनिटांनी ते उठले. बाजूला कोपऱ्यात जाऊन त्यांनी कपडे बदलले. तेव्हा अगदीच सडपातळ व्यक्तिमत्त्वाचे ते होते. आम्ही त्यांच्या जवळ गेलो. मी ओळख दिली आणि तुमची छोटीशी मुलाखत घ्यायची आहे असे म्हणालो. ते म्हणाले, 'मुलाखत कसली, आपण सहज गप्पा मारू. कपडे ठाकठिक करत, पाणी पित चेहऱ्यावरचा मेकअप पुसत त्यांनी सहज गप्पा केल्या. अगदी मनमोकळ्या. कलावंतांचा तोरा नाही की कोणता बडेजाव नाही . मी त्यांना शेवटी सहज विचारले 'आपण पूर्ण वेळ व्यावसायिक नाटकच करता की अधिक काही ?' ते म्हणाले, 'अरे नाटक वर्षभर थोडंच असतं. चालतं तोपर्यंत चालतं. माझा प्रिंटिंग प्रेस आहे, मी पोस्टर रंगवतो. घरचे लोक व्यवसाय बघतात. नाटक नसतं तेव्हा मी प्रेसमध्ये काम करतो, पोस्टर रंगवतो . शेवटी पोटापाण्याचा प्रश्न असतोच!' इतका सरळ साधा संवाद झाला. मीही हरखून गेलो.नाना मुळात माणसात रमणारे होते. त्यांची माणूस आणि माणुसकीची नाळ घट्ट होती. ते म्हणाले, 'चला चहा घेऊ, गावात चक्कर मारू.' नाट्य क्षेत्रातील काही मंडळी आणि आम्ही चालत चालत राजकमल चौकात गेलो.राजकमल चौकात रामभाऊ नेमाडेंचे 'रामभाऊ टी स्टॉल' (अन्नपूर्णा) होते. माणिक आमचा मित्रच. तिथे नानांसह सर्वांनी चहा घेतला. पुढे बोट दाखवून त्यांनी विचारले, 'हे काय आहे ?' आम्ही सांगितले, 'ही राजकमल टॉकीज आहे.' ते म्हणाले, 'माझा सिनेमा येणार आहे. अंकुश! तुम्ही अवश्य बघा.' काही काळाने नाना पाटेकरांचा 'अंकुश' सिनेमा आला आणि योगायोगाने तो राजकमल टॉकीज मध्येच लागला. नानाचा कसदार अभिनय त्यातही बघायला मिळाला.

नाना पाटेकरांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हिंदी चित्रपट सृष्टीत मराठी कलावंत असूनही त्यांनी दुय्यम तिय्यम स्थान नाही पत्करले. राजासारखे राहिले. नाना पाटेकरांच्या नावावर हिंदी सिनेमा चालला. स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. त्यांचा बुलंद आवाज, प्रभावी संवादफेक आणि कसदार अभिनय यामुळे नाना पाटेकर यांची प्रत्येक भूमिका संस्मरणीय ठरली. एखादे काल्पनिक पात्र वठवितांनाही त्यात अभिनयाची कसोटी लागतेच. कारण पात्र काल्पनिक असले तरी ते प्रत्यक्षात उतरावे लागते. हे पात्र रसिकांच्या हृदयात जो कोरून ठेवतो तो खरा नट .

नाना पाटेकरांनी 'प्रकाश बाबा आमटे'हा सिनेमा केला. श्री. प्रकाश आमटेंना सर्वांनी जवळून बघितले आहे.प्रकाश आमटेंचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व त्यांच्या बारीकसारीक लकबींसह उतरविणे महाकठीण. कारण लोक प्रत्यक्ष तुलना करतात. नानाने प्रकाश आमटे रसिकांच्या हृदयात उभा केला. निबिड अरण्यात राहुन लोकबिरादरी प्रकल्प उभा करणारा तो हाच असे प्रेक्षकांना वाटले. जयवंत दळवींच्या 'पुरुष' नाटकातील खलनायक नाना किंवा 'परिंदा' मधील गुन्हेगारी विश्वातील नानाची भूमिका त्या पात्राला डोळ्यासमोर उभे करतात. भूमिका कोणतीही असो नानाने जीवाची पर्वा न करता ती जिवंत केली. 'प्रहार' साठी सैनिकी शिक्षण घेतले.

नाना पाटेकर उत्तम अभिनेते होते हे निर्विवाद. हा कलावंत एक संवेदनशील समाजपुरुष होता, उत्तम माणूस होता. समाजातल्या दिन-दु:खितांसाठी कणव असणे वेगळे आणि समाजातील दुःख दूर करण्यासाठी स्वतःला झोकून देणे वेगळे. वंचितांसाठी नानाने स्वतःला झोकून दिले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी, अमृतासारख्या पाण्यासाठी आणि समाज व्यवस्थेला एकूणच भान देण्यासाठी नाना पाटेकर यांनी जे हलाहल पचविले ते 'विश्वनाथाच्या' भावनेने. सिनेमातल्या एखाद्या भूमिकेतून व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविणे सोपे असते पण व्यवस्थेला थेट प्रश्न करणे कठीण असते. नानाने हे कठीण काम अनेकदा केले.

नाना म्हणायचे आपल्या ओंजळीत बसते तेवढे घ्या! ओंजळीच्या बाहेर सांडलेले इतरांना खाऊ द्या.

आयुष्याची जितकी ओंजळ भरली होती तितकी त्यांनी आपल्या मिजाशीने भरभरून घेतली. ओंजळीच्या बाहेरचे खूप काही वंचितांना देऊन टाकले. त्यामुळेच नाना पाटेकर यांच्या जाण्याने सामान्य माणूस हळहळला. आपल्या माणसासाठी डोळे पाणावले. या महान कलावंतास व वंचितांच्या कैवाऱ्यास विनम्र अभिवादन!

**डॉ. किशोर फुले**
मो. ९४२३१२४६०८

# नानासारखी माणसं मरत नसतात...

नाना पाटेकर यांचे अचानकच झालेले निधन हे खरे तर मनाला अजूनही पटत नाही. माझ्या आणि मेधाच्या आजारपणात त्याने आम्हाला खूप चांगली साथ दिली. असे मित्र मिळत नाहीत. अशी माणसं मरत नसतात...

नानासारखी माणसं मरत नाहीत, ते कायमच आपल्यासोबत राहतील असे आपण गृहित धरतो. त्यामुळे नानाचे जाणे हा माझ्यासाठी खूप मोठा धक्का आहे. मी नानाला १९८५पासून ओळखतो. तेव्हा आम्ही थिएटर करीत होतो. 'अंधायुग' या नाटकात नाना व राज बब्बर काम करीत होते. आम्हा चार-पाच जणांना या नाटकासाठी बोलावले होते. नाना तेव्हा स्टार असलेल्या राज बब्बरसमोर काम करतोय याचे आम्हाला मोठे अप्रूप. आम्हाला स्टेजवर नक्की कुठे उभे राहायचे हेही समजत नव्हते. त्यामुळे असिस्टंट आमच्याशी नीट वागला नाही. जेवणाच्या सुट्टीत नानाने आम्हाला त्याच्या खोलीत बोलावून घेतले व त्या असिस्टंटला आमच्यासमोर खूप झापले. तेव्हा नायकाच्या खोलीत बसून जेवायला मिळाले, ही आमच्यासारख्या उमेदवारी करणाऱ्यासाठी मोठी गोष्ट होती. तेव्हापासून मी नानाचा 'फॅन' झालो ते आजपर्यंत!

नाना कायमच माझ्या संपर्कात असायचा. तो भेटल्यावर मोठ्याने ओरडायचा, ''काय रे भंडाऱ्या, कसा आहेस.'' मी करीत असलेल्या प्रत्येक कामाकडे त्याचे बारीक लक्ष असायचे . मी 'वास्तव' दिग्दर्शित करण्याचा निर्णय घेतल्यावर त्याचा फोन आला. संजय दत्तबरोबर काम करतोय याचे त्याला आश्चर्य वाटले आणि त्याने काही शंकाही विचारल्या. मला हे जमेल असे मी त्याला सांगितले. शेवटी चित्रपट प्रदर्शित झाल्यावर त्याने फोन करून 'खूप चांगला झालाय,' असे आवर्जून सांगितले. 'दबंग' प्रदर्शित झाल्यावरही त्याचा फोन आला. 'तू खूप छान काम केलंय,' असे म्हणाला. मी त्याला म्हणालो, ''अरे, माझं सोनालीच्या वडिलांचं खूप छोटंसं काम आहे.'' मग त्याने मी एका प्रसंगात टेरेसवरून उडी मारतो त्याचे वर्णन करून या ठिकाणी तू कमाल काम केले आहेस असा अभिप्राय दिला. थोडक्यात, तो भूमिकेच्या लांबीपेक्षा काम कसे केलेय यालाच महत्त्व द्यायचा.

मी 'नटसम्राट' या नाटकाच्या प्रेमात पडून त्यावर चित्रपट बनवायचा ठरवल्यावर प्रथम मध्यवर्ती भूमिकेसाठी नानाला विचारले. मी स्क्रीप्ट घेऊन नानाला भेटलो, वाचन केले. नानाने सर्व चित्रपटच पाठ करून टाकला! आम्ही दोघे एकत्र आहे म्हटल्यावर हा चित्रपट होणारच नाही, अशी चित्रपटसृष्टीत चर्चा होती. मी नानाबरोबर काम करताना मला कधीच समस्या जाणवल्या नाहीत. तो सूचना करायचा, मात्र त्या चित्रपटासाठी आवश्यक अशाच असायच्या.



चित्रण झाल्यावर प्रत्येक प्रसंग नाना नीट पाहायचा. साउंड रेकॉर्डिस्ट व कॅमेरामनकडून काही चुका व्हायच्या. नाना त्यांना खूप बोलायचा.

त्यामुळे ते थरथरा कापायचे. मी एकदा नानाला म्हटले आपल्याला या दोघांना काढून टाकावे लागेल, कारण ते तुला खूप घाबरल्याने काम करू शकत नाहीत. यावर नानाने त्या दोघांनाही बोलावून मिठीत घेतले आणि रागावण्यामागचे कारण सांगितल्यावर पुढे सर्व सुरळीत झाले. 'नटसम्राट'च्या पार्श्वसंगीताबद्दलही त्याला खूप शंका होत्या व ते पूर्ण बदलले पाहिजे असे त्याने 'ट्रेलर' पाहून सांगितले. मी मात्र विरोध केला व पूर्ण चित्रपट पाहिल्यावर ठरवू असे सांगितले. पूर्ण चित्रपटाचे पार्श्वसंगीत ऐकल्यावर तो खूष झाला.

नाना असा एखाद्या लहान मुलासारखा होता. कायम त्याच्या 'फार्महाउस'वर बोलवायचा. बोलता-बोलता मटण बनवायचा, मध्येच ते हलवून यायचा, त्यात मसाला टाकून यायचा. फार्महाउसचं, आपल्या स्वयंपाक कलेचे त्याला खूप कौतुक होते. अभिमानही होता. माझ्या आणि मेधाच्या आजारपणात त्याने आम्हाला खूप चांगली साथ दिली. असे मित्र मिळत नाहीत. अशी माणसं मरत नसतात आणि तो गेला याचा विचारही मला करवत नाही.

**महेश मांजरेकर**

## 'नाम'चा आधारवड

नाना पाटेकर यांच्या निधनाच्या बातमीने 'नाम' परिवार आणि 'नाम'च्या लोकचळवळीत सहभागी असलेले असंख्य लोक दुःखात आहेत. नाम फाउंडेशनची स्थापना १५ फेब्रुवारी २०१५ रोजी नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या पुढाकारातून झाली. शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने नाम फाउंडेशनची सुरुवात झाली. मात्र ही केवळ मदत देणारी संस्था न राहता लोकांच्या सहभागातून उभी राहणारी एक लोकचळवळ व्हावी, यासाठी नानांनी सातत्याने प्रयत्न केले. शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न, शिक्षण, आरोग्य आणि शेती या क्षेत्रांमध्ये सातत्याने पाठबळ कसं देता येईल, यासाठी नाम फाउंडेशनच्या माध्यमातून काम सुरू झाले. गेल्या दहा-अकरा वर्षांत महाराष्ट्रासह देशातील १३ राज्यांमध्ये 'नाम' फाउंडेशनचे काम पोहोचले. शेती समृद्ध व्हावी आणि महाराष्ट्र दुष्काळमुक्त व्हावा, हा नानांचा सातत्याने प्रयत्न होता. नानांचा भर केवळ एखाद्या गावाला मदत करण्यावर नव्हता, तर लोकांचा सहभाग घेऊन मोठे काम कसे उभे राहील, यावर होता. ज्या-ज्या गावांमध्ये नाम फाउंडेशनच्या माध्यमातून काम झाले, त्या गावांमधील लोक या चळवळीशी जोडले गेले. अनेक कंपन्या सीएसआरच्या माध्यमातून नामच्या पाठीशी उभ्या राहिल्या. उद्योग क्षेत्रातील अनेक व्यक्तींनीही या कामाला पाठबळ दिले.

त्यामागे नाना पाटेकर यांचं सामाजिक कार्य आणि त्यांच्या कामावरील विश्वास ही मोठी प्रेरणा होती. शेतीची दुरुस्ती, पूरपरिस्थिती किंवा अन्य नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी अडचणीत आला, अशा वेळीही नाम फाउंडेशन त्याच्या मदतीला उभी राहिली. नाना पाटेकर यांच्या सहकार्याने आणि असंख्य लोकांच्या सहभागातून उभी राहिलेली ही लोकचळवळ आहे. त्यांनी उभी केलेली ही चळवळ यापुढेही अखंडपणे पुढे नेण्याचा प्रयत्न राहील.

**गणेश थोरात,**
सीइओ, नाम फाउंडेशन



पहिली माळ

# प्रेमळ आणि संयमी मातृरुप रेवती देशपांडे

रसिकांनो, २०१९ पासून अंबाबाईच्या नवरात्रामध्ये मी लेखमाळा लिहत असते. आपणही त्याला उत्स्फूर्तपणे दाद देत असता.यावर्षी म्हणजे २०२६ ला माझ्या सहवासातील स्त्री व्यक्तिमत्व ज्यांचेकडून मी काहीतरी शिकले किंवा ज्यांचा स्वभाव गुण मला उल्लेखनीय वाटतो अशा व्यक्तींबद्दल..दरवर्षीप्रमाणे माळा लिहिण्याचा मानस आहे. तो मानस पूर्ण करण्याची शक्ती जगन्माता अंबाबाई देईलच.तेंव्हा देवी सरस्वतीच्या रूपाला वंदन करून माझी ही पहिली माळा रेवती श्रीकांत देशपांडे, अमरावती यांचे बद्दल लिहिणार आहे.तसे म्हणाल, तर माझा आणि सौ. रेवती ताईंचा वर्षानुवर्षाचा सहवास आहे असे नव्हे. गेल्या दोन वर्षापासून मी सौ. रेवतीताईंना ओळखते.

सौ. रेवतीताई खूप उत्साही व आनंदी असतात. विशेष असे की, त्या शिक्षक संघाचे माजी आमदार आदरणीय श्रीकांत देशपांडे यांच्या पत्नी आहेत. पण त्यांच्या वागण्यात कुठल्याही प्रकारचा तोरा नसतो. मी कुणीतरी विशेष आहे असे त्यांच्या वागण्या-बोलण्यात अजिबात जाणवत नाही.खरं म्हणजे हीच गोष्ट मला फार आवडलेली आहे त्यांच्या स्वभावातली. स्वतःमध्ये काहीही विशेष गुण नसताना अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होणाऱ्या किंवा चहा पेक्षा किटली गरम..असा अनुभव देणा-या व्यक्ती आपण सतत बघत असतो. अशावेळी मला रेवतीताई वेगळ्या वाटतात.



पती माजी आमदार असले तरी आजही घरी येणाऱ्यांची सतत वर्दळ असते. रेवतीताई सतत हसत मुखाने आनंदाने ती जबाबदारी सांभाळतात. जेवणाला कधी किती लोक असतील हेही न सांगता येणाऱ्या ह्या व्यक्तीकडून अन्नपूर्णेच्या रूपाचा भास होतो. अगदी स्वतः लक्ष घालून, घरातील काम गड्यांकडून सगळ्यांना आग्रहाने, समाधान मिळेल असे जेवण देण्याचा त्यांचा कटाक्ष असतो.

रेवतीताई स्वतः सुविद्य आहेत. पण घरची जबाबदारी सांभाळण्यातच आनंद मानून पतीच्या समाजसेवेच्या कार्यामध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मदत करणे, घराची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेऊन ती कसोशीने पूर्ण करणे, हा त्यांचा आता स्थायीभाव झालेला आहे असे दिसते.कामाच्या गर्दीत घराला दिवस..दिवस भेट न देऊ शकणा-या, नव-याबद्दल तक्रार करण्याच्या ऐवजी रेवतीताई त्यातही आनंद शोधतात.रेवतीताईंचे माहेर हैद्राबादचे..त्यामुळे माहेरची मंडळी क्वचितच येणार पण श्रीकांतसरांचा परिवार त्या आनंदाने आणि संयमाने,प्रेमाने सांभाळतात त्यामुळे हा परिवार त्यांचा केंव्हा होऊन गेला हे त्यांनाही कळले नाही. प्रसिद्धीच्या झोतात फारशा न रमणा-या रेवती ताई, खूप समाधानी आहेत.

सौ.रेवतीताईंची,अशीच पतीच्या कार्याला मदत करण्याची आनंदी वृत्ती,व कुटुंबाचा आधार बनण्याची शारीरिक आणि मानसिक शक्तीत वृध्दी करो अशी अंबाबाईच्या चरणी विनवणी.अशा प्रेमळ, संयमी आणि आनंदी अशा मातृ स्वरूपाला त्रिवार वंदन आणि अंबाबाईच्या ह्या मातृरुपाला २०२६ ची ही पहिली माळा अर्पण करते..

**ॲड.सुलभा गोगरकर**
अमरावती
भ्रमणध्वनी क्र
९४२३६००४६८

# नाना गेला !!!



नाना गेल्याची बातमी कळल.पण,माझा विश्वासच बसेना आणि काय करावे तेच सुचेना. बेधडक,बिनधास्त आणि कुणाची भाड-भिड न बाळगणारा आणि आपल्या प्रकृतीबद्दल सजग असणाऱ्या नानाला अचानक हृदयविकाराचा झटका कसा येऊ शकतो हेच कळत नव्हते.

एक गोष्ट मात्र नक्की.नाना मनमुरादपणे, स्वतःच्या अटींवर कुठलीही तडजोड न करता बिनदिक्कतपणे जगला.बाहेरून कोणालाही रांगडा आणि आक्रमक असा वाटावा अशा नानामध्ये एक अत्यंत हळवा पैलू होता हे मला अनेक वर्षांपूर्वी जाणवले होते.माझे मन झराझर अनेक वर्ष मागे गेले आणि अनेक आठवणी दाटून आल्या.

अमित दाते नावाचा माझा एक वकील मित्र आहे.तो एक निष्णात वकील तर आहेच,पण त्यापेक्षा त्याचे संगीत आणि साहित्य यांच्यावर विलक्षण प्रेम आहे.यामुळे आमच्या तारा जुळल्या होत्या.अमित त्यावेळेला नानाची कुठलीतरी केस चालवत होता आणि त्यामुळे तो नानाला चांगलाच ओळखायचा.एके दिवशी मी आणि अमित मुंबईला रात्री गप्पा मारायला नानाकडे गेलो.रात्री ९ ते पहाटे ३ पर्यंत आमच्या गप्पा रंगल्या होत्या. नाना त्यादिवशी आपल्या आयुष्यातल्या अनेक खाजगी गोष्टींच्या विषयी सुद्धा मन मोकळेपणाने बोलत होता.काही काळानंतर तो एकदम हळवा झाला आणि त्याच्या कविता वाचून दाखवायला लागला.नानाची ही नाजूक बाजू मला तोपर्यंत माहीतच नव्हती.त्याचा मुलगा मल्हार याच्यावर त्याचे प्रचंड प्रेम. मल्हार त्याकाळी शिवाजी पार्कला नीलकांतीकडे राहायचा.

गंमत अशी झाली की,त्याच्या दुसऱ्याच दिवशी 'लोकसत्ता'मध्ये विजय तापसने माझ्यावर एक लेख लिहिला होता.त्यावेळी मी 'एल अँड टी इन्फोटेक'चा सीईओ म्हणून काम बघत होतो.पण त्या लेखांमध्ये संगीत,साहित्य, अर्थशास्त्र,गणित आणि विज्ञान यांच्यावर प्रेम असणारा पण एक मोठी कंपनी चालवणारा असे माझे कौतुकाने केलेले वर्णन माझ्या फोटो सकट त्या लेखात छापले होते. सकाळी ९ च्या सुमारास मला नानाचा फोन खणाणला. आणि त्याने 'भ' च्या भाषेमध्ये मला प्रेमाने शिव्या हसडल्या. 'अरे भ..तू एवढं काही करतोस हे मला काल का नाही सांगितलंस ?'.मी अर्थातच गप्प.त्यानंतर पुन्हा भेटायचे ठरले आणि फोन बंद झाला.

त्यानंतर अधून मधून फोन चालूच असायचे. गाण्यामध्ये किशोरी अमोणकर आणि राहुल देशपांडे हे त्याचे वीक पॉईंट्स होते. त्यांच्या मैफिलीला तो कित्येकदा हजर असायचा. एकदा ठाण्याला आनंद नाडकर्णीने किशोरी आमोणकरांचे गाणे ठेवले होते. तिथे नीलकांती आणि नाना दोघेही आले होते. मधूनच नाना कुठेतरी गायब झाला आणि मी आणि निलकांती नानाला शोधत फिरत होतो हे मला चांगलेच आठवतेय.

एकदा पुण्याला गणेश कला क्रीडा मध्ये समोर २००० लोक असलेल्या एका मोठ्या समारंभात नाना, संजय आवटे, सम्राट फडणीस आणि मी असे सगळे बोलणार होतो. संजय आणि सम्राट नेहमीप्रमाणेच उत्कृष्ट बोलले पण नाना जेव्हा बोलायला उठला तेव्हा 'मी अच्युतसमोर काय बोलणार ?'असे चक्क म्हणून तो बोलला होता ते अतिशय परखड आणि ऐकण्यासारखे होते हेही आठवतेय.असेच एकदा मुंबईच्या रवींद्र नाट्य मंदिरात नाना पाटेकर आणि सोनाली कुलकर्णी यांचा इंटरव्ह्यु होता. 'लाईमलाईट'या पुस्तकाचे प्रकाशन त्याच्या हस्ते झाले तेव्हा तो पुण्याला मुंबईहून विमानाने आला होता.त्याला घ्यायला मी एअरपोर्टवर गेलो होतो.तिथून आम्ही जे निघालो ते फर्ग्युसन रोडवरच्या 'सुर्वेज' रेस्टॉरंट मध्येच पोचलो. त्याला तिथलच मटन आवडायचे.त्याला तिथले सगळे कर्मचारी ओळखायचे.मग त्याने खास ऑर्डर दिली आणि आम्ही मस्तपैकी जेवण करून गप्पा मारत बसलो होतो तेही सगळे आठवते... एकदा रात्री १०.३० वाजता मला अचानक त्याचा फोन आला. पुन्हा सुरुवात 'भ'कारांती वाक्यानच झाली. मला आता त्याची सवय झाली होती.तो म्हणाला'अरे तुझं कॅनव्हास हे पुस्तक तू का लिहिलस ?आता नीलकांती मला युरोपमधले सगळे म्युझियम्स दाखवायला घेऊन जा' असे माझ्या मागे लागलेली आहे आणि त्याचे केवळ कारण तू आहेस'. मला त्यापुढे काय बोलावे तेच सुचेना. 'पुण्याला माझ्या फार्महाऊस वरती ये, भरपूर गप्पा मारू आणि मजा करू' असेही तो म्हणाला. मग दरवेळी फोनवर भेटायचे ठरायचे पण नेमके त्यावेळी त्याला किंवा मला कुठेतरी जायचे असायचे आणि त्यामुळे त्याच्या शेतावर कधी जाणंच झाले नाही. आज जर मी त्या शेतावर गेलो तर ते थेट त्याच्या अंत्यविधीसाठीच!

मकरंद अनासपुरे याच्याबरोबर त्याने नाम नावाची एक संस्था शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सुरू केली होती. मकरंदसुद्धा मला खूप जवळचा आणि विशेषतः त्या दोघांनी सामाजिक भान ठेवून ही संस्था चालू केली आणि अनेक शेतकऱ्यांना मदत केली याचे मला नेहमीच कौतुक वाटायचे. पण फक्त त्यांना मदत करून उपयोग होणार नाही तर आपण सध्याची समाज अर्थव्यवस्थाच बदलली पाहिजे, नाहीतर ही फक्त मलमपट्टी होईल असे माझे मत मी नानाला नेहमी सांगत असे. माझ्या 'अनर्थ'या पुस्तकात मी याची मांडणी सविस्तर केलेली आहे.म्हणून मी लॉ कॉलेज रोडवरच्या त्याच्या घरी जाऊन त्याला माझं अनर्थ पुस्तक भेटही दिले होते. त्यावेळी त्याने मला पुरुषोत्तम बेर्डेचे 'क्लोज एन्काऊंटर' वाचलेस का असे विचारले ?मी ते वाचलेल नव्हते.कामाठीपुरा च्या आसपास या दोघांचे लहानपण गेलेले होते त्यामुळे नानाला या पुस्तकाविषयी खास प्रेम होते.यावर एक वेब सिरीज आम्ही करणार आहोत आणि त्यात मी काम करणार आहे असेही त्याने सांगितले.मी लगेच पुरुषोत्तमला फोन केला आणि पुरुषोत्तमने मला लगेच ते पुस्तक पाठवले. ते पुस्तक अफलातूनच आहे. 'अंकुश'या चित्रपटाचे दिग्दर्शक एन चंद्रा हे माझ्या चांगल्याच परिचयाचे. याच चित्रपटात काम करणारा सुहास पळशीकर अंधेरीला आमच्या घरी बराच काळ राहायचा.त्याच्याकडून आणि एन चंद्रांकडून नानाविषयी अनेक गोष्टी कळायच्या.त्याचे परिंदा, अंगार, सलाम बॉम्बे आणि गुलाम मुस्तफा हे सिनेमे मला खूप आवडायचे.परिंदा मधला अण्णा आपण कधीच विसरू शकणार नाही. अंगारमध्ये त्याने व्हिलनचे काम केले.गुन्हेगार असलेल्या नानाचा एक मतिमंद मुलगा असतो आणि तो त्याचा खूप लाडका असतो.माझाही मुलगा निहार ऑटिस्टिक असल्यामुळे मला तो सिनेमा बघताना मी खूप रिलेट करू शकत होतो आणि त्यामुळे खूप रडू येत होते हे आठवते. गुलाम मुस्तफा मधले त्याचे आणि रविना टंडनचे तेरा घम, मेरा घम हे गाणे आणि त्यावरचे चित्रण मला अतिशय आवडते आणि मी ते बऱ्याच वेळेला युट्युबवर ऐकत असतो.तशी नानाची नाटके आणि सिनेमे अनेक आहेत. अनेक गाजले आणि त्या सगळ्यांवर बोलायचे म्हणजे एक मोठे आर्टिकल त्यासाठी वेगळे लिहावे लागेल.पण प्रत्येक सिनेमामध्ये त्याची भूमिका लक्षात ठेवावी अशीच असायची. एकाच वेळी अतिशय उत्कृष्ट शूटर असणारा, पर्यावरणाविषयी जागरूक असणारा आणि कधीही एकही झाड न तोडणारा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणासाठी पैसे देणारा, घरी गेले की स्वतः पदार्थ करून वाढणारा, स्वतःच्या शेताला आपली आई मानून त्याचा अपमान होऊ नये म्हणून शेतातही अनवाणी फिरणारा, प्रचंड प्रसिद्धी आणि पैसा समोर दिसत असतानासुद्धा अत्यंत साधेपणानं राहणारा, कुठल्याही राज्यकर्त्याचं मत पटले नाही तर सरळ त्याच्या तोंडावर सांगणारा, स्वतःच्या अंत्यविधीसाठी आपल्या शेतातली काही लाकडं जमा करून तिथेच आपला अंत्यविधी व्हावा अशी इच्छा बोलून दाखवणारा, स्वच्छंदी, मनस्वी आणि बेफिकीर पण तरीही अत्यंत प्रेमळ, हळवा आणि मदतीसाठी धावणारा नाना आज आपल्याच नाही हे अजूनही पटतच नाहीये.

आमचे मित्र डॉ. प्रसाद पिंपळकर यांच्या शब्दांमध्ये सांगायचं तर'नाना करके प्यार तुम्हीसे कर बैठे'असेच म्हणावसे वाटते.

**अच्युत गोडबोले**



paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# वान धरणाचे पाणी अकोल्याला देण्यापूर्वी तेल्हाऱ्यातील योजना पूर्ण करा!

## धरणग्रस्तांच्या त्यागानंतरही पाण्यासाठी वणवण; जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनींच्या त्यागातून उभ्या राहिलेल्या वान धरणाचे पाणी अकोला शहराकडे वळविण्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पाणीपुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये अद्याप पाणीपुरवठा योजनांची कामे अपूर्ण असून, नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अकोला शहराकडे पाणी वळविण्यापूर्वी तेल्हारा तालुक्यातील रखडलेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण कराव्यात, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



वान धरणाच्या निर्मितीसाठी अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या. धरणामुळे शेतीला पाणी मिळेल, गावांचा पाणीप्रश्न सुटेल आणि स्थानिक नागरिकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, आजही काही गावांमध्ये पाणीपुरवठ्याची कामे अपूर्ण असल्याने धरणग्रस्तांच्या त्यागाचा लाभ स्थानिकांना कितपत मिळाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. आता जिल्हा प्रशासन या मागणीची कितपत दखल घेते आणि प्रलंबित पाणीपुरवठा योजनांना प्रत्यक्ष गती मिळते का, याकडे तेल्हारा तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### धरण उभारणाऱ्यांनाच पाण्यासाठी संघर्ष

उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची होणारी धावपळ, महिलांना पाणी आणण्यासाठी करावी लागणारी कसरत आणि गावांमधील अपुऱ्या पाणीपुरवठ्याची समस्या यामुळे स्थानिकांमध्ये नाराजी आहे. एका बाजूला वान धरणातील पाण्याच्या वितरणाचे नियोजन होत असताना दुसरीकडे तेल्हारा तालुक्यातील काही गावांना पुरेसे पाणी मिळत नसेल, तर प्रलंबित योजनांच्या पूर्ततेला प्राधान्य देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

वान धरणातील पाणी शेगाव, खामगाव, संग्रामपूर, नांदुरा तसेच बुलढाणा जिल्ह्यातील विविध गावांना आणि अकोला शहराला देण्याच्या नियोजनाला स्थानिकांचा विरोध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, इतर भागांना पाणी देताना धरणग्रस्त आणि तेल्हारा तालुक्यातील नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होऊ नये, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

### प्रलंबित योजनांसाठी कालबद्ध कृती आराखड्याची मागणी

जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे सादर करण्यात आलेल्या निवेदनात तेल्हारा तालुक्यातील अपूर्ण पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेऊन संबंधित विभागाला तातडीने कामे पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रत्यक्ष परिस्थिती दर्शविणारी छायाचित्रेही निवेदनासोबत जोडण्यात आल्याचे सांगण्यात आले. केवळ आश्वासने देण्याऐवजी प्रत्येक गावातील पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती तपासावी, रखडलेल्या कामांतील अडथळे दूर करावेत आणि योजना पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. वान धरणाच्या पाण्याचे नियोजन करताना स्थानिकांची गरज आणि धरणग्रस्तांचे हित यांचाही विचार व्हावा, अशी मागणी पुढे आली आहे.

### त्यागाची जाणीव ठेवून पाणी द्या!

'वान धरणाचे पाणी कोणत्या दिशेने वळवायचे, यापेक्षा ज्या भागातील लोकांनी त्यासाठी मोठा त्याग केला, त्या भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी कधी मिळणार, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

धरणातील पाण्याचा लाभ तेल्हारा तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना प्रत्यक्ष मिळाला पाहिजे,' अशी भूमिका जिल्हा परिषदेचे माजी सभापती पुंडलिकराव अरबट आडसूळ यांनी मांडली. तर, 'शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आणि त्यांच्या त्यागातून धरण उभे राहिले. आता त्यांच्या घरापर्यंत पाणी पोहोचविण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यामुळे अकोला शहराकडे पाणी वळविण्याच्या नियोजनासोबतच तेल्हारा तालुक्यातील रखडलेल्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलली पाहिजेत,' असे कृषी उत्पन्न बाजार समिती, तेल्हाराचे संचालक डॉ. ज्ञानेश्वर तराळे यांनी सांगितले.

# कृषी विद्यापीठाच्या ९५ शिफारशींना मान्यता; रब्बी हंगामासाठी तंत्रज्ञानाचा 'बूस्टर डोस'!

■ प्रतिनिधी | अकोला ■

## नऊ नवीन पीक वाणांसह १० कृषी यंत्रे-अवजारे आणि ७६ तंत्रज्ञान शिफारशींचा समावेश



बदलत्या हवामानात शेती अधिक उत्पादनक्षम आणि फायदेशीर करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने संशोधित केलेल्या तब्बल ९५ कृषी शिफारशींना मान्यता मिळाली आहे. यामध्ये नऊ नवीन पीक वाण, १० कृषी यंत्रे व अवजारे आणि ७६ कृषी तंत्रज्ञानविषयक शिफारशींचा समावेश आहे. रब्बी व उन्हाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर या संशोधनाचा शेतकऱ्यांना कितपत लाभ मिळतो, याकडे लक्ष लागले आहे.

विद्यापीठाच्या संशोधन संचालनालयातर्फे आयोजित विदर्भ विभागीय कृषी संशोधन व विस्तार सल्लागार समितीच्या रब्बी व उन्हाळी हंगाम २०२६ च्या बैठकीत ही माहिती देण्यात आली. संशोधन संचालक डॉ. देवानंद पंचभाई यांनी ५५ व्या संयुक्त कृषी संशोधन व विकास समितीच्या बैठकीत मान्य झालेल्या शिफारशींचा आढावा सादर केला. जागतिक हवामान बदल आणि दुष्काळी परिस्थितीचा विचार करता शेतकऱ्यांनी एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब करून विद्यापीठाने विकसित केलेले आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले.

कृषी संशोधनाचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात कृषी विभागाची भूमिका मध्यवर्ती असल्याचे ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. सुभाष पुरी यांनी स्पष्ट केले.

अटारी, पुणेचे संचालक डॉ. सुब्रतो रॉय यांनी बदलत्या हवामानात कृषी विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतीसाठी मार्गदर्शक ठरेल, असे सांगितले. आनंद कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. बी. कथेरिया यांनी विद्यापीठाच्या 'मॉडेल व्हिलेज' संकल्पनेचे कौतुक केले, तर महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिलीप स्वामी यांनी विद्यापीठाने संशोधित केलेल्या पीक वाणांखालील क्षेत्र वाढविण्याची गरज अधोरेखित केली.

बैठकीच्या तांत्रिक सत्रात हवामान अंदाज, हरभरा लागवड, कीड व रोग नियंत्रण आणि रब्बी व उन्हाळी हंगामासाठी उपलब्ध बियाण्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शेतकरी आणि शास्त्रज्ञांमधील संवाद वाढवून संशोधित तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष शेतीत वापर वाढविण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६१३/२०२६ प्रोसेस नं. १२३०९/२०२६
चौ.ता. १७/११/२०२६ दिनांक : २४/०९/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. माया शिवलाल गोळे २. सौ. किर्ती संदिप पाटील रा. येवता, पो. विझोरा, ता. जि. अकोला. ३. भाग्यश्री शिवलाल गोळे. १ व ३ रा. श्रीविनायक सहनिवास, फ्लॅट नं. ३०६, न्यु तापडिया नगर, खरप रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शिवलाल जगन्नाथ गोळे
**पत्ता :-** रा. श्रीविनायक सहनिवास, फ्लॅट नं. ३०६, न्यु तापडिया नगर, खरप रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शिवलाल जगन्नाथ गोळे यांचे दि. १९/०९/२०२५ रोजी राहत्या घरी, नगर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

न्यू तापडिया वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# १५ वर्षांचा संघर्ष अखेर फळाला! शिक्षकांच्या हक्काच्या निधीला व्याजासह न्यायालयीन कवच

■ प्रतिनिधी | अकोट ■

स्वतःच्याच हक्काच्या पैशांसाठी १५ वर्षे प्रतीक्षा करणाऱ्या शिक्षकांना अखेर न्यायालयाने दिलासा दिला आहे. डीसीपीएसअंतर्गत कपात झालेली रक्कम व्याजासह जीपीएफ खात्यात जमा करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ७ ऑक्टोबर रोजी दिले. अकोला जिल्ह्यातील ६७ शिक्षक व शिक्षिकांच्या याचिकेवर निर्णय देताना राज्य शासन आणि जिल्हा परिषद प्रशासनाला १५ कामकाजाच्या दिवसांत रक्कम जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर २००८ मध्ये डीसीपीएस योजना लागू करण्यात आली होती. त्यानंतर २००८ ते २०११ या कालावधीत कपात झालेली रक्कम जीपीएफ खात्यात वळती करण्यासाठी शासनाने १९ जुलै २०११ रोजी निर्णय घेतला. मात्र, अकोला जिल्हा परिषद प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी झाली नसल्याने शिक्षकांना स्वतःच्या निधीसाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागली.

वारंवार निवेदने आणि आंदोलने करूनही प्रश्न न सुटल्याने सीपीएफ टू जीपीएफ कृती समितीच्या पुढाकारातून ६७ शिक्षकांनी न्यायालयात याचिका दाखल केली. अखेर न्यायालयाच्या आदेशाने संबंधित रक्कम व्याजासह जीपीएफ खात्यात जमा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**कृती समितीच्या लढ्याला यश**

अरविंद आगाशे, अमर भागवत, अमर गजभिये आणि भूषण भडांगे यांच्या नेतृत्वाखाली हा लढा उभारण्यात आला. याचिकाकर्त्यांची बाजू ॲड. प्रदीप पाटील क्षीरसागर यांनी मांडली. तर 'पंधरा वर्षांच्या संघर्षानंतर न्यायालयाच्या आदेशामुळे शिक्षकांना दिलासा मिळाला आहे. सर्व शिक्षकांची रक्कम खात्यात जमा होईपर्यंत लढा सुरूच राहील,' अशी प्रतिक्रिया कृती समितीचे निमंत्रक अमर भागवत यांनी दिली. या निर्णयामुळे संबंधित ६७ शिक्षकांना दिलासा मिळण्याबरोबरच याच स्वरूपाचा प्रश्न असलेल्या अन्य शिक्षकांच्या आशाही पल्लवित झाल्या आहेत.

## महाराजा अग्रसेन जयंतीची शोभायात्रा

**अकोला :** अग्रवाल समितीच्या वतीने अग्रसेन भवनात आयोजित जयंती उत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.आज रविवार दि ११ ऑक्टोबर रोजी साय ६:३० वाजता पोलीस लॉन मध्ये महाराजा अग्रसेन यांचा मुख्य जयंती सोहळा आयोजित करण्यात आला असून यात प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील सुप्रसिद्ध उद्योगपति पवन सराफ तथा संभाजीनगर येथील उद्योगपति डॉ. सुशील भारुका उपस्थित राहणार आहेत.

# १४ ऑक्टोबरला तेल्हारा तहसीलमध्ये महसूल लोकअदालत

## जमिनींचे व रस्त्यांचे वाद निकाली काढण्यावर भर; प्रलंबित महसुली प्रकरणांवर होणार सुनावणी

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तालुक्यातील नागरिकांची प्रलंबित महसुली प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्यासाठी तेल्हारा तहसील कार्यालयाच्या वतीने बुधवार, १४ ऑक्टोबर २०२६ रोजी 'महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत अभियान' आयोजित करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून विविध महसुली वादांवर सुनावणी घेऊन प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.



शासनाच्या महसूल व वनविभागाच्या निर्देशानुसार हे अभियान राबविण्यात येत आहे. तेल्हारा तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्या कार्यालयात होणाऱ्या या लोकअदालतीत तहसीलदार, मंडळ अधिकारी तसेच नायब तहसीलदार (महसूल) यांच्या न्यायालयात प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक महसुली प्रकरणांवर सुनावणी घेतली जाणार आहे.

या अभियानात जमिनींचे वाद, रस्त्यांसंदर्भातील प्रकरणे तसेच अन्य महसुली प्रकरणांचा निपटारा करण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या महसुली वादांमध्ये संबंधित पक्षकारांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी वादी-प्रतिवादींनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे महत्त्वाचे आहे. बुधवार, १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता तेल्हारा तहसील कार्यालयात संबंधितांनी उपस्थित राहावे. महसुली वाद सामंजस्याने सोडविण्यासाठी नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी महेश राम गुंडे यांनी केले आहे.

# पोपटखेडमध्ये मच्छरांचा प्रादुर्भाव

## पथदिवे बंद, विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची प्रतीक्षा

■ प्रतिनिधी | अकोट ■

स्गट ग्रामपंचायत पोपटखेडच्या वॉर्ड क्रमांक २ मध्ये मच्छरांचा वाढता प्रादुर्भाव, बंद पथदिवे आणि विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका अथवा व्यायामशाळेच्या सुविधेचा अभाव असल्याने नागरिक व विद्यार्थ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे.

मच्छर प्रतिबंधक फवारणीसाठी १५ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायतीला निवेदन देऊनही अद्याप ठोस उपाययोजना झाल्या नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी अंधारातून ये-जा करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.



**जाहीर नोटीस**

**अकोला येथील वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांच्या न्यायालयात**

'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १, ५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब, क्र. २

दावा रु. /- आर.सी.एस.नं. ४०१ / २०२५
चौ. ता.: २७/१०/२०२६

साई कन्स्ट्रक्शन ....वि... अशोक +02

बनाम :- अशोक ए. सोमानी, रा. १७९७, कलाल की चाल, अकोला, ता. जि. अकोला.

ज्याअर्थी वादी यांनी 'SUIT FOR EVICTION, POSSESSION, ARREARS OF RENTAND INQUIRY INTO FUTURE MESNE PROFIT.', तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक २७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व शंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पुष्ट्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किनालेल्या इतर कोणत्याही दस्ताऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक ०६/१०/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**चौकशीची जाहिर नोटीस**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ३५/२६ कलम – १९ जा.क्र. / २६७३/२६
दिनांक : २८/०९/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमाक :** INSTIUTTE OF SOCIAL WELFARE AKOLA, TQ. & DIST. AKOLA

**अर्जदार :-** श्री सुधीर श्रीधरराव ढोणे रा. ए-१७, पत्रकार कॉलनी अकोला.

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१ अकोला विभाग अकोला हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेला मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन) :- रोख रक्कम रू. ५००/- अध्यक्ष/सचिव जवळ जमा आहे.
स्थावर मिळकत (वर्णन) :- काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला – १ यांच्या शिक्क्यानिशी आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २९९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# सराईत गुन्हेगार अश्शु शहा वर्षभरासाठी स्थानबद्ध

## अकोट फाईल परिसरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद असलेल्या अजमत शहा उर्फ अश्शु रहमत शहा (वय २४) याला महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधद्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती (एमपीडीए) कायद्यान्वये एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांनी १० ऑक्टोबर रोजी यासंदर्भातील आदेश दिल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन अकोला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध केले.

अजमत शहा हा अकोला शहरातील रमाबाई वाडी, अशोक नगर, नायगाव व अकोट फाईल परिसरात राहणारा आहे. त्याच्याविरुद्ध घातक शस्त्रांनी दुखापत करणे, चोरी, गुरेढोरे चोरी, फौजदारी स्वरूपाची धमकी देणे, शांतताभंग घडविण्याच्या उद्देशाने अपमान करणे तसेच बेकायदेशीर शस्त्र बाळगणे अशा विविध स्वरूपांच्या गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.



त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी यापूर्वी विविध कायदेशीर तरतुदींनुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र, या कारवाईचा अपेक्षित परिणाम झाला नसल्याने पोलिसांनी त्याच्याविरुद्ध कठोर पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांच्याकडे सादर केला.

प्रस्तावाची छानननी, संबंधित कायदेशीर बाबींची पडताळणी आणि उपलब्ध माहितीच्या आधारे अजमत शहा हा सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी धोकादायक असल्याची खात्री झाल्यानंतर जिल्हादंडाधिकाऱ्यांनी त्याला एक वर्षासाठी स्थानबद्ध ठेवण्याचे आदेश दिले. या आदेशानुसार पोलिसांनी त्याचा शोध घेऊन आदेशाची अंमलबजावणी केली आणि १० ऑक्टोबर रोजी त्याची जिल्हा कारागृहात रवानगी केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक माजीद पठाण, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर सैरिसे, पोलीस कॉन्स्टेबल उदय शुक्ला तसेच अकोट फाईल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेख रहीम, पोलीस अंमलदार प्रशांत इंगळे, हर्षल श्रीवास, इमान शाह आणि अब्दुल अमीर यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

### सराईत गुन्हेगारांवर कठोर कारवाईचा इशारा

आगामी उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून शांतता कायम ठेवण्यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर दिला आहे. कारवाईला न जुमानता गुन्हेगारी कृत्ये करणाऱ्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध एमपीडीए आणि अन्य लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिला आहे.

# दंड भरू, पण सुधारणार नाही : वाहनचालकांची मुजोरी कायम

**२२७ चलनांतून ३ लाखांचा दंड; तरीही वाहतूक नियमांना केराची टोपली, हिंगणघाटात जीवन सुरक्षा अभियानाची धडक कारवाई**

**हिंगणघाट/जनमाध्यम**

दंड भरू, पण नियम पाळणार नाही, अशीच काही वाहनचालकांची मानसिकता तयार झाली आहे का, असा प्रश्न हिंगणघाटातील वाहतूक कारवाईनंतर उपस्थित होत आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांनी एकाच दिवशी २२७ चलन कारवाया करून ३ लाख ५ हजार ४०० रुपयांचा दंड ठोठावला. मात्र, दंडाच्या आकड्यापलीकडे जाऊन वाहनचालकांच्या मानसिकतेत बदल घडणार का, हा खरा प्रश्न आहे. कारण वाहतूक नियम हे केवळ दंड टाळण्यासाठी नसून स्वतःचा आणि इतरांचा जीव वाचवण्यासाठी आहेत.

वर्धा जिल्ह्यात अपघात रोखण्यासाठी आणि वाहतूक शिस्त निर्माण करण्यासाठी पोलिसांकडून जीवन सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी ९ ऑक्टोबर रोजी हिंगणघाट शहरात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने चारचाकी दुचाकी वाहने उभी करणारे, विनापरवाना वाहन चालविणारे, अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देणारे, बिना बेल्ट सीटने प्रवास करणारे, कर्णकर्कश सायलेन्सर वापरणारे आणि फॅन्सी नंबर प्लेट असणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.

उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, हिंगणघाटचे पोलीस निरीक्षक अनिल राऊत, वाहतूक नियंत्रण शाखेचे प्रभारी अधिकारी विजयकुमार घुले आणि पोलीस अधिकारी व अंमलदार या कारवाईत सहभागी झाले होते.



**दंडाचा आकडा मोठा, पण शिस्तीचे काय**

वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यानंतर चलन भरून मोकळे होण्याची प्रवृत्ती कायम राहिली, तर दंडात्मक कारवाईचा अपेक्षित परिणाम साधला जाणार कसा, असा प्रश्न उपस्थित होतो. रस्त्यावर चुकीच्या ठिकाणी वाहन उभे करणे, वाहतुकीला अडथळा निर्माण करणे, विनापरवाना वाहन चालविणे आणि दुचाकीवर तिघांनी प्रवास करणे या बाबी केवळ नियमभंगापुरत्या मर्यादित नाहीत. त्यातून गंभीर अपघातांना निमंत्रण मिळू शकते.

विशेषतः अल्पवयीन मुलांच्या हातात दुचाकी देणाऱ्या पालकांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. मुलांच्या हट्टापुढे झुकून त्यांना वाहन चालविण्यास देणे म्हणजे त्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड करण्यासारखे आहे. एखादा अपघात घडल्यानंतर पश्चात्ताप करून उपयोग नसतो. एका क्षणाची बेफिकिरी संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकते.

**हेल्मेट आणि सीटबेल्ट केवळ पोलिसांसाठी नाहीत**

महामार्गावर दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे, चारचाकीमध्ये सीटबेल्ट लावणे, निर्धारित ठिकाणीच पार्किंग करणे आणि वाहन चालविताना परवाना जवळ बाळगणे, या साध्या गोष्टींचे पालन प्रत्येकाने करणे आवश्यक आहे. मात्र, काही वाहनचालक नियमांची अंमलबजावणी पोलिसांच्या उपस्थितीपुरतीच मर्यादित ठेवतात. पोलिस दिसले की नियम पाळायचे आणि पुढे गेल्यानंतर पुन्हा मनमानी करायची, ही प्रवृत्ती बदलणे गरजेचे आहे.

**दंडापेक्षा जीवाची किंमत मोठी**

जीवन सुरक्षा अभियानाचा उद्देश केवळ दंड वसूल करणे नसून वाहनचालकांमध्ये शिस्त निर्माण करणे आणि नागरिकांचे प्राण वाचविणे हा आहे, असे वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले आहे. ही मोहीम संपूर्ण जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. मात्र, कारवाईच्या आकड्यांबरोबरच नियमभंगाचे प्रमाण कमी होत आहे का, अपघातांना आळा बसत आहे का आणि अल्पवयीन मुलांकडून होणारा वाहनवापर रोखला जात आहे का, याचाही आढावा घेणे आवश्यक आहे. दंडाची पावती खिशातून पैसे काढेल; पण वाहतुकीतील बेफिकिरी जीवावर बेतू शकते. त्यामुळे प्रश्न दंड किती भरला याचा नाही, तर नियम पाळून किती जीव वाचवले याचा आहे.




## कर्करोगाच्या आजाराला कंटाळून धाम नदीत उडी

**वर्धा -** कर्करोगाच्या आजाराला कंटाळून नदीत उडी घेतल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना सेवाग्राम पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, योगेश लाकडे वय ४४ वर्षे, रा. पवनार परिसर हे घरी न आल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. यावेळी धाम नदीकाठी किल्ल्याच्या मागील बाजूस पाण्यात मृतदेह तरंगताना दिसला. नागरिकांच्या मदतीने मृतदेह नदीबाहेर काढण्यात आला. मृत व्यक्ती कर्करोगाच्या आजाराने त्रस्त असल्याने त्यांनी नदीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची माहिती तक्रारीत नमूद आहे. घटनेची नोंद करून सेवाग्राम पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

## शेतात काम करताना शेतकऱ्याचा मृत्यू

**आष्टी -** तालुक्यातील साहूर येथे स्वतःच्या शेतात काम करीत असताना अचानक चक्कर आल्याने एका वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू झाला. सूर्यभानजी नेवारे वय ६० वर्षे, रा. साहूर, ता. आष्टी, जि. वर्धा असे मृतकाचे नाव असल्याचे पोलिसांच्या नोंदीत नमूद आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेतात काम करीत असताना सूर्यभानजी यांना अचानक चक्कर आली. त्यानंतर नातेवाइकांनी त्यांना उपचारासाठी अमरावती येथील रुग्णालयात दाखल केले. घटनास्थळ आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने संबंधित कागदपत्रे आष्टी पोलिसांकडे पाठविण्यात आली. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून चौकशी सुरू केली आहे.

## शेतकऱ्याला टिकासाने मारहाण

**वर्धा -** सावंगी मेघे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पडेगाव येथे विहिरीतील पाणी वापरण्यावरून झालेल्या वादात एका शेतकऱ्याला मारहाण करून जखमी करण्यात आल्याची घटना ९ ऑक्टोबर रोजी घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय अशोक रामटेककर वय २४ वर्षे रा. पडेगाव हा शेतात काम करीत होता. यावेळी त्याने आरोपीला विहिरीवर मोटार लावून पाणी वापरण्यास सांगितले. मात्र, ही विहीर आपल्या शेतातील असून दुसऱ्याला मोटार वापरू देणार नाही, असे म्हणत आरोपीने वाद घातला. त्यानंतर शिवीगाळ करीत टिकासासारख्या अवजाराने अक्षयच्या उजव्या हातावर वार करून त्याला जखमी केले. या प्रकरणी जखमीच्या तोंडी तक्रारीवरून आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे सावंगी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१) आणि ३५२ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नसून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## मद्यधुंद अवस्थेत गोंधळ घालून शासकीय कामात अडथळा

**हिंगणघाट -** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात मद्यधुंद अवस्थेत गोंधळ घालून वाहतूक पोलिसांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ९ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जीवन सुरक्षा अभियानांतर्गत वाहतूक नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस पथक चौकात तैनात होते.

# रामविलास पासवान यांच्या स्मृतींना अभिवादन

**लोक जनशक्ती पार्टीतर्फे सहाव्या पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली कार्यक्रम**

**हिंगणघाट/जनमाध्यम**

लोक जनशक्ती पार्टीचे संस्थापक आणि माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय रामविलास पासवान यांच्या सहाव्या पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कन्हैयालाल टिकमदास हेमनानी यांच्या निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून भावपूर्ण अभिवादन केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष डॉ. आनंद जगताप होते. प्रदेश सचिव केशव तितरे यांनी संचालन केले. कन्हैयालाल हेमनानी यांनी प्रास्ताविक केले, तर तुळशीराम सातघरे यांनी आभार मानले. यावेळी रामविलास पासवान यांनी सामाजिक न्याय, गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी केलेल्या कार्याचे स्मरण करण्यात आले. त्यांचे विचार आणि जनसेवेचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला जिल्हा सचिव नोबल जयराज, अमोल चिलबिलवार, गोपालबाबू हेमनानी, प्रगतबाबू तितरे, मोरेश्वर पिंपळशेंडे, हरसुख पटेल, राजेंद्र मुनोत, सुरेंद्र डोंगरे, रमेश घोडे, गिरजा शंभरकर, कमलाकर कावळे, चंपत बावणे, गोविंद दांडेकर, मनोहर कानेरकर, ॲड. कल्याणी आष्टिकर, महिला तालुकाध्यक्ष जयश्री सुधाकर चावरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अखेरीस जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# हिरवी वसुंधरा, सुरक्षित भविष्य; १५०० विद्यार्थ्यांची पर्यावरण दिंडी



**वर्धा/जनमाध्यम**

निसर्गाचा ऱ्हास म्हणजे मानवाच्या अस्तित्वावरच घाव. हा भावनिक संदेश देत इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या १५०० विद्यार्थ्यांनी वर्धा शहरात भव्य वृक्षदिंडी काढली. हिरवे पोशाख, ढोल-ताशांचा गजर, लेझीम आणि भजनांच्या माध्यमातून पर्यावरण व वन्यजीव संरक्षणाचा जागर करण्यात आला. या उपक्रमाने वर्धेकरांचे लक्ष वेधून घेतले.

महिला विकास संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. धीरज भोयर, सचिव डॉ. अभिजित वेरूळकर, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वनाधिकारी सुहास बढेकर, वैशाली भलावी, आशिष गोस्वामी, मुरलीधर बेलखोडे आणि प्राचार्य आशिष ससनकर यांच्यासह मान्यवरांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा प्रारंभ केला.

पर्यावरणाचे रक्षण केले नाही, तर भविष्यातील पिढ्यांना कृत्रिम प्राणवायूवर जगण्याची वेळ येऊ शकते, असा इशारा ॲड. धीरज भोयर यांनी दिला. निसर्ग हा ईश्वराचा जिवंत आविष्कार असून वन्यजीवांच्या अधिवासाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे डॉ. अभिजित वेरूळकर यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन प्राचार्य आशिष ससनकर यांनी केले. महाविद्यालयातून निघालेली रॅली आर्वी नाका, केळकरवाडी चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा महाविद्यालयात पोहोचली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला.

# बनावट ई-चलानचा मेसेज येताच सावधान

**वर्धा/जनमाध्यम**

वाहतूक नियमभंगाच्या दंडाचा बनावट ई-चलान पाठवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार समोर येत आहेत. एसएमएस, व्हॉट्सॲप आणि ईमेलद्वारे पाठविलेल्या संशयास्पद लिंकवर क्लिक करून किंवा APK फाईल इन्स्टॉल करून नागरिक सायबर चोरांच्या जाळ्यात अडकत आहेत. या माध्यमातून बँक खात्याची गोपनीय माहिती चोरून खात्यातील रक्कम लंपास केली जाऊ शकते. या पार्श्वभूमीवर वर्धा पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.




सायबर गुन्हेगारांकडून वाहनधारकांना लक्ष्य केले जात आहे. वाहन वेगाने चालविणे, हेल्मेट न घालणे किंवा सिग्नल तोडल्याचा आरोप करीत दंड भरण्यासाठी संदेश पाठविला जातो. या संदेशासोबत बनावट लिंक, क्यूआर कोड किंवा ॅइख फाईल दिली जाते. दंड भरण्याच्या घाईत नागरिक संबंधित लिंकवर क्लिक करतात किंवा अज्ञात ॲप मोबाईलमध्ये इन्स्टॉल करतात. त्यानंतर मोबाईलमधील गोपनीय माहिती चोरली जाण्याचा धोका असतो. बँक तपशील, ओटीपी आणि यूपीआय पिनच्या माध्यमातून सायबर चोरांकडून आर्थिक फसवणूक केली जाऊ शकते

**अधिकृत संकेतस्थळावरच करा पडताळणी**

वाहतुकीच्या दंडाबाबत आलेल्या कोणत्याही संदेशाची खात्री अधिकृत शासकीय संकेतस्थळावरून किंवा अधिकृत ॲपवरूनच करावी. अनोळखी क्रमांकावरून आलेली APK फाईल डाउनलोड किंवा इन्स्टॉल करू नये.

शासकीय विभाग दंड भरण्यासाठी थेट APKफाईल पाठवत नाहीत. कोणत्याही व्यक्तीला फोन किंवा संदेशाद्वारे ओटीपी, यूपीआय पिन, पासवर्ड अथवा बँकेची गोपनीय माहिती देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**फसवणूक झाल्यास १९३० वर संपर्क साधा**

सायबर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच विलंब न करता राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधावा. तसेच म्र्बेम्ग्स,दन.ग्ह या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी. संबंधित बँकेशी तातडीने संपर्क साधून खाते किंवा कार्ड सुरक्षित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. फसवणुकीशी संबंधित संदेश, स्क्रीनशॉट आणि बँक व्यवहारांचे तपशील जतन करून जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा सायबर पोलीस ठाण्यात तक्रार द्यावी.

बनावट ई-चलानच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे.

कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक न करता अधिकृत स्रोतांवरूनच माहितीची पडताळणी करावी, असे आवाहन वर्धा जिल्हा पोलीस प्रशासनाने केले आहे.

## रोहित्र बिघाडाची तक्रार एका क्लिकवर

**वर्धा/जनमाध्यम**

दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांच्या वीजविषयक तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी महावितरणने विशेष व्यवस्था केली आहे.

रोहित्र बिघाडासह तातडीच्या वीज समस्यांसाठी ७८७५७६१००० हा हेल्पलाईन क्रमांक २४ तास उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच मोबाईल ॲपवरूनही नादुरुस्त रोहित्राची तक्रार नोंदविता येणार आहे.

रोहित्र बंद पडल्याने शेतीचा वीजपुरवठा खंडित होतो. त्यामुळे बिघाडाची माहिती तातडीने मिळावी यासाठी महावितरणने समन्वय यंत्रणा कार्यान्वित केली आहे. हेल्पलाईनवर आलेल्या तक्रारी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. याशिवाय १८००२१२३४३५, १८००२३३३४३५, १९१२ आणि १९१२० या क्रमांकांवर संपर्क साधता येईल.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ३१४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# आष्टी वनपरिक्षेत्रात वन्यजीव सप्ताहाचा उत्साहात समारोप



**मॅरेथॉन, सायकल रॅली, चित्रकला आणि निबंध स्पर्धांतून वन्यजीव संरक्षणाचा संदेश**

**आष्टी/जनमाध्यम**

वन्यजीवांचे संरक्षण, नैसर्गिक अधिवासांचे संवर्धन आणि मानव-वन्यजीव सहजीवनाचा संदेश देत आष्टी वनपरिक्षेत्रात राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहाचा उत्साहात समारोप करण्यात आला.

महाराष्ट्र वन विभागाच्या वतीने २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान आयोजित या सप्ताहात विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. वन्यजीवांचे अस्तित्व टिकविण्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

यंदाच्या वन्यजीव सप्ताहाची मुख्य संकल्पना अधिवासांना जोडणे आणि वन्यजीवांना समृद्ध करणे ही होती. या संकल्पनेच्या अनुषंगाने आष्टी परिसरात वन्यजीव संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मानवी वस्ती आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी करून सहजीवनाची भावना दृढ करण्यावर या उपक्रमांत भर देण्यात आला.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टीच्या वनपरिक्षेत्र अधिकारी पूनम ब्राह्मणे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सहायक वनसंरक्षक वाघ उपस्थित होते. यावेळी निसर्गप्रेमी प्रीतम गायकी, ठाकरे, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध वन समित्यांचे अध्यक्ष, वनरक्षक आणि आरआरटी पथकातील सदस्यांची उपस्थिती होती.

वन्यजीव सप्ताहादरम्यान आष्टी वनपरिक्षेत्रात मॅरेथॉन स्पर्धा, सायकल रॅली, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध स्पर्धा तसेच श्रमदानातून विविध उपक्रम राबविण्यात आले.

या माध्यमातून विद्यार्थ्यांसह नागरिकांना वन्यजीव संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक अधिवासांचे महत्त्व पटवून देण्यात आले.

सर्पमित्रांच्या वतीने सापांविषयी समाजात असलेले गैरसमज दूर करण्यासाठी विशेष प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. सापांच्या विविध प्रजाती, त्यांचे पर्यावरणातील महत्त्व आणि सर्पदंश झाल्यास घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वन्यजीवांविषयी भीती आणि गैरसमज दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून त्यांच्याकडे पाहण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

वन्यजीव संरक्षण ही केवळ वन विभागाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा त्यात सहभाग महत्त्वाचा आहे. जंगल आणि वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास सुरक्षित राहिल्यास पर्यावरणाचा समतोल टिकून राहण्यास मदत होईल, हा संदेश या सप्ताहाच्या माध्यमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे आभार साखरकर यांनी केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### गणित ज्ञान-विज्ञान परीक्षेत आराध्या अंबाडकर प्रथम

**अंजनगाव बारी-** अमरावती जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या वतीने आयोजित गणित ज्ञान-विज्ञान परीक्षेत जनता विद्यालय, अंजनगाव बारी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत मानाचा तुरा रोवला गेला आहे.या परीक्षेत इयत्ता नववी 'अ' मधील आराध्या सतीश अंबाडकर हिने शाळास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. तसेच इयत्ता सहावी 'ब' मधील ऋषिकेश प्रमोद तलमले यानेही शाळास्तरावर प्रथम क्रमांक मिळविण्यासोबतच तालुकास्तरावर तृतीय क्रमांक पटकावून विद्यालयाचा गौरव वाढविला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य गजेंद्र अवघड, पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर आणि गणित शिक्षिका अश्विनी ढोले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अमरावती येथे गटशिक्षणाधिकारी व संबंधित पदाधिकाऱ्यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रगतीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

### अवैध दारुची वाहतूक करणाऱ्यास अटक

**खल्लार-** महिमापूर ते वाकी रोड दरम्यान दुचाकीवरुन अवैध देशी दारुची वाहतूक करणाऱ्या २८ वर्षीय युवकास खल्लार पोलिसांनी आज (९) सायंकाळी पाच ते सहा वाजताच्या सुमारास पकडले असून त्याच्या जवळून ६२ हजार रुपयाचा मुद्देमाल ताब्यात घेऊन जप्त केला आहे.सांगवा बु येथिल सुरज वासुदेव वरठे (२८) हा महिमापूर रोडने दुचाकीवरुन अवैध देशी दारुची वाहतूक करीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली.त्याआधारे पोलिसांनी महिमापूर वाकी रोडदरम्यान दुचाकी थांबवून आरोपीकडून १८० मिलीच्या ९० पावट्या, ९० मिलीच्या ६० पावट्या अशी १२ हजार रुपयाची अवैध देशी दारु व ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी ताब्यात घेऊन जप्त केली.आरोपी सुरज वरठे विरुध्द खल्लार ठाण्यात मुदाका ६५(ई) नुसार गुन्हा दाखल केला. ही कारवाई ठाणेदार अमोल मुडे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम ठाणेदार सुनिल पवार, पोहेकॉ वेंकेश नाकील, अक्षय केतकर यांनी केली.



### शिराळा व मेळघाटातील आरोग्य केंद्रांना १२ रुग्णवाहिका

**शिराळा-** जिल्हा परिषद आरोग्य विभागाला प्राप्त झालेल्या नवीन १२ रुग्णवाहिकांची प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडुन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यात आले.यानंतर या सर्व रुग्णवाहिका मेळघाटातील ११ व गैर आदिवाशी भागातील एका प्राथमिक आरोग्य केंद्राला १ ऑक्टोबर रोजी सकाळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.प्रविण पारीसे यांच्या उपस्थितीत रवाना करण्यात आल्या आहेत. जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत जे.एम.पोर्टलव्दारे या फोर्स टॅव्हलर ॲबुलन्स खरेदी करून केल्या आहेत.तत्पुर्वी सीईओकडे समीर जवंजाळ यांनी तक्रार नोंदविल्यानंतर सीईओनी तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.मेळघातील ११ आणि अमरावती तालुक्यातील १ अशा बारा प्राथमिक आरोग्य केंद्रांना उपलब्ध करून दिल्या आहेत. मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, सलोना,टेब्रुरसोडा,काटकुंभ,सेमाढोह,तर धारणी तालुक्यातील बैरागढ,हरिसाल,साद्राबाडी ,धुळघाट रेल्वे,आदींसह अमरावती तालुक्यातील शिराळा आरोग्य केंद्रांना रुग्नसेवेसाठी उपलब्ध केल्याचे डीएचओ प्रविण पारीसे यांनी सांगितले.

### घराचा दरवाजा तोडून चोरट्याचा डल्ला

**अंजनगाव बारी-** येथील महादेवपुरा परिसरात घरफोडीची घटना उघडकीस आली असून, अज्ञात चोरट्याने वृद्ध महिलेच्या घरातून ४० हजार रुपयांची रोकड लंपास केली. मंदा मारोतराव घिये (वय ६४) यांच्या घरी कोणी नसल्याची संधी साधून चोरट्याने मुख्य दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर स्वयंपाकघरात ठेवलेली रोख रक्कम चोरून नेली. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते १० वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. याप्रकरणी बडनेरा पोलिसांनी ८ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केला असून, अज्ञात चोरट्याचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

# शैक्षणिक शुल्कासाठी विद्यार्थ्यांचा अपमान करू नका; अन्यथा गाठ शिवसेनेशी!

## दुष्काळसदृश परिस्थितीत पालकांना दिलासा देण्याची मागणी




**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी, दर्यापूर तालुक्यातील शहर आणि ग्रामीण भागातील शाळा, कॉन्व्हेंट व शैक्षणिक संस्थांकडून शैक्षणिक फी भरण्यासाठी विद्यार्थ्यांवर दबाव आणला जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आणि मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली असताना फी थकीत असल्याच्या कारणावरून विद्यार्थ्यांना मानसिक त्रास देणे, त्यांचा सर्वांसमोर अपमान करणे आणि परीक्षेला बसू न देण्याच्या धमक्या देणे तात्काळ थांबवावे, असा इशारा शिवसेनेचे अमरावती जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांनी शाळा व संस्थाचालकांना दिला आहे.

दर्यापूर, अंजनगाव सुर्जी येथील शिवसेना कार्यालयात पालकांनी यासंदर्भात तक्रारी केल्याचे सांगण्यात आले. काही शाळांमध्ये फी थकीत असल्यामुळे विद्यार्थ्यांची नावे व्हॉट्सॲप ग्रुपवर जाहीर करणे, वर्गात उभे करून अपमानित करणे, ओळखपत्र न देणे तसेच फी भरली नाही तर परीक्षेला बसू देणार नाही, अशा प्रकारच्या धमक्या दिल्या जात असल्याच्या तक्रारी पालकांनी केल्या आहेत. या प्रकारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून पालकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे.यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे शेती व्यवसाय अडचणीत आला असून शेतकरी आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या कुटुंबांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक कुटुंबांना दैनंदिन गरजा भागवतानाही अडचणी येत आहेत. अशा परिस्थितीत शैक्षणिक फी वेळेत भरणे शक्य होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना त्रास देण्याऐवजी शाळा व्यवस्थापनांनी सहकार्याची भूमिका घ्यावी. फी थकीत असल्याच्या कारणावरून कोणत्याही विद्यार्थ्याला अपमानास्पद वागणूक देऊ नये, मानसिक त्रास देऊ नये किंवा त्याच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा निर्माण करू नये, अशी मागणी शिवसेनेने केली आहे.

या प्रश्नाची गंभीर दखल घेत शिवसेनेच्या वतीने दर्यापूर व अंजनगाव सुर्जी येथील तहसीलदारांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. संबंधित शाळा, कॉन्व्हेंट आणि शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनांना विद्यार्थ्यांवर फी भरण्यासाठी अवाजवी दबाव आणू नये, विद्यार्थ्यांना अपमानित करू नये आणि त्यांच्या शैक्षणिक हिताला बाधा पोहोचेल असे प्रकार टाळावेत, यासाठी आवश्यक निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनीही या प्रकरणात लक्ष घालून पालकांच्या तक्रारींची चौकशी करावी आणि संबंधित प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी गोपाल पाटील अरबट यांनी केली आहे.

यासाठी शिवसेना सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रश्नासंदर्भातील पाठपुराव्यात प्रहारचे शंभू मालठाणे, माजी तालुकाप्रमुख महिंद्र भांडे, तालुकाप्रमुख नितीन चौखंडे, सुधाकरराव खारोडे, शहरप्रमुख तुषार चौधरी, मुन्ना इसोकार, राहुल भुंबर, सुधाकर फुलंबरकर, सतीश नागे, दिनेश पांडे, सागर गेठे, गणेश गावंडे, विनय गावंडे, अतुल सगणे, नीरज नागे, डी.के. दादा, सोनू रायकर आणि गोपाल तराळ यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सहभाग असल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांचे शिक्षण, सन्मान आणि भविष्य यांना प्राधान्य देऊन शाळा व्यवस्थापनांनी संवेदनशील भूमिका घ्यावी आणि प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात बोलीभाषा साहित्य संमेलन

**अमरावती/का.प्र.**

श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती द्वारा संचालित डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अमरावती येथे अभिजात भाषा सप्ताह निमित्त बोलीभाषा साहित्य संमेलन झाले. या संमेलनात मराठी, पाली, कोरकू, बंजारा, गोंडी, पारधी, भील, इत्यादी भाषेमध्ये विद्यार्थ्यांनी आपले गीत, कविता, कथा सादर केले. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य तथा संस्थेचे सचिव डॉ कमलाकर पायस हे होते.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. शुद्धोधन कांबळे उपस्थित होते, त्यांनी विद्यार्थ्यांना 'मराठी भाषेचा अभिजात प्रवास' या विषयावर मार्गदर्शन केले.विदर्भात बोलल्या जाणाऱ्या आदिवासी बोलीभाषांची लिपी तयार करण्यात यावी. हे सर्व प्रस्ताव भारी झाल्यानंतर राष्ट्रगीताने साहित्य संमेलनाची सांगता करण्यात आली.या कार्यक्रमाचे आयोजन मराठी आणि पाली विभागातर्फे करण्यात आले होते तसेच या कार्यक्रमासाठी प्रा. पी.आर.एस. राव, डॉ. श्याम तंत्रपाळे, डॉ. सुनील कुमार, डॉ. शुध्दोधन कांबळे,डॉ. प्रदीप अंबोरे, डॉ. प्रकाश म्हस्के, डॉ. राजेश देशमुख, डॉ. प्रशांत खेडकर, प्रा. जी.एच. पांडे, डॉ. एस. बी. सांगोले, डॉ. दीपाली पडोळे, प्रा. प्रकाश बोरकर, प्रा. अनिल धोटे, प्रा. प्रवीण विधाते, प्रा. शंकर लाहोटी, प्रा. डोईफोडे, प्रा. हर्षवर्धन देशमुख, डॉ. ज्ञानेश्वर भगत, डॉ. अनिल पाचकुडके, प्रा. मयुरी तट्टे, प्रा. सुभाष मुंडे, प्रा. नवलकर, प्रा. रुद्रा चोपकर, प्रा. ज्योती टाले, प्रा. मेघा चिमणकर,डॉ. स्वप्नील मानकर,विजय इंगळे, राजेश नाखले, किशोर बिजवे, प्रफुल धार्मिक, सुशांत युनाते, भाग्यश्री वानखडे, सागर शिरसाट, सह समस्त विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## शेतातील शत्रू आणि जंगलातील मित्रांचा शोध
# राजर्षी शाहू कॉलेजच्या विद्यार्थ्यांची मोहीम

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

येथील राजर्षी शाहू सायन्स कॉलेज येथील वनस्पतीशास्त्र विभागाच्यावतीने तसेच मायकॉलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया चेन्नई , मायकॉलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया, अमरावती चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक बुरशी दिनाचे औचित्य साधून 'शेतातील शत्रू आणि जंगलातील मित्र ओळख' (Myco-Patho Field Expedition - २०२६) या विषयावर एक दिवसीय भव्य क्षेत्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पराग आर.वडनेरकर आणि आय.क्यू.ए.सी समन्वयक प्रा.एस.ए. वाणी यांच्या मौल्यवान मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.



तसेच मायकॉलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया, अमरावती चॅप्टर चे अध्यक्ष प्राचार्य डॉ.दिलीप हांडे,अमरावती चॅप्टर चे कोषाध्यक्ष प्रा.डॉ गणेश हेडाऊ यांच्या प्रेरणा आणि सततच्या पाठिंब्यामुळेच विद्यार्थ्यांना निसर्गाशी जोडणारा हा नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.या कार्यशाळेचे संपूर्ण नियोजन, संकल्पना आणि प्रत्यक्ष मार्गदर्शन प्रा डॉ. संपदा पी.पाथरकर,सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग (बीज रोग तज्ञ) यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना बुरशीचे दुहेरी रूप समजावून सांगितले.एक म्हणजे पिकांचे नुकसान करणारा शत्रू (Foes in Crops) आणि दुसरे म्हणजे जंगलाच्या पोषण चक्रात मदत करणारा मित्र (Friends in Forest).कार्यशाळेची वैशिष्ट्ये :महाविद्यालय परिसर, लगतच्या आणि तुळजापूर पर्यंतच्या शेतात झालेल्या या क्षेत्र भेटीत बी.एस्सी.प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यामध्ये प्रामुख्याने टोमॅटो वरील अर्ली ब्लाईट, सोयाबीन वरील तांबेरा (Rust), भेंडी वरील भुरी रोग (Powdery Mildew), कापूसावरील ठिपके रोग व बोंड सड, संत्रा वरील कॅंकर, मोगरा वरील पानांचा कुरडा रोग, ब्राह्मी व तणांवरील सरकोस्पोरा ठिपके रोग यांचा समावेश होता. तसेच कुजलेल्या लाकडावर वाढणारे Schizophyllum, Pleurotu सारखे मित्र मशरूम सुद्धा गोळा करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. वडनेरकर म्हणाले की, 'अशा प्रकारच्या क्षेत्रीय कार्यशाळा विद्यार्थ्यांना शेती आणि निसर्गाशी जोडतात, जे नवीन शैक्षणिक धोरण २०२० चे मुख्य उद्दिष्ट आहे.' प्राचार्य डॉ दिलीप हांडे व प्रा डॉ हेडाऊनी सुद्धा विभागाचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीस आणि विद्यार्थ्यांची कवक, बुरशी या विषयाकडे रुची वाढण्यास मदत होते असे सांगितले.या कार्यक्रमासाठी वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मिनल जे. केचे, डॉ. प्रविण आर. सरदार तसेच विभागातील लॅब असिस्टंट भारत उईके यांनी विशेष परिश्रम घेतले.शेवटी कार्यशाळेच्या आयोजिका डॉ. संपदा पाथरकर यांनी सर्वांचे आभार मानले.

### भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा सत्कार

**परतवाडा-** भारतीय विद्या मंदिर, अमरावती द्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे माजी विद्यार्थी संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला माजी विद्यार्थी गुणगौरव सोहळा व स्नेहमेळावा उत्साहपूर्ण आणि आपुलकीच्या वातावरणात झाला.



कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल एस. खांडेकर होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रफुल कडू यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी माजी विद्यार्थी हे महाविद्यालयाचे खरे राजदूत असल्याचे सांगत, शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाशी असलेले नाते कायम ठेवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.जुन्या मित्र-मैत्रिणींच्या भेटीमुळे महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा मिळाला.यावेळी ॲड.भोला चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करताना, महाविद्यालय हे केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारे संस्कारकेंद्र असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रुपेश महल्ले आणि रितेश सूर्यवंशी यांनी विशेष सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन सुरळीतपणे पार पडले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.बबलू मासोदकर यांनी प्रभावीपणे केले. त्यांनी कार्यक्रमातील विविध टप्प्यांची सांगड घालत उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. जीवन सोळंके यांनी आभार केले. त्यांनी उपस्थित सर्व मान्यवर,माजी विद्यार्थी, आयोजक, प्राध्यापकवर्ग तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.या प्रसंगी माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते.'महाविद्यालयातून मिळालेले शिक्षण आणि संस्कार हे आयुष्यभराची शिदोरी असतात; त्यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही महाविद्यालयाशी जोडलेले राहणे हीच माजी विद्यार्थ्यांची खरी ओळख आहे,' या भावनेतून पार पडलेला हा स्नेहमेळावा उपस्थितांच्या मनात कायमस्वरूपी आठवणी निर्माण करून गेला.

### विद्यापीठाच्या हिवाळी - २०२६ च्या काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल

**अमरावती-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ च्या लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत, परंतु काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आले आहेत. यामध्ये बी.ए. सेमि.-१ (एन.ई.पी.), ॲडव्हान्स डिप्लोमा इन कौन्सिलिंग ॲन्ड सायकोथेरेपी सेमि.-३ व सेमि.-४ (एन.ई.पी.), एम.एस्सी. (मायक्रोबॉयलॉजी) सेमि.-२ (एन.ई.पी.) आणि बी.टेक. (कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी (सेमि.-३ व ४) या परीक्षांचा समावेश आहे. यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना याची जाणीव करुन द्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी सुध्दा याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

## उल्लास-नव भारत साक्षरता' अभियानाला मिळणार लोकसहभागाची जोड
## जिल्ह्यात 'साक्षरता दूत' नियुक्त करण्याचे निर्देश

**अमरावती/का.प्र.**

केंद्र पुरस्कृत 'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम' प्रभावीपणे राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालनालयाने जिल्हास्तरावर विविध घटकांतील व्यक्तींची 'साक्षरता दूत' म्हणून नियुक्ती करण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये निवृत्त शिक्षक,माजी सैनिक,अंगणवाडी सेविका,आशा कार्यकर्त्या तसेच महिला बचत गटातील सदस्यांचा समावेश करण्याची सूचना करण्यात आली आहे.

शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी २३ जुलै २०२६ रोजी पत्र जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच 'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम'च्या जिल्हा कार्यकारी समितीच्या अध्यक्षांना पाठविले आहे.

केंद्र शासनाच्या 'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रमांतर्गत १५ वर्षे व त्यापुढील वयाच्या निरक्षर व्यक्तींना साक्षर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्यात या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व्यापक लोकसहभाग आवश्यक असल्याचे शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे.या उपक्रमासाठी समाजात विश्वासार्हता आणि सेवाभावी वृत्ती असलेल्या व्यक्तींचा सहभाग घेण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

'साक्षरता दूत'च्या माध्यमातून निरक्षर व्यक्तींचा शोध घेणे, त्यांची नोंदणी करणे तसेच त्यांना स्वयंसेवकांसोबत जोडणे, साक्षरता वर्गांचे आयोजन करणे आणि साक्षरतेसाठी आवश्यक शैक्षणिक व इतर उपक्रम राबविण्यास मदत करणे अपेक्षित आहे. तसेच कार्यक्रमाच्या प्रचार-प्रसारातही या दूतांची भूमिका महत्त्वाची राहणार आहे.या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित गटविकास अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी,आरोग्य अधिकारी, ग्रामपंचायत तसेच अन्य संबंधित विभागांना आवश्यक सूचना देऊन पात्र व्यक्तींची 'साक्षरता दूत' म्हणून नियुक्ती करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रमाचा उद्देश साध्य करण्यासाठी विविध शासकीय यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम करावे, तसेच लोकसहभाग वाढवून निरक्षर प्रौढांना साक्षर करण्याच्या मोहिमेला गती द्यावी, असे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे.या निर्णयामुळे जिल्ह्यातील अनुभवी निवृत्त शिक्षकांसह विविध सामाजिक घटकांना साक्षरता अभियानात सक्रिय योगदान देण्याची संधी मिळणार असून, 'साक्षर भारत' घडविण्याच्या प्रयत्नांना लोकसहभागाची भक्कम साथ मिळण्याची अपेक्षा आहे.

### बीबीएनजीच्या ग्लोबल व्हर्च्युअल चॅप्टरची ऐतिहासिक सुरुवात

**अमरावती/का.प्र.**

बीबीएनजी (बिझनेस बिझनेस नेटवर्किंग ग्रुप)च्या ग्लोबल व्हर्च्युअल चॅप्टरची ऐतिहासिक सुरुवात रविवार, ११ ऑक्टोबर रोजी भारतीय वेळेनुसार पहाटे ४.३० वाजता ब्रह्ममुहूर्तावर होणार आहे. बीबीएनजीचे भारतातील विविध शहरांमध्ये ३५ चॅप्टर्स यशस्वीपणे कार्यरत असून, आता संस्थेने आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्ताराचे महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.




या ग्लोबल व्हर्च्युअल चॅप्टरमध्ये अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या चार देशांचा समावेश करण्यात आला आहे. भारतीय उद्योजकांना परदेशातील व्यवसायाच्या नव्या बाजारपेठा उपलब्ध करून देणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर नेटवर्किंगची सुविधा निर्माण करणे,व्यावसायिक संदर्भ मिळवून देणे तसेच त्यांच्या व्यवसायाच्या विस्ताराला चालना देणे हा या ग्लोबल चॅप्टरचा प्रमुख उद्देश आहे. ग्लोबल व्हर्च्युअल चॅप्टरचे अधिकृत उद्घाटन बीबीएनजी संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी बीबीएनजीचे उपाध्यक्ष मुकुंदराव कुलकर्णी, जनरल सेक्रेटरी व डायरेक्टर अरविंद कोऱ्हाळकर, असोसिएट डायरेक्टर महेश देशपांडे, अभिजीत चांदे आणि संजय लोंढे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व्हर्च्युअल मीटिंगमध्ये सहभागी होणार आहेत.बीबीएनजी ग्लोबल व्हर्च्युअल चॅप्टरच्या यशस्वी प्रारंभासाठी इनिशिएटिव्ह हेड नितीन बेळे, अमेरिकेतील को-ऑर्डिनेटर अविनाश निचकवडे, तसेच अमित मानवी, अपर्णा कंठे आणि श्रद्धा कुलकर्णी विशेष प्रयत्न करीत आहेत. भारतीय उद्योजकांना जागतिक व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने बीबीएनजीचे हे पाऊल महत्त्वपूर्ण मानले जात आहे. या ऐतिहासिक ग्लोबल व्हर्च्युअल चॅप्टर मीटिंगमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन रिजनल हेड जयंत छत्रे यांनी केले आहे.

# मुलाने गळा आवळून केली आईची हत्या

## घरातील वादाचा भीषण शेवट, -अमरावतीत गजानन प्लाझा परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** ज्या आईने मुलाला जन्म देऊन वाढविले, त्याच आईचा मुलाने गळा आवळून जीव घेतल्याची धक्कादायक घटना शहरातील गाडगेनगर परिसरात उघडकीस आली. रंजना सतीश कानफाडे (वय ६५) असे मृत महिलेचे नाव असून, त्यांचा मुलगा तुषार सतीश कानफाडे (वय ३९) याला पोलिसांनी अटक केली आहे. आई आपल्याशी नीट बोलत नसल्याच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.



गजानन प्लाझा परिसरातील रिंग रोडजवळील घरात रंजना आणि तुषार हे दोघे राहत होते. तुषार हा माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अभियंता असून, पुण्यात वास्तव्यास राहून फ्रान्समधील एका बहुराष्ट्रीय कंपनीत काम करीत असल्याचे सांगण्यात आले आहे. घरून काम करण्याची सुविधा असल्यामुळे तो अधूनमधून अमरावतीला येत असे.

मिळालेल्या माहितीनुसार, आई आणि मुलामध्ये घरगुती कारणांवरून वारंवार वाद होत होते. शनिवारी सकाळीही दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. आई आपल्याशी व्यवस्थित बोलत नाही, अशी तुषारची तक्रार असल्याचे समोर आले आहे. वादाचे रूपांतर गंभीर घटनेत झाले. तुषारने आई रंजना यांचा गळा आवळला. यात त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर तुषार स्वतः गाडगेनगर पोलीस ठाण्यात पोहोचून त्याने आईच्या हत्येची माहिती दिल्याचे वृत्त आहे. ☞(पान २ वर)

### ■ पोलीस आयुक्त घटनास्थळी

घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, गाडगे नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव आणि गुन्हे शाखेच्या डीबी पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आरोपी तुषार याला ताब्यात घेतले असून, घटनास्थळाची पाहणी करून पुढील तपास सुरू केला आहे. आईच्या हत्येमागील नेमके कारण काय, या घटनेला अन्य काही कौटुंबिक पार्श्वभूमी आहे का, याचा शोध गाडगे नगर पोलीस घेत आहेत. उच्चशिक्षित इंजिनिअर मुलाकडूनच जन्मदात्या आईची हत्या झाल्याच्या या घटनेने अमरावती शहर हादरले आहे.

# नालवाडा येथे ४५ वर्षीय इसमाची निर्घृण हत्या

## दोन आरोपी ताब्यात, खल्लार ठाण्यात गुन्हे दाखल





**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील नालवाडा येथे ४५ वर्षीय इसमाची धारधार शस्त्राने निर्घृणपणे हत्या केल्याची घटना (दि.१०)रात्री १ ते १:३० वाजताच्या सुमारास घडली.याप्रकरणी खल्लार पोलिसांनी दोन आरोपीना ताब्यात घेतले असून त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत.

दिपक आत्माराम उमेकर (वय ४५) असे हत्या झालेल्या इसमाचे नाव असून आज (दि.१०) रात्रीच्या सुमारास त्याची राहत्या घरी निर्घृणपणे हत्या केली.मिळालेल्या माहितीनुसार मृतक दिपक हा दारु पिण्याचा व्यसनाधिन असल्याने तो घरी एकटाच राहत होता.त्याची पत्नी दोन मुलांसह १० वर्षापासून माहेरी राहत आहे. वृद्ध आई ही त्याच्या बहिणीकडे राहते.तो नालवाडा येथिल घरी एकटाच☞(पान २ वर)

# वंचित उमेदवार गाजी जाहेरोश यांचे नामांकन प्रकरण उच्च न्यायालयात

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना नोटीस; सोमवारी उपस्थित राहण्याचे आदेश

### अमरावती शिक्षक मतदारसंघ निवडणुक

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शिक्षक मतदारसंघात मैदानातील उमेदवारांच्या प्रचाराला वेग आलेला असतानाच निवडणुकीत नवा ट्विस्ट निर्माण झाल्याचे सध्या चित्र आहे. नामांकन मध्ये तांत्रिक चुका असल्याच्या दाखला देत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार गाजी जाहेरोश यांचे नामांकन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अवैध ठरवले होते. सदर अवैधतेला वंचित बहुजन आघाडीने उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले असून न्यायालयाने गाजी जाहेरोश यांची अपील मान्य करत ☞(पान २ वर)



### ■ अलीम पटेलांची एन्ट्री कुणाच्या पथ्यावर ?

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार गाजी जाहेरोश यांचे नामांकन अवैध ठरवल्याचे समजताच अमरावती विधानसभा निवडणुकीत निसटता पराभव झालेले डॉ. अलीम पटेल यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात धाव घेत आक्षेप घेणारे श्रीकांत देशपांडे अल्पसंख्याक विरोधी असल्याची भूमिका प्रसार माध्यमातून मांडली होती. गाजी जाहेरोश यांच्या अवैध नामांकन प्रकरणी डॉ. पटेल सह ॲड. सिद्धार्थ गायकवाड हे खंबीरपणे न्यायालयीन प्रकियेकरिता मेहनत घेत असल्याने गाजी जाहेरोश यांच्या अवैध नामांकनाच्या निमित्ताने डॉ. अलीम पटेल यांची झालेली एन्ट्री कुणाच्या पथ्यावर पडणार हे येणारा काळच ठरवेल.

# इंडिया आघाडीच्या वतीने तिवसा येथे जोरदार निदर्शने

**तिवसा/प्रतिनिधीः-** दिल्ली येथील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या 'जेन-झी' आंदोलनाला समर्थन देण्यासाठी तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी तातडीने राजीनामा द्यावा, या मागणीसाठी शनिवारी दि. १० ऑक्टोबर रोजी तिवसा येथे इंडिया आघाडीच्या वतीने सर्वपक्षीय जोरदार निदर्शने करण्यात आली.



सकाळी ११ वाजताच्या सुमारास तिवसा मार्केट परिसरातून घोषणा देत निघालेला इंडिया आघाडीतील विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांचा जथ्था पेट्रोल पंप चौकात पोहोचला. यावेळी केंद्र सरकार आणि मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात जोरदार घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडण्यात आला.

'ज्ञानेशकुमार राजीनामा द्या', 'वोट चोरी नही चलेगी' आणि 'मोदी सरकार चले जाव' अशा घोषणांद्वारे आंदोलकांनी आपला रोष व्यक्त केला. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि निवडणूक यंत्रणेच्या विश्वासार्हतेचा मुद्दा उपस्थित करत आंदोलनकर्त्यांनी विविध मागण्या मांडल्या. दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून विद्यार्थ्यांवर दडपशाही करण्यात आल्याचा आरोप करत तिवसा येथील आंदोलकांनी या घटनेचा निषेध नोंदविला. विद्यार्थ्यांची तातडीने सुटका करावी, त्यांच्या आंदोलनाचा आवाज दडपण्याऐवजी त्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. इंडिया आघाडीच्या या आंदोलनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, शिवसेना (उबाठा), भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय बौध्द महासभा, आदिवासी विकास परिषदसह इंडिया आघाडीतील विविध घटक पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.या ☞(पान २ वर)

# हॉटेल रिमझिममध्ये भीषण आग

## सिलेंडर लिकेज झाल्याने घटना, लाखोंचे नुकसान

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुन्या बायपास रोडवरील हॉटेल रिमझिम मध्ये शुक्रवार ९ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास किचन मधील गॅस सिलेंडर लिकेज झाल्याने भीषण आगली. सुदैवाने कोणतीही जीवित हानी नाही झाली.माहिती नुसार जुन्या बायपास रोडवर हॉटेल रिमझिम मध्ये शुक्रवारी रात्री ११ वाजता ग्राहकांची मोठी गर्दी होती. सर्व वेटर ग्राहकांना जेवण देण्यात व्यस्त होते. याच वेळी किचन मध्ये गॅस सिलेंडर लिकेज होऊन आग लागली.बघता बघता आगीने भीषण रूप धारण केले. त्यामुळे हॉटेलचे वेटर आणि ग्राहकांमध्ये एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती तात्काळ बडनेरा अग्निशमन दलाला देण्यात आली.



माहिती मिळताच अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.हॉटेलच्या किचन मध्ये ४ ते ५ सिलेंडर असल्याची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता किचन मध्ये ठेवलेले ☞(पान २ वर)

# सीजेपीच्या दिल्ली आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीत हायअलर्ट

## -विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयासह इर्विन चौकात पोलीसाचा बंदोबस्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** सीजेपी कडून दिल्लीत घोषित मोर्चा आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शहर पोलीस सतर्क झाली आहेत. शहरात शांतता , कायदा- सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलिसांनी खबरदारीचे पाऊल उचलत विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आणि इर्विन चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात पोलीसाचा तगडा बंदोबस्त तैनात केला आहे. जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तालयाकडे जाणाऱ्या मोर्चाची सुरुवात इर्विन ☞(पान २ वर)



# राधानगरात विद्यार्थ्यावर चाकूने हल्ला करणारे ताब्यात

### चौबे प्लॉट परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील चौबे प्लॉट परिसरातील राधानगरमध्ये विद्यार्थ्यावर चाकूने हल्ला करून त्याला गंभीर जखमी करण्यात आल्याची घटना घडली. एवढ्यावरच न थांबता हल्लेखोरांनी परिसरात उभ्या असलेल्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांची तोडफोड केली. या प्रकारामुळे परिसरातील नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. प्रकरणाचा तपास करत गुन्हे शाखेने चार तरुण आणि एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे. गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पलाश लाइन, राधानगर येथे चार ते पाच युवकांनी एका विद्यार्थ्यावर चाकूने वार केले. या हल्ल्यात विद्यार्थी गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर आरोपींनी परिसरात उभ्या असलेल्या वाहनांचे नुकसान केले. या घटनेनंतर जखमी विद्यार्थ्याच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात अज्ञात ☞(पान २ वर)



# नवरात्रोत्सवासाठी ग्रामीण पोलिसांची यंत्रणा सज्ज

## जिल्ह्यात १,७०९ दुर्गा आणि २८९ शारदा मंडळे

### -ड्रोन, सीसीटीव्हीसह सायबर पथकाची नजर

**अमरावती/प्रतिनिधीः-** नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलीस प्रशासनाने सुरक्षा नियोजन केले आहे. जिल्ह्यात १,७०९ दुर्गा मंडळे आणि २८९ शारदा मंडळांमध्ये देवीची स्थापना होणार आहे. उत्सवाच्या काळात गर्दीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण आणि अनुचित घटनांना प्रतिबंध करण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी ही माहिती दिली.



बंदोबस्तासाठी एक अतिरिक्त पोलीस अधीक्षक, सात उपविभागीय पोलीस अधिकारी, २० पोलीस निरीक्षक, ११७ पोलीस उपनिरीक्षक आणि १,७०० पोलीस अंमलदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय राज्य राखीव पोलीस ☞(पान २ वर)

# मंदिरांच्या दानपेट्यांवर चोरट्यांचा डल्ला; तिघांचा सहभाग उघड

## -दुचाकीसह ५१,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** गावातील मंदिरांच्या दानपेट्याही चोरट्यांच्या निशाण्यावर आल्याची घटना पथ्रोट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परसापूर येथे उघडकीस आली. दोन मंदिरांच्या दानपेट्या फोडून ५ हजार ५०० रुपयांची रोकड चोरणाऱ्या तिघांचा स्थानिक गुन्हे शाखेने शोध घेतला आहे. याप्रकरणी रोशन प्रल्हादराव मनोहरे (वय २०, रा. तळणी, ता. चांदूर बाजार) याला ताब्यात घेण्यात आले असून, दोन विधिसंघर्षग्रस्त बालकांचाही सहभाग समोर आला आहे. परसापूर येथील योगेश अरुणराव काकड (वय ४२) यांनी ८ ऑक्टोबर रोजी पथ्रोट पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार, ७ ऑक्टोबर रोजी अज्ञात चोरट्यांनी गोपाळकृष्ण मंदिराच्या दानपेटीतून चार हजार रुपये आणि श्री गजानन महाराज मंदिराच्या दानपेटीतून दीड हजार रुपये चोरले. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. चोरीमध्ये तळणी येथील रोशन मनोहरे सहभागी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. ☞(पान २ वर)



# चाकूहल्ल्यात दोघे जखमी

## जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या चाकूहल्ल्यात दोन जण जखमी झाले आहेत. नशीब खान बुरहान खान (वय ३३) आणि असलम खान बुरहान खान (वय ३०, दोघेही रा. हैदरपुरा) अशी जखमींची नावे आहेत. दोघांनाही उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर औषधोपचार सुरू आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन जणांवर चाकूने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात नशीब खान आणि असलम खान हे दोघे जखमी झाले. घटनेनंतर जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. त्यांच्यावर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. शहरात चाकूहल्ल्याच्या घटना समोर येत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण होत आहे. मात्र, या घटनेमागील नेमके☞(पान २ वर)

# अंबादेवी-एकवीरा देवी यात्रेसाठी वाहतुकीत मोठे बदल

## १० ते २० ऑक्टोबरदरम्यान अनेक मार्ग बंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अंबादेवी आणि एकवीरा देवी मंदिरात ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान नवरात्रोत्सव साजरा होणार आहे. या काळात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन शहर वाहतूक विभागाने विशेष वाहतूक नियोजन केले आहे. राजकमल चौक ते अंबागेटसह मंदिर परिसरातील अनेक मार्गांवरील वाहतूक बंद ठेवण्यात येणार असून, वाहनचालकांसाठी पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. हे निर्बंध १० ऑक्टोबरच्या मध्यरात्री १२.०१ वाजेपासून २० ऑक्टोबरच्या रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील.




यात्रा काळात राजकमल चौक ते अंबागेट, साबणपुरा खिडकी ते गांधी चौक, ओसवाल भवन ते गांधी चौक, डॉ. धवड यांच्या दवाखान्यापासून गांधी चौक, मुख्य पोस्ट ऑफिस रोड ते पंचशील लॉन्ड्री-गांधी चौक आणि भुतेश्वर चौक ते गांधी चौक या मार्गांवरील वाहतूक बंद राहील. याशिवाय नमुना परिसरातून अंबादेवी मंदिराकडे जाणारे लहान रस्ते, सक्करसाथ ते भाजीबाजारातील जैन मंदिर आणि अंबागेट ते औरंगपुरा मार्गे मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांवरही वाहतुकीला प्रतिबंध असेल. टांगापाडाव-साबणपुरा पोलीस चौकी-प्रभात चौक हा रस्ता अरुंद असल्याने या मार्गावर जड वाहनांना प्रवेश दिला जाणार नाही.

मालवाहू वाहनांना बडनेरा टी-पॉइंट, अकोला वाय-पॉइंट, सुपर हायवे, कोंडेश्वर टी-पॉइंट, बगिया टी-पॉइंट, जुना बायपास, एमआयडीसी, दस्तुरनगर चौक, चपराशीपुरा चौक, बियाणी चौक,☞(पान २ वर)

# विवांता इन्फिनिटी प्रोजेक्टचे काम वेगाने

## संचालक राठोड आणि राजेश मिश्रा यांचा दावा



**अमरावती/प्रतिनिधीः-** जुन्या बियाणी चौकापुढे विद्यापीठ रोडवरील विवांता इन्फिनिटी प्रोजेक्टच्या बांधकामाने पुन्हा एकदा वेग पकडला आहे. काही तांत्रिक आणि आर्थिक अडचणींमुळे गेल्या दीड-दोन वर्षांपासून रखडलेला हा प्रोजेक्ट आता पुन्हा वेगाने पुढे जात आहे. ६ ते ८ महिन्यांत बांधकाम पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती विवांता इन्फिनिटी प्रा. लि. चे संचालक प्रमोद राठोड आणि राजेश मिश्रा यांनी आज शनिवार १० ऑक्टोबर रोजी आयोजित ☞(पान २ वर)






# "मराठा मरता है...या मारता है..."


सारांश
जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय
▫ रविवार, ११ ऑक्टोबर २०२६ ▫ E-paper - www.janmadhyam.com




## 'गेल्या आठवड्यात त्यांनी माझ्याशी...'

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनामुळे संपूर्ण चित्रपटसृष्टीला मोठा धक्का बसला आहे. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी गोव्यात वयाच्या ७५ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने सर्वत्र शोककळा पसरली असून, अनेक कलाकार त्यांना आदरांजली वाहत आहेत. दरम्यान, दिग्गज अभिनेत्री हेमा मालिनी यांनी नाना पाटेकर यांच्या आठवणींना उजाळा देऊन एका गोष्टीची खंत व्यक्त केली आहे.

**नाना पाटेकर यांचा फोन घेता आला नाही**

हेमा मालिनी यांनी नाना पाटेकर यांची आठवण जागवली. साधारण एक आठवडा आधी नाना पाटेकरांनी हेमा मालिनींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यावेळी हेमा या प्रवासात असल्यामुळे त्यांचं नानांशी फोनवर बोलणं होऊ शकलं नाही. त्यामुळे नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी ऐकल्यानंतर त्यांना तीव्र धक्का बसला. ''त्या वेळी फोन उचलायला हवा होता'', अशी भावना त्यांनी व्यक्त केली असून त्यांना आता या गोष्टीचा खूप पश्चाताप होत आहे.

हेमा मालिनींनी पुढे म्हटलं की, हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीने एक अत्यंत महान कलाकार गमावला आहे. नाना पाटेकर हे अभिनयाची एक संस्था होते. त्यांची काम करण्याची शैली आणि पडद्यावर विविध प्रकारच्या भूमिका साकारण्याचं त्यांचं कौशल्य त्यांना खूप आवडत होतं. याशिवाय, हेमा मालिनी यांनी नाना पाटेकर यांच्या सामाजिक कार्याचीही आठवण काढली. त्यांनी सांगितले की, नाना पाटेकरांनी 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून देशातील शेतकरी आणि गरजू लोकांना मदत केली, अशा शब्दांत हेमा मालिनींनी नानांना आदरांजली वाहिली.

## नानांचे फेमस डायलॉग

आ गये मेरी मौत का तमाशा देखनेष्ठ अब मुझे लटका देंगे, जुबान ऐसी बाहर आयेगी, आँखे बाहर आएंगीष्ठ थोडी देर लटकता रहुँगा, फिर ये मेरा भाई मुझे नीचे उतारेगाष्ठ फिर आप चर्चा करते घर चले जाओगे, खाना खाओगे, सो जाओगे.

**क्रांतिवीर**

एक मच्छर आदमी को हिजड़ा बना देता हैष्ठ साला एक मच्छर! सिस्टम इतना करप्ट है की, इमानदार आदमी को भी चोर बना देता है!

**यशवंत**

राजनीती में फैसले सही या गलत नही होतेष्ठ फैसले होते है उन्हे वक्त और हालात के हिसाब से लिया जाता है.

**राजनीती**

ये दुःख नाम की बिमारी का इलाज डॉक्टर के पास नहीं हैष्ठ इसका इलाज खुद को ढूँढना पडता है, दुःख को भूलना पडता है.

**परिंदा**

इस दुनिया में दो तरह के लोग होते हैंष्ठ एक वो जो खुद के लिए जीते हैं, और दुसरे वो जो दुसरों के लिए जीते हैं.

अब तक छप्पन,अपना तो उसूल है

पहले लात, फिर बात,उसके बाद मुलाकात!

**तिरंगा**

कभी कभी दिल की आवाज सुनने के लिए तुम्हें अपनी इज्जत और अपने डर को दरकिनार करना पडता है.







**थोरला परिचय (मुख्य माहिती)**

**मूळ नाव:** विश्वनाथ दिनकरराव पाटेकर

**जन्म:** १ जानेवारी १९५१ (मुरुड-जंजिरा, रायगड)

**निधन:** ८ ऑक्टोबर २०२६ (डोना पौला, गोवा, वय ७५ वर्ष)

**शिक्षण:** सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स, मुंबई

**कुटुंब:** पत्नी - नीलकंती पाटेकर, मुलगा - मल्हार पाटेकर

**अभिनय व कलाटणीचा प्रवास**

**पार्श्वभूमी:** लहान वयात वडिलांचा व्यवसाय बंद पडल्यानंतर कुटुंबावर आर्थिक संकट आले.

यांनी मुंबईत चित्रपटांची पोस्टर्स रंगवण्याचे आणि लावण्याचे काम केले.

**चित्रपट पदार्पण:** १९७८ मध्ये 'गमन' या चित्रपटातून त्यांनी सिनेसृष्टीत पाऊल ठेवले.

**प्रमुख चित्रपट:** 'अंकुश', 'परिंदा' (१९८९), 'प्रहार' (१९९१) - ज्यात त्यांनी मेजर चौहानची भूमिका साकारली, 'क्रांतिवीर' (१९९४), 'अग्निसाक्षी' (१९९६), आणि मराठीतील गाजलेला चित्रपट 'नटसम्राट' (जिसमें त्यांनी गणपतराव बेलवलकर यांची भूमिका केली).

**पुरस्कार व सन्मान:** त्यांना तीन राष्ट्रीय पुरस्कार, दोन फिल्मफेअर पुरस्कार आणि २०१३ मध्ये भारत सरकारतर्फे 'पद्मश्री' सन्मान मिळाला होता.

सामाजिक कार्य

**नाम फाउंडेशन :** दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मदत करण्यासाठी त्यांनी मकरंद अनासपुरे यांच्यासह 'नाम फाउंडेशन'ची स्थापना केली.

**गाजलेले चित्रपट**

**क्रांतिवीर (१९९४)** - या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

**नटसम्राट (२०१६)** - नाना पाटेकर यांचा अत्यंत लोकप्रिय मराठी चित्रपट.

**परिंदा (१९८९)** - उत्कृष्ट अभिनयासाठी ओळखला जाणारा हिंदी चित्रपट.

**अंकुश (१९८६)** - त्यांची पहिली यशस्वी भूमिका.

**प्रहार (१९९१)** - या चित्रपटाचे दिग्दर्शनही त्यांनी केले होते.

**तिरंगा (१९९३)** - देशभक्तीपर गाजलेला चित्रपट.

**अबतक छप्पन (२००४)** - क्राईम-थ्रिलर चित्रपट.

**वेल्कम (२००७)** - विनोदी भूमिकेसाठी प्रसिद्ध चित्रपट.

**देऊळ (२०११)** - एक प्रसिद्ध मराठी चित्रपट.

## नियतीने साधला डाव



ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनानं सिने इडंस्ट्रीवर मोठा आघात झाला आहे. नाना सिनेइडंस्ट्रीत चांगलेच सक्रिय होते. नुकतेच त्यांचे काही प्रोजेक्ट्स प्रदर्शित झाले होते, तर काही सिनेमे भेटीला येणार आहेत. इतकंच नव्हे तर मिळालेल्या माहितीनुसार नाना आणि माधुरी दीक्षित यांची भेट होता होता राहिली. मुंबईत शूटिंगच्या निमित्तानं दोघांची भेट होणार होती.

तर मराठी छोट्या पडद्यावरचा लोकप्रिय शो ' कोण होणार करोडपती 'च्या नवीन पर्वाचा ग्रँड प्रीमियर लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. या नव्या पर्वाचं सूत्रसंचालन बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित करत आहे. या शोच्या पहिल्याच एपिसोडमध्ये नाना पाटेकर विशेष पाहुणे म्हणून हजेरी लावणार होते आणि चित्रीकरणही निश्चित झालं होतं. पण, नाना पाटेकर यांच्या अकस्मात निधनामुळं मालिकेच्या प्रीमियर एपिसोडमध्ये मोठा बदल करण्यात आला असून, आता अभिनेत्री सोनाली बेंद्रे या शोमध्ये हॉटसीटवर बसताना दिसणार आहे.माधुरी दीक्षितच्या या नव्या प्रवासाची सुरुवात करण्यासाठी नाना पाटेकर गुरुवारी शोच्या पहिल्या भागाचं शूटिंग करणार होते. मात्र, त्यांच्या अचानक जाण्यानं संपूर्ण चित्रपटसृष्टीवर शोकाकुल कळा पसरली. माधुरी दीक्षितनंही सोशल मीडियावरून नाना पाटेकरांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. या दुर्दैवी घटनेनंतर शोच्या निर्मात्यांनी प्रीमियर एपिसोडच्या रुपेरेशेत बदल केला आणि सोनाली बेंद्रेनं हॉटसीटवर येण्याचं मान्य केलं.

## नानांच्या निधनानंतर नीलकांती पाटेकर...



चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ आणि प्रख्यात अभिनेते नाना पाटेकर यांचं ८ ऑक्टोबर २०२६ रोजी गोव्यात हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानं निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्यानं संपूर्ण चित्रपटसृष्टीसह लाखो चाहत्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखाच्या प्रसंगी त्यांच्या पत्नी नीलकांती पाटेकर यांनी अत्यंत भावूक आणि मोजक्या शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.नाना पाटेकर यांच्या निधनानंतर नीलकांती यांनी पतीला अखेरचा निरोप दिला. यावेळी त्या भावुक झाल्याचं पाहायला मिळालं. खरं तर गेल्या काही वर्षांपासून त्यांच्या विभक्त राहण्याची चर्चा सुरू होत्या. पण त्या चांगल्या वाईट काळात नानांसोबत नेहमीच उभ्या राहिल्या. आता त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून पहिली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी फेसबुवर एवघ्या दोन शब्दांची पोस्ट शेअर केली आहे.शब्द...निःशब्द...' , या मोजक्या शब्दांतून त्यांनी भावनांना वाट मोकळी करून दिली आहे.नाना पाटेकर आणि नीलकांती यांचा विवाह रंगभूमी आणि चित्रपटांच्या माध्यमातून एकत्र आल्यानंतर झाला होता.

गेल्या काही वर्षांपासून ते दोघे वैयक्तिक कारणांमुळंवे गळे राहत असले, तरी त्यांच्यातील परस्पर आदर आणि कौटुंबिक संबंध कायम होते.

एका कार्यक्रमाच्या निमित्ताने गोव्यातील दोनापावला येथील निवासस्थानीनाना पाटेकर आले होते. गुरुवारी पहाटे त्यांना अस्वस्थ वाटू लागले. निकटवर्तीयांनी त्यांना नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, तत्पूर्वीच नाना पाटेकर यांची प्राणज्योत मालवली. मृत्यूसमयी नानांचे वय ७५ होते. त्यांच्या पश्चात पत्नी नीलकांती आणि मुलगा मल्हार पाटेकर असा परिवार आहे. रात्री उशिरा नानांच्या पार्थिवावर पुण्यातील डोणजे येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.रायगड जिल्ह्यातील मुरुड येथे १ जानेवारी १९५१ रोजी जन्मलेल्या नाना पाटेकर यांचं बालपण अतिशय गरिबीत गेले. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकलेल्या नानांनी अभिनय कारकीर्दीची सुरुवात रंगभूमीपासून केली. 'पुरूष', 'गिधाडे' ही त्यांची अत्यंत गाजलेली नाटके.

## मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा!

एका कार्यक्रमाच्या निमित्ताने गोव्यातील दोनापावला इथल्या निवासस्थानी नाना पाटेकर आले होते. गुरुवारी पहाटे त्यांना अस्वस्थ वाटू लागलं. निकट वर्तीयांनी त्यांना नजीकच्या रुग्णालयात दाखल केलं. मात्र, तत्पूर्वीच नाना पाटेकर यांची प्राणज्योत मालवली. नानांच्या निधनानं सिनेविश्वानं एक चतुरस्त्र नट गमावला , पण इंडस्ट्रीतल्या कलाकारांनी सच्चा मित्र गमावला आहे.



रंगभूमीचा मंच असो वा रुपेरी पडदा, आपल्या सहजाभिन यामुळं सर्वव्यापी राहिलेले चतुरस्त्र अभिनेते, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं गुरुवारी पहाटे गोव्यातील निवासस्थानी हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. एक वादळी व्यक्तिमत्त्व ध्यानीमनी नसताना काळाच्या पडद्याआड गेले... त्यांच्या मित्रमंडळींसाठी हा मोठा धक्का आहेत. इंडस्ट्रीत नानांचे अनेक मित्र , पण त्यांची आणि अशोक सराफ यांची मैत्री नेहमीच चर्चेचा विषय ठरली. नानांच्या निधनानंतर अशोक सराफ यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.नाना आणि माझी मैत्री खूप जुनी. आमच्या मैत्रीच्या अनेक आठवणी आहेत. त्या कायमस्वरूपी जपून ठेवल्या आहेत. त्यावेळी आम्ही 'हमीदाबाईची कोठी' हे नाटक करत होतो. एका गावात काही कारणामुळे प्रयोग रद्द झाला आणि संतप्त प्रेक्षकांनी प्रचंड गोंधळ घातला. खुर्च्या तोडल्या, पोस्टर्स फाडली. सगळ्यांचा रोष माझ्यावर वळला होता. लोक माझ्या अंगावर येत असल्याचे पाहून नानाने मला अक्षरशः हाताला धरले आणि थिएटरच्या मागच्या बाजूने बाहेर काढले. आम्ही गर्दीतून पळत सुटलो. त्याने एक रिक्षा थांबवली आणि मला सुरक्षितपणे एका रेस्ट हाऊसमध्ये पोहोचवले. त्या दिवशी त्याने मला वाचवले, असे मी आजही मानतो.

## केअरटेकरसह इमर्जन्सी टीम घरी, नाना मृत्यूच्या दारात होते

अभिनेते नाना पाटेकर यांचे काल पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. जगभरातील चित्रपटप्रेमी या दुःखद घटनेने शोकसागरात बुडालेले असतानाच, अखेरच्या क्षणी त्यांच्यासोबत असलेल्या काही मोजक्या व्यक्तींना एक प्रकारची हतबलता जाणवत आहे. 'कदाचित आम्ही नानांना वाचवू शकलो असतो, पण त्यांनी आम्हाला ती संधीच दिली नाही,' असे गोव्यातील मणिपाल हॉस्पिटलच्या ऑन्कोलॉजी विभागाचे प्रमुख आणि वरिष्ठ सल्लागार डॉ. शेखर साळकर यांनी अत्यंत दुःखी स्वरात सांगितलं.

डॉ. साळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार 'पहाटे अडीचच्या सुमारास नाना पाटेकर यांनी एका मित्राला मेसेज करुन आपली प्रकृती ठीक नसल्याचे कळवले होते. त्यानंतरच्या काही तासांत जे घडले, त्यावरुन डॉक्टरांच्या मनात असा प्रश्न निर्माण झाला आहे की, जर त्यांना वेळेत रुग्णालयात आणले असते, तर वैद्यकीय पथकाला काहीतरी उपाययोजना करण्याची संधी मिळाली असती का?' 'इंडियन एक्सप्रेस'च्या वेबसाईटने यासंदर्भात वृत्त दिले आहे.

डॉ. साळकर यांच्या म्हणण्यानुसार, नाना पाटेकर यांचे केअरटेकर पहाटे ४:१८ वाजताच्या सुमारास रुग्णालयात आले.

## ..सकाळी कॉल करायचा याच विचारात रात्री झोपलो

अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनानं त्यांच्या मित्रमंडळींनाही मोठा धक्का बसला आहे. कालपर्यंत आपल्याला फोन करणारा जवळचा मित्र आता आपल्यात नाही, हे सत्य स्वीकारणे त्यांनाही जड जात आहे. अभिनेते आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या आयुष्यातही नानांचं महत्त्वाचं स्थान होतं. नानांच्या निधनानंतर त्यांनी भावुक अशी प्रतिक्रिया शेअर केली आहे.



महेश मांजरेकर सध्या लंडनमध्ये आहे. त्यांनी एक व्हिडिओ मेसेज शेअर करत भावना मांडल्या, तसंच शी बोलताना काही जुन्या आठवणींनाही उजाळा दिलाय.काही माणसांबद्दल आपल्या मनात एक ठाम समज असतो की मंडळी कधीच जाणार नाहीत. नाना माझ्यासाठी असाच माणूस होता. कधीतरी 'नाना पाटेकरनो मोअर' हे ऐकावे लागेल, असा विचारही मनात आला नव्हता. नाना अधूनमधून फोन करायचा.

'काय रे भंडाऱ्या, काय चाललंय?' असे विचारायचा. एखाद दुसरी शिवी हासडायचा. एकदा त्याने मला फोन करून सांगितले, 'मांज्या, एक जबरदस्त गोष्ट ऐकली मी राजूची.' मी विचारले, 'कोण राजू ?' तर म्हणाला, 'राजू हिरानी रे... काय जबरदस्त गोष्ट आहे. मजा येईल करायला.' आज वाईट याचे वाटते की जर राजू हिरानी आणि नाना एकत्र आले असते, तर किती अफाट चित्रपट झाला असता.

# ताणतणाव, मानसिक थकवा टाळायचा असेल...



आजकाल ताणतणाव देवासारखाच सर्वव्यापी झाला आहे. तो सर्वत्र पसरलेला आहे. पण ताण म्हणजे नक्की काय? माझ्या मते, 'खूप जास्त काम, अतिशय कमी वेळ आणि ते काम करण्याची अजिबात ऊर्जा नसणे' म्हणजेच ताणतणाव होय. जेव्हा ही परिस्थिती दीर्घकाळ टिकून राहते, तेव्हा ताणतणाव तुम्हाला इतका थकवून टाकतो की, दिवसाची सुरुवात होण्यापूर्वीच तुम्हाला प्रचंड थकवा जाणवू लागतो. यालाच आजच्या भाषेत आपण 'बर्नआऊट' असे म्हणतो.

आता यातून बाहेर कसे पडायचे? यावर दोन पर्याय असू शकतात: एक तर कामाचा ताण कमी करणे, जे आजच्या काळात शक्य दिसत नाही; किंवा उपलब्ध वेळ वाढवणे, जेदेखील अशक्यच वाटते. त्यामुळे आपल्यासमोर उरलेला एकमेव पर्याय म्हणजे आपली ऊर्जा पातळी वाढवणे.

जेव्हा आपल्याकडे पुरेशी ऊर्जा आणि उत्साह असतो, तेव्हा आपण कोणत्याही आव्हानाला सहज सामोरे जाऊ शकतो आणि ते पेलू शकतो. आपल्याला आपली ऊर्जा पातळी वाढवण्याची गरज आहे आणि इथेच ध्यान तसेच सुदर्शन क्रियेसारख्या श्वासोच्छ्?वासाच्या पद्धती आपल्याला प्रचंड मदत करतात. या सर्व तंत्रांमुळे अवघ्या काही मिनिटांतच आपली ऊर्जा पातळी उंचावते. झोप घेणे नक्कीच महत्त्वाचे आहे, परंतु झोपेमुळे मिळणारी विश्रांती ही एक सुस्तावलेली विश्रांती असते.

याउलट, सचेतन विश्रांती ही ध्यानातून मिळते. ध्यान म्हणजे केवळ शांत बसून विचार करत राहणे नव्हे. अनेक लोक मनातल्या मनातच खूप काम करत असतात; ते विविध गोष्टींची कल्पना करतात, चित्रे रेखाटतात. दुर्दैवाने, याला ध्यान म्हणत नाहीत. ध्यान म्हणजे पूर्णपणे सर्व सोडून देणे आणि मोकळेपणाने विश्रांती घेणे होय. ८ ते १० तासांच्या झोपेपेक्षा २० मिनिटांच्या ध्यानातून लोकांना अधिक ऊर्जा मिळाल्याचा अनुभव आहे. ऊर्जेचे मुख्य चार स्त्रोत आहेत: अन्न, झोप, श्वास आणि मनाची शांत व ध्यानस्थ अवस्था. संतुलित आणि पौष्टिक अन्न योग्य प्रमाणात खा; ६ ते ८ तासांची पुरेशी झोप घ्या (ना कमी, ना जास्त); खोल श्वास घेण्याची काही तंत्रे शिका; आणि सकाळी व संध्याकाळी १५ ते २० मिनिटे ध्यान करा. संपूर्ण दिवसभर तुम्हाला ताजेतवाने ठेवण्यासाठी हे पुरेसे आहे. तुमच्या ऊर्जा पातळीत झालेला फरक तुम्हाला लगेचच दिसून येईल. आध्यात्मिक ज्ञानामुळेदेखील तुम्हाला एका वेगळ्या प्रकारची ऊर्जा मिळते आणि ध्यान तर या सर्वांमध्ये सर्वात श्रेष्ठ आहे. ध्यानाव्यतिरिक्त, जेव्हा भावना तुमच्या बुद्धीचा ताबा घेतात, तेव्हा मानसिक संतुलन परत मिळवण्यासाठी श्वास हे एक अतिशय व्यावहारिक साधन ठरू शकते. भावनांच्या आवेगावर मात करण्यासाठी सुदर्शन क्रिया अत्यंत उपयुक्त ठरते. नकारात्मक भावनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी हे एका स्वयंचलित व्हॉल्व्ह सिस्टीमसारखे काम करते.

# मातंगी...

अथांग समुद्रात एक बोट वेगाने पुढे निघाली आहे. लाटा उसळत आहेत, वारा दिशा बदलत आहे, आजूबाजूने इतर जहाजे जात आहेत, पण या बोटीच्या सुकाणूवर कोणीही नाही. एवढेच नव्हे, तर संपूर्ण बोटीवर किनारपट्टीवर सतत लक्ष ठेवणे, संशयास्पद नौकांचा शोध घेणे आणि समुद्रातील हालचालींची माहिती मिळवणे यासाठी मानवरहित नौका उपयुक्त ठरू शकतात. ज्या समुद्री भागात मनुष्याला पाठवणे धोकादायक असेल तेथेही अशा नौका काम करू शकतात. गस्त, टेहळणी,




एकही माणूस नाही! तरीही ती स्वतचा मार्ग शोधते, समोर आलेले अडथळे ओळखते, त्यांना टाळते आणि ठरलेल्या ठिकाणी पोहोचते. विज्ञानकथेत शोभावी अशी ही बोट प्रत्यक्षात आपल्या देशात तयार झाली आहे. तिचे नाव आहे 'मातंगी'. पुण्यातील सागर डिफेन्स इंजिनीअरिंगने विकसित केलेल्या या स्वयंचलित नौकेने मुंबई ते तुतिकोरिन म्हणजेच थुथुकुडी असा सुमारे १,५०० किलोमीटरचा समुद्री प्रवास करून हिंदुस्थानी सागरी तंत्रज्ञानाच्या क्षमतेची चुणूक दाखवली आहे. 'सागरमाला परिक्रमा' नावाच्या या मोहिमेचा प्रारंभ २९ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आला होता. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रवासात मातंगीवर चालक किंवा खलाशी नव्हता.

मातंगीला तांत्रिक भाषेत 'ऑटोनॉमस सरफेस व्हेईकल' म्हणजेच स्वयंचलित पृष्ठभागीय नौका म्हणतात. साध्या रिमोट कंट्रोल बोटीपेक्षा ती खूप वेगळी आहे. रिमोट कंट्रोल बोटीला दूर बसलेला माणूस सतत दिशा देतो. मातंगी मात्र आपल्या संगणकीय प्रणालीच्या मदतीने अनेक निर्णय स्वतः घेऊ शकते. तिच्यामध्ये स्वदेशी दिशादर्शन आणि धडक टाळणारी यंत्रणा बसवण्यात आली आहे. समुद्रातील परिस्थितीचा अंदाज घेत आपला मार्ग सांभाळणे आणि समोर अडथळा आल्यास त्यानुसार हालचाल करणे या प्रणालीमुळे शक्य होते. सागर डिफेन्सने विकसित केलेल्या 'जेनिसिस' या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित स्वयंचलित नियंत्रण तंत्रज्ञानाचा यामध्ये उपयोग करण्यात आला आहे. मुंबईहून निघाल्यानंतर मातंगीने पहिल्या टप्प्यात कारवारपर्यंत सुमारे ६०० किलोमीटरचा प्रवास स्वयंचलित पद्धतीने केला आणि पुढे थुथुकुडी गाठले.

अशा नौकेचा उपयोग केवळ एखादा विक्रम करण्यापुरता मर्यादित नाही. हिंदुस्थानला सुमारे साडेसात हजार किलोमीटरची किनारपट्टी लाभली आहे. या विशाल माहिती संकलन, शोध आणि बचाव कार्य यांसारखी विविध कामे त्यांच्याकडून करून घेता येऊ शकतात. काही मानवरहित नौकांवर शस्त्र प्रणालीही बसवता येतात. त्यामुळे भविष्यात नौदलाच्या मोठ्या युद्धनौकांना अशा अनेक छोट्या स्वयंचलित नौकांची साथ मिळण्याची शक्यता आहे. एकाच वेळी अनेक मानवरहित नौका परस्पर समन्वयाने काम करू लागल्या तर समुद्रातील युद्धाचे स्वरूपही मोठ्या प्रमाणावर बदलू शकते.

युक्रेन-रशिया संघर्षाने छोट्या मानवरहित समुद्री नौकांचे सामरिक महत्त्व जगासमोर आणले आहे. महागड्या आणि मोठ्या युद्धनौकांसमोर तुलनेने छोट्या मानवरहित नौका प्रभावीपणे वापरता येतात हे त्यातून दिसून आले. त्यामुळे अमेरिका, चीनसह अनेक देश आता अशा तंत्रज्ञानावर भर देत आहेत. हिंदुस्थानसाठी मातंगीचे महत्त्व याच पार्श्वभूमीवर अधिक वाढते. विशेष म्हणजे, तिच्या मागे सागर डिफेन्स इंजिनीअरिंग ही पुण्यातील कंपनी आहे आणि या प्रकल्पाला हिंदुस्थानी नौदलाच्या विविध यंत्रणा तसेच संरक्षण मंत्रालयाच्या 'आयडेक्स' उपक्रमाचे पाठबळ मिळाले आहे.

विमानांच्या क्षेत्रात ड्रोनने जशी क्रांती घडवली, तशीच क्रांती आता समुद्रात मानवरहित नौका घडवू शकतात. आज मातंगी स्वतः मार्ग शोधत दीड हजार किलोमीटरचा समुद्री प्रवास करते आहे. उद्या अशाच अनेक नौका समुद्रात एकमेकांशी समन्वय साधत देशाच्या किनाऱ्यांवर पहारा देताना दिसू शकतील. भविष्यातील समुद्रात जहाजे असतील, लाटा असतील, मोहिमा असतील; पण प्रत्येक नौकेवर माणूस असेलच असे नाही. या तंत्रज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे, मानवी जीविताचा धोका कमी होणे.

समुद्रात वादळ, शत्रूची हालचाल किंवा धोकादायक परिसर असला तरी स्वयंचलित नौका तेथे पाठवता येऊ शकते.

# 'मायक्रोब्लेझार'

विश्वातील एका अत्यंत दुर्मीळ आणि गूढ खगोलीय घटकाचा प्रथमच भक्कम पुरावा संशोधकांच्या हाती लागला आहे. दीर्घकाळापासून ज्याच्या अस्तित्वाचे केवळ गणितीय भाकीत केले जात होते, असा 'मायक्रोब्लेझार' नावाचा एक अद्भुत गोलीय घटक खगोलशास्त्रज्ञांनी शोधून काढला आहे. या शोधामुळे प्रचंड ऊर्जा आणि कण बाहेर फेकणाऱ्या कृष्णविवरांच्या वर्तनाचा आणि त्यांच्या क्रियाकलापांचा अधिक जवळून अभ्यास करणे शक्य होणार आहे.

'ब्लेझार' हे संपूर्ण विश्वातील सर्वांत ऊर्जावान घटकांपैकी एक मानले जातात. हे वस्तुतः 'क्वेसार' प्रकारातील घटक असतात. जेव्हा एखाद्या विशालकाय आकाशगंगेच्या केंद्रस्थानी असलेले प्रचंड



महाकाय कृष्णविवर सभोवतालचा पदार्थ आपल्याकडे खेचून घेते आणि त्यातील काही भाग प्रचंड वेगाने कणांच्या आणि विकिरणांच्या रूपात विरुद्ध दिशांना बाहेर फेकून देते, तेव्हा क्वेसारची निर्मिती होते. जेव्हा असा प्रकाशाच्या वेगाने वाहणारा शक्तिशाली प्रकाशझोत थेट पृथ्वीच्या रोखाने असतो, तेव्हा त्याला 'ब्लेझार' म्हटले जाते.

वैज्ञानिक यापूर्वी लहान आकाराच्या क्वेसारचा (मायक्रोक्वेसार) शोध घेण्यात यशस्वी झाले होते. त्यामुळे मायक्रोब्लेझारचेही अस्तित्व असले पाहिजे असा सिद्धांत मांडला जात होता. आता स्पेन, नेदरलँड्स आणि अर्जेंटिना येथील आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्रज्ञांच्या चमूने एका मायक्रोब्लेझारचा सविस्तर अभ्यास मांडला असून, हा संशोधन निबंध 'अॅस्ट्रॉनॉमी अँड अॅस्ट्रोफिजिक्स' या प्रसिद्ध नियतकालिकात प्रकाशनासाठी स्वीकारण्यात आला आहे. या संशोधनाचे प्रमुख लेखक आणि स्पेनमधील जएन विद्यापीठातील खगोलशास्त्रज्ञ जोसेप मार्टी यांनी सांगितले की, ''मायक्रोब्लेझारचा इतका प्रबळ आणि भक्कम पुरावा मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे.'' 'IRAS १८२९३-०९४१' असे नाव देण्यात आलेला हा घटक आपल्याच आकाशगंगेत पृथ्वीपासून सुमारे १२,००० प्रकाशवर्षे अंतरावर स्थित असून, तो धुळीच्या पडद्याआड दडला आहे.

ही एक द्विअंकी प्रणाली आहे, ज्यामध्ये एक कृष्णविवर एका महाकाय, उष्ण ताऱ्याभोवती दर ११ दिवसांत एक फेरी पूर्ण करते. ताऱ्यामधील द्रव्य जेव्हा या कृष्णविवरात खेचले जाते, तेव्हा त्यातील काही भाग दोन विरुद्ध दिशांना फेकला जातो. यातील एक शक्तिशाली प्रकाशझोत थेट पृथ्वीच्या रोखाने झेपावत आहे. तथापि, अशा मायक्रोब्लेझारचा अभ्यास करणे अत्यंत आव्हानात्मक असल्याचे मार्टी यांनी स्पष्ट केले. ताऱ्यांच्या उत्क्रांतीच्या जीवनक्रमात मायक्रोक्वेसारचा टप्पा अत्यंत अल्पकाळासाठी असतो, त्यामुळे योग्यवेळी या टप्प्यातील प्रणाली शोधणे हे खूप कठीण काम असते, असे त्यांनी सांगितले.

# मंगळावर दररोज बनतो आणि नष्ट होतो १,६०० कि.मी. लांबीचा ढग

मंगळ ग्रहावर दररोज सकाळी एकाच विशिष्ट ठिकाणी अत्यंत विशाल ढग तयार होतो आणि अवघ्या काही तासांत तो नाहीसाही होतो. सुमारे १,६०० किलोमीटर (१,००० मैल) लांबीचा हा ढग निर्माण होण्यामागे आणि विलीन होण्यामागे पृथ्वीवरील हवामानशास्त्रापेक्षा पूर्णपणे वेगळे आणि 'अनोखे भौतिकशास्त्र' कार्यरत असल्याचे वैज्ञानिकांच्या नव्या संशोधनातून समोर आले आहे. एका अहवालानुसार, मंगळावरील या अद्भुत आणि रहस्यमय घटनेने जगभरातील खगोलशास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेतले आहे.

हा ढग मंगळावरील 'अर्सिया मॉन्स' नावाच्या एका विशाल मृत ज्वालामुखीय पर्वताच्या माथ्यावर दररोज सकाळी तयार होतो. मंगळ ग्रहावर वसंत आणि उन्हाळ्याच्या ऋतूमध्ये ही प्रक्रिया सलग काही



महिने दररोज घडताना दिसते. सकाळी सूर्योदयानंतर अवघ्या तीन तासांत हा पांढरेशुभ्र ढग सुमारे १,६०० किलोमीटर लांबीपर्यंत पसरतो आणि दुपारी सूर्य डोक्यावर येताच बाष्पीभवन होऊन पूर्णपणे अदृश्य होतो. पृथ्वीवर जेव्हा पर्वत किंवा टेकड्यांवरून वारे वाहतात, तेव्हा हवेतील ओलसरपणामुळे टेकडीच्या वरच्या बाजूला ढग तयार होतात. परंतु, मंगळावरील वातावरणात पाण्याचे प्रमाण अत्यंत कमी आणि वातावरण अत्यंत विरळ असल्यामुळे तिथे अशा प्रकारचा अथांग ढग बनणे सामान्य नियमांनुसार अशक्य मानले जात होते.

संशोधकांनी स्पष्ट केले की, अर्सिया मॉन्स या महाकाय पर्वताच्या तीव्र उतारावरून जेव्हा अतिशय वेगवान वारे वरच्या दिशेने ढकलले जातात, तेव्हा तिथे वातावरणाचा दाब अचानक प्रचंड घसरतो. या प्रक्रियेमुळे अत्यंत कमी दाबाच्या स्थितीत वातावरणातील सूक्ष्म बाष्पाचे रूपांतर थेट बर्फाच्या कणांमध्ये होते.

पृथ्वीवर सहसा पाहायला न मिळणाऱ्या या अत्यंत टोकाच्या आणि वैशिष्ट्यपूर्ण भौतिकशास्त्रीय प्रक्रियेमुळे हा महाकाय बर्फाळ ढग तयार होतो आणि उन्हाची तीव्रतेनुसार लगेच विरघळून जातो.

मंगळावरील या अनोख्या हवामान चक्रामुळे खगोलशास्त्रज्ञांना इतर ग्रहांवरील वातावरण आणि तेथील भौतिकशास्त्राचे नियम समजून घेण्यासाठी एक नवीन दिशा मिळाली आहे.

# प्रेम, जिव्हाळा आणि गप्पा

नाना आमच्यासाठी केवळ एक मोठे अभिनेते नव्हते. ते आमच्या कुटुंबातले एक जिव्हाळ्याचे माणूस होते. काही नाती रक्ताची नसतात, तरीही ती रक्ताच्या नात्यांपेक्षा अधिक घट्ट असतात. नानांशी आमचं नातं असंच काहीसं होतं. आमच्या आनंदात ते मनापासून सहभागी व्हायचे आणि गरज पडली की कुठलाही गाजावाजा न करता मदतीचा हात पुढे करायचे. त्यांनी आमच्यासाठी अनेकदा काही केलं, पण त्याची कधीच वाच्यता केली नाही. दिलेल्या मदतीपेक्षा ती कोणाला कळू नये, याचीच त्यांना अधिक काळजी असायची. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला हा साधेपणा मला नेहमीच भावायचा.

'प्रकाश आमटे-द रिअल हिरो'च्या शूटिंगसाठी नाना जवळपास महिनाभर हेमलकसात होते. आमच्यात इतके मिसळून गेले होते की, ते आमच्याकडे आले आहेत, हा विचारही मनात यायचा नाही. ते आमच्यातलेच एक आहेत, अशी सहज भावना होती. दिवसभराचं शूटिंग संपायचं आणि संध्याकाळी शेकोटी पेटायची. आम्ही सगळे शेकोटीभोवती बसायचो. नाना आमच्यासोबत गप्पा मारायचे. त्या गप्पांमध्ये ना त्यांच्या मोठेपणाचा आव होता, ना स्वतःच्या प्रसिद्धीचा उल्लेख. ते अगदी साधेपणाने, मन मोकळं करून बोलायचे. कधी हसायचे, कधी एखादी आठवण सांगायचे. त्या क्षणी समोर बसलेला माणूस देशभर गाजलेला अभिनेता आहे, हे अक्षरशः विसरायला व्हायचं. एवढं मोठं यश मिळूनही मनात किंचितही गर्व नाही, प्रसिद्धी असूनही वागण्यात कोणताही दुरावा नाही आणि मोठा कलाकार असूनही माणूस म्हणून मात्र अगदी साधा, निर्मळ आणि हळवा. चंद्रपूरला एका नाटकाच्या प्रयोगासाठी नाना आले होते. त्यावेळी त्यांनी आनंदवनला भेट दिली. बाबांच्या कामाचा त्यांच्यावर इतका प्रभाव पडला की, 'मी आनंदवनमध्येच राहून सामाजिक काम करावं,' अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली होती. मात्र, बाबांनी त्यांना 'तुमचं टॅलेंट वेगळ्या क्षेत्रात आहे. तुम्ही तिथेच चांगलं काम करा,' असा सल्ला दिला. नानांनी तो सल्ला मनापासून स्वीकारला. पुढे त्यांनी अभिनयाच्या क्षेत्रात जे स्थान निर्माण केलं, ते आपण सगळ्यांनी पाहिलं. पण, बाबांनी त्यावेळी दिलेल्या सल्ल्याचं महत्त्व नाना कधीच विसरले नाहीत. बाबांविषयी त्यांच्या मनात कायमच एक खोल आदर आणि कृतज्ञता होती. पडद्यावर त्यांनी माझी भूमिका साकारली, ही माझ्यासाठी नक्कीच अभिमानाची आणि भावुक करणारी गोष्ट आहे. पण, त्यांनी केवळ एक भूमिका साकारली नाही; आमच्या कामाशी, आमच्या माणसांशी त्यांनी मनापासून नातं जोडलं.

नानांच्या जाण्याची बातमी कळली, तेव्हा माझ्या मनाने ती स्वीकारलीच नाही. वाटलं, ही अफवा असेल. नाना असे अचानक कसे जाऊ शकतात? पण हळूहळू वास्तव समोर येत गेलं...

# फ्रान्समध्ये विद्यार्थ्यांचा उद्रेक का झाला?

आंदोलक व्यवस्थेला एक आरसा दाखवत आहेत. त्या आरशात त्यांना स्वतःचे भविष्य दिसत आहे. आणि ते भविष्य सुरक्षित आहे की असुरक्षित हाच प्रश्न ते सरकारला विचारत आहेत.

फ्रान्स हा जगातील प्रगत, लोकशाहीवादी आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक देश म्हणून ओळखला जातो. शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक सुरक्षा आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांबाबत फ्रान्सने जगासमोर अनेक आदर्श निर्माण केले आहेत. मात्र आज याच फ्रान्समध्ये वर्गखोल्यांमधून असंतोषाचा आवाज रस्त्यावर पोहोचला आहे. विद्यार्थी आंदोलनाच्या निमित्ताने उभा राहिलेला हा प्रश्न केवळ शिक्षकांची कमतरता, शाळांच्या जीर्ण इमारती किंवा सरकारी निधीपुरता मर्यादित नाही. तो एका संपूर्ण पिढीच्या भविष्याविषयीच्या चिंतेचा आणि व्यवस्थेवरील कमी होत चाललेल्या विश्वासाचा आरसा आहे.

६ ऑक्टोबरला फ्रान्समधील ४० हून अधिक शहरांमध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक, विद्यापीठीय तरुण आणि कामगार संघटनांचे सदस्य रस्त्यावर उतरले. सरकारी आकडेवारीनुसार सुमारे २.५ लाखांहून अधिक लोक सहभागी झाले, तर आंदोलकांचा दावा त्याहून मोठा आहे. या आंदोलनाची सुरुवात पॅरिसच्या उपनगरातील एका शाळेत शिक्षकांच्या रिक्त जागा आणि अपुऱ्या साधनसामग्रीविरोधात झालेल्या निदर्शनांपासून झाली. काही दिवसांतच त्याचे रूप राष्ट्रीय आंदोलनात झाले. देशातील सुमारे ३,७०० उच्च माध्यमिक शाळांपैकी मोठ्या संख्येने शाळा बंद किंवा आंदोलनामुळे बाधित झाल्या. विद्यार्थ्यांच्या मागण्या वरकरणी साध्या वाटतात. रिक्त शिक्षक पदे भरावीत, अनुपस्थित शिक्षकांच्या जागी पर्यायी शिक्षक उपलब्ध करून द्यावेत, वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या कमी करावी, जीर्ण शाळांची दुरुस्ती करावी आणि शिक्षणाची गुणवत्ता सुधारावी. मात्र या मागण्यांच्या पाठीमागे एक मोठा आणि अस्वस्थ करणारा प्रश्न आहे. 'आमच्या भविष्याचे काय?' हा प्रश्न समजून घेणे महत्त्वाचे आहे.

कारण आजचा विद्यार्थी ज्या जगात मोठा होत आहे ते जग त्याच्या पालकांच्या पिढीपेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे रोजगाराचे स्वरूप बदलत आहे. हवामान बदलामुळे भविष्यातील जीवनमानासमोर गंभीर आव्हाने उभी



आहेत. महागाई आणि घरांच्या वाढत्या किंमतींमुळे मध्यमवर्गावर आर्थिक दबाव वाढत आहे. उच्च शिक्षणात प्रवेश मिळविण्याची स्पर्धा तीव्र होत आहे आणि पदवी मिळाल्यानंतरही रोजगाराची हमी राहिलेली नाही. अशा परिस्थितीत शाळा ही विद्यार्थ्यांसाठी आशेची, संधीची आणि सुरक्षिततेची जागा असायला हवी. परंतु शाळाच जर अपुऱ्या सुविधा, शिक्षकांची कमतरता आणि असमान संधींचे प्रतीक बनू लागली, तर विद्यार्थ्यांच्या मनात असंतोष निर्माण होणारच. फ्रान्समधील आंदोलनाची खरी गंभीरता याच ठिकाणी आहे.काही शाळांमध्ये गळणारी छपरे, खराब स्वच्छतागृहे, अपुरी साधने, उष्णतेच्या काळात असह्य होणाऱ्या वर्गखोल्या आणि शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे रद्द होणारे तास यासारख्या समस्या आहेत. वर्गांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागातील शाळांना या अडचणींचा अधिक सामना करावा लागतो. म्हणजेच शिक्षणव्यवस्थेतील समस्या केवळ गुणवत्तेच्या नाहीत; त्या सामाजिक विषमतेच्याही आहेत. शिक्षण हे सामाजिक समतेचे सर्वांत प्रभावी साधन मानले जाते.

विद्यार्थ्यांच्या अस्वस्थतेला केवळ 'तरुणाईचा उतावळेपणा' म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. इतिहास सांगतो की, विद्यार्थ्यांची आंदोलने अनेकदा समाजातील खोलवरचे बदल सूचित करतात. १९६८ मधील फ्रान्सचे विद्यार्थी आंदोलन हे त्याचे प्रसिद्ध उदाहरण. त्या काळात तरुणांनी केवळ विद्यापीठातील प्रश्न मांडले नव्हते; त्यांनी संपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. आजची परिस्थिती वेगळी असली तरी तरुणांच्या अस्वस्थतेत एक समान धागा आहे. स्थापित व्यवस्थेने त्यांचे भविष्य ठरवू नये; त्यांना स्वतःचे भविष्य घडविण्याची संधी द्यावी.मात्र आजच्या फ्रान्समधील आंदोलनाचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना मिळणारा व्यापक सामाजिक पाठिंबा. शिक्षक, पालक आणि कामगार संघटना त्यांच्या मागण्यांच्या समर्थनार्थ पुढे आल्या आहेत.

# फुप्फुसाचा कॅन्सर वेळेत कसा ओळखायचा?

भारतात फुप्फुसाच्या कॅन्सरमुळे हजारो लोकांचा मृत्यू होत आहे. देशात इतर कॅन्सरच्या प्रमाणात फुप्फुसाच्या कॅन्सरमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण सर्वाधिक आहे. २०२४ मध्ये या कॅन्सरमुळे ९८ हजारांपेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे, कॅन्सरच्या निदानासाठी सरकारी पातळीवर नियमित स्क्रीनिंग केले जात नाही.

२०२४ मध्ये भारतात फुप्फुसाच्या कॅन्सरमुळे ९८,६८७ मृत्यू झाले. २०२२ मध्ये या कॅन्सरमुळे ७५,०३१ मृत्यू झाले होते. त्यावेळी कॅन्सरमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या क्रमवारीत फुप्फुसाचा कॅन्सर चौथ्या क्रमांकावर होता.

फुप्फुसाचा कॅन्सर हा उपचारासाठी तुलनेने कठीण असलेल्या कॅन्सरपैकी एक आहे. मात्र, मृत्यूंचे प्रमाण वाढण्यामागे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. बहुतांश रुग्ण आजार बळावल्यानंतर रुग्णालयात पोहोचतात. तोपर्यंत कॅन्सर शेवटच्या टप्प्यात गेलेला असतो आणि उपचारानंतर जगण्याची शक्यताही लक्षणीयरीत्या कमी होते. अशा परिस्थितीत आजाराचे लवकर निदान करण्यासाठी स्क्रीनिंग महत्त्वाची ठरू शकते. मात्र, सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्रांवरील कॅन्सर स्क्रीनिंग कार्यक्रमात फुप्फुसाच्या कॅन्सरचा समावेश नाही. या कार्यक्रमात स्तन, तोंडाचा आणि गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर यांची स्क्रीनिंग केली जाते.

मग फुप्फुसाच्या कॅन्सरची स्क्रीनिंग का केली जात नाही? स्क्रीनिंग सुरू करण्यामध्ये नेमकी कोणती आव्हाने आहेत? फुप्फुसाच्या कॅन्सरचे निदान उशिरा होण्याचा प्रश्न आणि त्यामागची कारणे समजून घेऊया

**फुप्फुसाच्या कॅन्सरची स्क्रीनिंग का गरजेची आहे?**

२०२२ ते २०२४ या काळात भारतात फुप्फुसाच्या कॅन्सरच्या रुग्णांची संख्या ८१,७४८ वरून १.१२ लाखांपर्यंत वाढली. एकूण कॅन्सर रुग्णांमधील त्याचे प्रमाणही ५.८ टक्क्यांवरून ७.२ टक्क्यांपर्यंत पोहोचले, त्यामुळे फुप्फुसाचा कॅन्सर नव्या रुग्णांच्या संख्येच्या बाबतीत चौथ्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.

या काळात फुप्फुसाच्या कॅन्सरमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाणही वाढले आहे. २०२२ मध्ये कॅन्सरमुळे झालेल्या एकूण मृत्यूंपैकी ८.२ टक्के मृत्यू फुप्फुसाच्या कॅन्सरमुळे झाले होते. २०२४ मध्ये हे प्रमाण वाढून १०.९ टक्के झाले. जागतिक आरोग्य संघटनेच्या इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर यांच्या ग्लोबल कॅन्सर ऑब्झर्व्हेटरीकडून ही धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे.

या आकडेवारीवरून या कॅन्सरचे गांभीर्य लक्षात येऊ शकते, त्यामुळे प्राथमिक टप्प्यांमध्ये स्क्रीनिंग अतिमहत्त्वाची ठरते. फुप्फुसाच्या



कॅन्सरचे लवकर निदान आणि वेळेत उपचार घेण्यासाठी नियमित स्क्रीनिंग होणे गरजेचे आहे.

फुप्फुसाच्या कॅन्सरची वेळेवर स्क्रीनिंग न झाल्याने कॅन्सरचे निदान खूप उशिरा होते. परिणामी रुग्ण डॉक्टरांकडे पोहोचेपर्यंत कॅन्सर शरीरात बराच पसरलेला असू शकतो. डॉ. अभिषेक शंकर यांनी सांगितले की, सुमारे ९३ टक्के रुग्णांमध्ये फुप्फुसाच्या कॅन्सरचे निदान प्रगत टप्प्यात होते. सप्टेंबरमध्ये ँण् ने फुप्फुसाच्या कॅन्सरच्या स्क्रीनिंगवर प्रसिद्ध केलेल्या लेखाच्या लेखकांपैकी ते एक आहेत.

याचा जगण्याच्या कालावधीवर थेट परिणाम होतो. फुप्फुसाच्या कॅन्सरचे शेवटच्या टप्प्यांत निदान झाल्यास रुग्ण कमी काळासाठी जगू शकतात. पाच वर्षे रुग्ण जिवंत राहण्याची शक्यता फक्त ७ ते १८ टक्के इतकीच असते. याउलट, आजार पहिल्याच टप्प्यात समोर आला तर जगण्याची शक्यता ८० टक्क्यांपर्यंत वाढू शकते. यासाठी लो-डोस कॉम्प्युटेड टोमोग्राफीचा उपयोग होऊ शकतो. या तपासणीमुळे फुप्फुसातील कॅन्सर लवकर शोधता येतो आणि त्यावर सुरुवातीच्या टप्प्यातच उपचार करता येतात. त्यामुळे कॅन्सरमुळे होणारे मृत्यू रोखण्यास मदत होऊ शकते, त्यामुळे सरकारी रुग्णालयांसोबतच खाजगी रुग्णालये आणि वैद्यकीय संस्थांनीही अशी स्क्रीनिंग उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा, असे डॉ. शंकर यांनी नमूद केले.

**भारतातील फुप्फुसाच्या कॅन्सरच्या स्क्रीनिंगसमोरील आव्हाने**

**स्क्रीनिंगचा खर्च :** भारतासारख्या मर्यादित संसाधने असलेल्या देशात फुप्फुसाच्या कॅन्सरची स्क्रीनिंग ही खर्चिक बाब आहे. सध्या स्तन, तोंडाचा आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरचे निदान करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर ज्या तपासण्या केल्या जातात, त्या तुलनेने स्वस्त आणि सोप्या आहेत. स्तनाच्या कॅन्सरसाठी क्लिनिकल तपासणी, तोंडाच्या कॅन्सरसाठी तोंडाची दृश्य तपासणी, तर गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरसाठी अ?सिटिक अ?सिडच्या मदतीने तपासणी केली जाते. यामध्ये संशयास्पद काही आढळल्यास रुग्णाला पुढील तपासणीसाठी मोठ्या रुग्णालयात पाठवले जाते.

फुप्फुसाच्या कॅन्सरसाठी मात्र लो-डोस कॉम्प्युटेड टोमोग्राफी करावी लागते. ही तपासणी इतर तीन कॅन्सरच्या स्क्रीनिंगच्या तुलनेत खूप खर्चिक आहे, त्यामुळे सरकारी स्क्रीनिंग कार्यक्रमात एलडीसीटीचा समावेश करून मोठ्या प्रमाणावर तपासण्या सुरू केल्यास सरकारच्या तिजोरीवर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. यामुळे फुप्फुसाच्या कॅन्सरची स्क्रीनिंग सुरू करण्यापुढे खर्च हा महत्त्वाचा अडथळा आहे.

मात्र, इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च च्या एका अभ्यासानुसार, एलडीसीटीची तपासणी इतर पर्यायांच्या तुलनेत खर्चिक असली तरी तिच्यामुळे आरोग्याला होणारा फायदा अधिक आहे, त्यामुळे फुप्फुसाच्या कॅन्सरग्रस्तांसाठी एलडीसीटी तपासणी परिणामकारक ठरू शकते, असे या अभ्यासात नमूद करण्यात आले आहे, त्यामुळे राष्ट्रीय कॅन्सर स्क्रीनिंग कार्यक्रमात एलडीसीटीचा समावेश करण्याचा विचार करायला हवा असे संशोधकांनी म्हटले आहे.

**एलडीसीटीची उपलब्धता :** फुप्फुसाच्या कॅन्सरच्या स्क्रीनिंगसमोरील आणखी एक मोठे आव्हान म्हणजे सीटीस्कॅन मशीनची उपलब्धता. प्राथमिक आरोग्य केंद्रांवर ही तपासणी करता येत नाही, त्यामुळे कोणतीही लक्षणे नसतानाही केवळ स्क्रीनिंगसाठी रुग्णांना मोठ्या आरोग्य केंद्रात जावे लागेल. शिवाय ज्या रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅन मशीन उपलब्ध आहे, तिथेही एलडीसीटी स्क्रीनिंगचा सल्ला दिला जात नाही. डॉक्टरांना कॅन्सरचा संशय आल्यानंतरच ही तपासणी केली जाते.

**जोखीम असलेल्या लोकांची ओळख :** पाश्चात्त्य देशांच्या तुलनेत भारतातील फुप्फुसाच्या कॅन्सरचे चित्र काहीसे वेगळे आहे. भारतात धूम्रपान न करणाऱ्यांमध्येही फुप्फुसाचा कॅन्सर आढळून येतो. सध्या जगभरात वापरल्या जाणाऱ्या स्क्रीनिंगच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ५० ते ८० वर्षे वयोगटातील आणि किमान २० वर्षे दररोज एक पाकीट सिगारेट ओढलेल्या व्यक्तींनाच एलडीसीटी स्क्रीनिंग करण्याची शिफारस केली जाते. भारतातील अनेक लोक या निकषांतून वगळले जातात.

**भारतातील क्षयरोगाचे प्रमाण :** भारतामध्ये क्षयरोगाचे प्रमाण जास्त असल्याने एलडीसीटी स्क्रीनिंगमध्ये चुकीचे पॉझिटिव्ह निकाल येण्याचे प्रमाण वाढू शकते आणि त्यामुळे अनावश्यक तपासण्या कराव्या लागू शकतात. मात्र, २०२१ मध्ये मुंबईत झालेल्या एका प्रायोगिक अभ्यासात याचे वेगळे चित्र दिसून आले. क्षयरोगाचे प्रमाण जास्त असलेल्या देशातही एलडीसीटीच्या मदतीने फुप्फुसातील कॅन्सरच्या गाठी लवकर शोधता येतात आणि त्यामुळे जीव वाचू शकतात, असे या अभ्यासात आढळले. एम्सच्या डॉक्टरांच्या अभ्यासातही क्षयरोगाचे जास्त प्रमाण असल्यास ते फुप्फुसाच्या कॅन्सरच्या स्क्रीनिंगमध्ये अडथळा ठरत नसल्याचे दिसून आले.

केवळ धूम्रपान करणाऱ्या लोकांची कॅन्सरची स्क्रीनिंग करावी का? तर नाही. 'भारतात कॅन्सरची जोखीम ठरवण्यासाठी हे पुरेसे ठरणार नाही. कारण वर नमूद केल्याप्रमाणे, भारतात धूम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुप्फुसाचा कॅन्सर मोठ्या प्रमाणात आढळतो. तज्ज्ञांच्या मते, बीडीचे सेवन, इतरांच्या धूम्रपानामुळे होणारा धूर, बायोमास इंधन, धूर आणि घरातील प्रदूषणाच्या संपर्कात असलेल्या लोकांनाही फुप्फुसांचा कॅन्सर होतो, ते उच्च जोखीम गटात

# हात सुन्न पडताहेत?

हाताचा सुन्नपणा सतत टिकून राहत असेल, वस्तू धरताना हात थरथरत असेल किंवा मानेला कोणतीही दुखापत झाल्यानंतर हा त्रास सुरू झाला असेल, तर मज्जारोगतज्ज्ञांकडून तपासणी करून घेणे गरजेचे आहे. बहुतांश प्रकरणांमध्ये ही समस्या केवळ औषधोपचार, योग्य फिजिओथेरपी आणि दैनंदिन सवयींमधील बदलांद्वारे शस्त्रक्रियेविना पूर्णपणे बरी होऊ शकते. सकाळी उठल्यावर अचानक हात बधीर झालेला असणे, तळहाताला मुंग्या येणे किंवा हात काही वेळासाठी सुन्न पडणे असा अनुभव अनेक व्यक्तींना आयुष्यात कधी ना कधी नक्कीच येतो. सहसा झोपताना हातावर शरीराचा भार पडल्यामुळे किंवा अयोग्य स्थितीत झोपल्यामुळे मज्जातंतूंवर काही काळ ताण येतो. त्यामुळे उद्भवणारा हा बधीरपणा काही मिनिटांतच सुटतो आणि हात पूर्ववत होतो. परंतु, हीच समस्या जर रोजची झाली असेल, वारंवार पुनरावृत्ती होत असेल किंवा सुन्नपणा बराच वेळ टिकून राहत असेल, तर या समस्येकडे साधेपणाने पाहून दुर्लक्ष करणे आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते. सतत राहणाऱ्या या सुन्नपणामागे 'सर्व्हायकल रेडिक्युलोपॅथी' ही वैद्यकीय स्थिती असण्याची शक्यता अधिक असते. या विकारामध्ये मानेच्या मणक्यामधून जाणाऱ्या मज्जातंतूंच्या मूळ भागावर दाब येतो किंवा तिथे दाह निर्माण होतो. मानेतील गॅप किंवा चकती निसटणे, वयोमानानुसार मणक्यात होणारे बदल अथवा मज्जातंतूंच्या मार्गातील अरुंदपणा यांमुळे ही स्थिती निर्माण होते. मानेतील मज्जातंतू थेट खांदे, हात आणि हाताच्या बोटांपर्यंत विस्तारलेले असतात. त्यामुळे मानेमध्ये मज्जातंतू दाबले गेले की त्याची लक्षणे मानेपुरती मर्यादित न राहता थेट हाताच्या टोकापर्यंत पसरतात.



या आजारात मान आणि खांद्यामध्ये सुरू झालेली वेदना हातात तीव्रतेने पसरते. हाताच्या बोटांमध्ये सतत सुया टोचल्यासारख्या मुंग्या येणे, जळजळ होणे किंवा विजेचा तीव्र झटका बसल्यासारखी अचानक वेदना होणे ही याची प्राथमिक लक्षणे असतात. काही रुग्णांमध्ये हाताची पकड अत्यंत कमकुवत होते, ज्यामुळे साध्या वस्तू हातात धरताना किंवा उचलताना त्रास होतो. विशेष म्हणजे या विकारात प्रत्येक वेळी मानेत तीव्र वेदना असावीच असे मुळीच नाही. अनेकदा मानेत कोणतीही वेदना न होता केवळ हातात मुंग्या येणे, सुन्नपणा आणि अशक्तपणा हीच प्रमुख लक्षणे म्हणून समोर येतात.

आधुनिक जीवनशैलीत लॅपटॉपवर सतत काम करणे किंवा तासनतास मोबाईल स्क्रीनकडे खाली मान घालून पाहणे यामुळे मानेच्या स्नायूंवर प्रचंड ताण येतो. परंतु, केवळ अयोग्य बसण्याच्या पद्धतीमुळेच हा बधीरपणा येतो असे समजून वैद्यकीय तपासणी न करणे चुकीचे ठरते. हातातील बधीरपणाकडे त्वरित लक्ष देणे का आवश्यक आहे, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. जर हाताला अचानक सुन्नपणा आला असेल आणि त्यासोबतच चेहरा एका बाजूला झुकणे, बोलताना अडखळणे, मानसिक गोंधळ किंवा शरीराची एक पूर्ण बाजू कमकुवत होणे अशी लक्षणे दिसत असतील, तर हा स्ट्रोकचा म्हणजेच पक्षाघाताचा थेट इशारा असू शकतो. बधीरपणासोबत छातीत प्रचंड दाब, श्वास घेताना त्रास होणे, अचानक खूप घाम येणे अथवा मळमळणे अशी लक्षणे आढळल्यास तो हृदयविकाराचा झटका असू शकतो. अशा वेळी अजिबात वेळ न दवडता तातडीने आपत्कालीन वैद्यकीय मदत घेतली पाहिजे. हाताचा सुन्नपणा सतत टिकून राहत असेल, वस्तू धरताना हात थरथरत असेल किंवा मानेला कोणतीही दुखापत झाल्यानंतर हा त्रास सुरू झाला असेल, तर मज्जारोगतज्ज्ञांकडून तपासणी करून घेणे गरजेचे आहे. बहुतांश प्रकरणांमध्ये ही समस्या केवळ औषधोपचार, योग्य फिजिओथेरपी आणि दैनंदिन सवयींमधील बदलांद्वारे शस्त्रक्रियेविना पूर्णपणे बरी होऊ शकते.

# अंगदुखीवर पेनकिलर घेताय?



एखाद्या रुग्णाचा वैद्यकीय अहवाल पाहून जेव्हा हे स्पष्ट होते की, केवळ एका चुकीच्या सवयीमुळे त्याचे आयुष्य कायमचे बदलले आहे, तेव्हा एका नेफ्रोलॉजिस्ट (मूत्रपिंड विकारतज्ज्ञ) म्हणून तो प्रसंग अत्यंत वेदनादायी असतो. तिरुवन्नमलाई येथील ४९ वर्षीय शेतकरी 'श्री एस' जेव्हा दवाखान्यात आले, तेव्हा असाच प्रकार समोर आला. त्यांना सतत थकवा, मळमळ, उलट्या, श्वास घेण्यास त्रास आणि पायांना सूज येण्याची समस्या होती. थोड्या उपचारांनी बरे होऊन पुन्हा शेतात कामाला जाता येईल अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु, त्यांच्या रक्ताच्या चाचणीचे अहवाल अत्यंत चिंताजनक आले. त्यांच्या रक्तातील 'क्रिएटीनीन'चे प्रमाण ११.४ स्ु/्थ् वर पोहोचले होते (सामान्यतः हे प्रमाण १.२ स्ु/्थ् च्या आसपास असावे लागते). सोनोग्राफी अहवालात दोन्ही किडन्यांचे आकारमान लहान झाल्याचे आणि त्या गंभीररीत्या खराब झाल्याचे दिसून आले. किडन्या निकामी होण्याच्या शेवटच्या टप्प्यावर रुग्ण पोहोचला होता आणि त्यांना तातडीने डायलिसिस सुरू करण्याची गरज होती.

विशेष म्हणजे, त्यांना मधुमेह किंवा उच्च रक्तदाबाचा कोणताही इतिहास नव्हता—जे सहसा किडन्या खराब होण्यास कारणीभूत ठरतात. यामुळे डॉक्टरांनी त्यांच्या रोजच्या रुटीनची अधिक चौकशी केली. तेव्हा त्यांनी खिशातून एका वेदनाशामक गोळ्यांची उघडी पट्टी बाहेर काढली, ज्याला ते स्थानिक भाषेत 'वली माथिराई' म्हणायचे. शेतातील शारीरिक कष्टाच्या कामातून होणारा त्रास सहन करण्यासाठी श्री एस गेल्या ५ वर्षांपासून या गोळ्या घेत होते. कडक उन्हात १०-१० तास भात लावणीचे काम करताना त्यांना प्रचंड घाम यायचा, शरीरातील पाणी कमी व्हायचे (डिहायड्रेशन) आणि पाठीत व अंगात तीव्र वेदना व्हायच्या. अशा वेळी विश्रांती घेणे किंवा डॉक्टरांचा सल्ला घेण्याऐवजी ते स्थानिक मेडिकलमधून स्वतःच पेनकिलर्स विकत घेऊन खायचे. या गोळ्यांमध्ये 'डाइक्लोफेनाक' वेदनाशामक औषधे मुळात पूर्णपणे घातक नसतात. मात्र, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय, प्रमाणाबाहेर आणि सतत वापर केल्यास—विशेषतः शरीरात पाण्याचे प्रमाण कमी असताना—ती किडन्यांवर गंभीर परिणाम करतात. आपल्या किडन्या शरीरातील रक्त शुद्ध करण्याचे, टाकाऊ पदार्थ व अतिरिक्त द्रव बाहेर टाकण्याचे काम करतात. यासाठी किडन्यांना सतत रक्ताचा सुरळीत पुरवठा आवश्यक असतो. जेव्हा शरीरात पाण्याचे प्रमाण कमी होते, तेव्हा किडन्यांना होणारा रक्तपुरवठा टिकवून ठेवण्यासाठी शरीरात एक नैसर्गिक संरक्षक यंत्रणा कार्य करते.

# सतत भूक लागतेय?

सकाळी भरपेट नाश्ता केला, तरी तासाभराने काहीतरी खावेसे वाटते. दुपारचे जेवण झाल्यानंतरही संध्याकाळच्या आधीच भुकेची जाणीव होते. काही जणांना तर दिवसभर थोड्या-थोड्या वेळाने खाण्याची इच्छा होत राहते. अधूनमधून असे होणे स्वाभाविक आहे; मात्र पुरेसे जेवूनही सतत भूक लागत असेल, तर आपण किती खातो यापेक्षा काय खातो, किती झोपतो आणि दिवसभरातील आपली दिनचर्या कशी आहे, हे पाहणे गरजेचे ठरते. जेवल्यानंतर काही तासांनी भूक लागणे ही शरीराची स्वाभाविक प्रक्रिया आहे; मात्र पोटभर जेवल्यानंतरही सतत काहीतरी खावेसे वाटणे, दिवसभर वारंवार खाण्याची इच्छा होणे किंवा नेहमीपेक्षा अचानक भूक वाढणे यामागे केवळ कमी खाणे हेच कारण असेल असे नाही. आहाराची रचना, अपुरी झोप, शरीरातील पाण्याची कमतरता, तणाव आणि काही आजारही भूक वाढवू शकतात.



**जेवण पोटभर, तरी समाधान नाही?**

जेवणात प्रथिने आणि तंतुमय पदार्थ कमी असतील, तर पोट भरल्याची भावना फार काळ टिकत नाही. पांढरा ब्रेड, मैद्याचे पदार्थ, बिस्किटे, मिठाई किंवा इतर रिफाईंड कार्बोहायड्रेट्सवर भर असल्यास काही वेळात पुन्हा भूक लागू शकते. डाळी, कडधान्ये, अंडी, पनीर, दही, भाज्या, फळे, संपूर्ण धान्य आणि सुका मेवा यांचा योग्य समावेश केल्यास जेवण अधिक संतुलित होते आणि तृप्ती अधिक काळ टिकण्यास मदत होते.

झोप आणि भूक यांचाही जवळचा संबंध आहे. नियमितपणे अपुरी झोप घेतल्यास भूक नियंत्रित करणाऱ्या शरीरातील प्रक्रियांवर परिणाम होऊ शकतो. अशावेळी दिवसभर अधिक खाण्याची इच्छा निर्माण होऊ शकते आणि विशेषतः जास्त उष्मांक असलेल्या पदार्थांकडे ओढ वाढू शकते.

**तहान की भूक?**

काही वेळा शरीराला पाण्याची गरज असताना आपल्याला भूक लागल्यासारखे वाटू शकते. विशेषतः उन्हाळ्यात किंवा व्यायामानंतर असे घडण्याची शक्यता असते. दोन जेवणांच्या मध्ये अचानक काहीतरी खावेसे वाटल्यास थोडे पाणी पिऊन काही वेळ थांबता येईल; मात्र खरी भूक लागली असेल, तर केवळ पाणी पिऊन ती दाबणे योग्य नाही.

तणावाचाही खाण्याच्या सवयींवर परिणाम होतो. मानसिक ताण, चिंता, कंटाळा किंवा भावनिक अस्वस्थतेच्या काळात प्रत्यक्ष भूक नसतानाही खाण्याची इच्छा निर्माण होऊ शकते. दुसरीकडे, व्यायाम किंवा शारीरिक श्रम वाढले असतील आणि त्या प्रमाणात आहारातून ऊर्जा मिळत नसेल, तर वारंवार लागणारी भूक ही शरीराची खरी गरज असू शकते.

**वाढलेली भूक कधी गंभीर?**

सतत आणि असामान्य प्रमाणात भूक लागण्यामागे मधुमेह किंवा अतिसक्रिय थायरॉईडसारखी वैद्यकीय कारणेही असू शकतात. काही औषधांमुळेही भूक वाढू शकते. वाढलेल्या भुकेसोबत कारण नसताना वजन कमी होणे, खूप तहान लागणे, वारंवार लघवी होणे, थकवा, धडधड, जास्त घाम येणे किंवा हात थरथरणे अशी लक्षणे दिसत असतील, तर वैद्यकीय तपासणी आवश्यक आहे. त्यामुळे सततची भूक ही केवळ खाण्याची सवय समजून दुर्लक्ष करण्यापेक्षा तिच्यामागचे कारण शोधणे महत्त्वाचे ठरते.

# चुकीच्या वेळी प्यायल्यात तर उद्भवतील 'या' समस्या

चहा प्रेमींसाठी दिवसाची सुरुवात चहाच्या कपाशिवाय अपूर्णच असते. मात्र, गेल्या काही वर्षांत साध्या चहापेक्षा ग्रीन टी पिण्याकडे अनेकांचा कल वाढला आहे. वजन नियंत्रणापासून ते त्वचेचे आरोग्य सुधारण्यापर्यंत ग्रीन टीचे अनेक फायदे सांगितले जातात. यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स शरीरातील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करण्यास आणि पेशींचे नुकसान रोखण्यास मदत करू शकतात. पण तुम्हाला माहीत आहे का, ग्रीन टी पिण्याची चुकीची वेळ तुमच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करू शकते?

आहारतज्ज्ञ शालिनी अरविंद यांच्या मते, ग्रीन टीचे फायदे मिळवण्यासाठी ती योग्य वेळी आणि मर्यादित प्रमाणात पिणे महत्त्वाचे आहे. चुकीच्या वेळी ग्रीन टी प्यायल्यास ॲसिडिटी, पोटात अस्वस्थता आणि झोपेच्या समस्या जाणवू शकतात. त्यामुळे ग्रीन टी पिण्याची योग्य वेळ कोणती, त्याचे फायदे काय आणि कोणत्या लोकांनी काळजी घ्यावी, हे जाणून घेऊयाष्ठ

**ग्रीन टी शरीरासाठी फायदेशीर का ठरते?**

ग्रीन टीमध्ये कॅटेचिन्स नावाचे अँटीऑक्सिडंट्स असतात. ग्रीन टीचे संभाव्य फायदे

**१. शरीरातील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करण्यास मदत:** शरीरात फ्री रॅडिकल्सचे प्रमाण वाढल्यास पेशी आणि ऊतींचे नुकसान होऊ शकते. ग्रीन टीमधील अँटीऑक्सिडंट्स या प्रक्रियेचा प्रभाव कमी करण्यास मदत करतात.

**२. लिव्हरच्या आरोग्यासाठी उपयुक्त:** लिव्हर शरीरातील हानिकारक पदार्थांचे चयापचय आणि उत्सर्जनासाठी आवश्यक प्रक्रिया पार पाडते. ग्रीन टीमधील ंण्ड या घटकाचा लिव्हरमधील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस आणि दाह कमी करण्याच्या संभाव्य भूमिकेबाबत संशोधन सुरू आहे. मात्र, ग्रीन टी प्यायल्याने लिव्हरचे आजार बरे होतात किंवा शरीरातील सर्व विषारी पदार्थ बाहेर पडतात, असा समज चुकीचा ठरेल.

**३. त्वचेच्या आरोग्याला मिळू शकतो फायदा:** ग्रीन टीमधील पॉलीफेनॉल्स त्वचेच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून संरक्षण देण्यास मदत करू शकतात. अतिनील किरणांमुळे होणाऱ्या त्वचेच्या नुकसानीवरही या घटकांचा संभाव्य परिणाम अभ्यासला गेला आहे. तथापि, ग्रीन टी हा सनस्क्रीनचा पर्याय नाही.

**४. चयापचय प्रक्रियेला मिळू शकते चालना:** ग्रीन टीमध्ये कॅफीन कमी प्रमाणात असते. कॅटेचिन्स आणि कॅफीन यांच्या एकत्रित परिणामामुळे ऊर्जा खर्चात किंचित वाढ होऊ शकते. मात्र, केवळ ग्रीन टी पिऊन वजन झपाट्याने कमी होईल, अशी अपेक्षा ठेवू नये.

**ग्रीन टी पिण्याची चुकीची वेळ कशी ओळखाल?**

तुम्ही ग्रीन टी प्यायल्यानंतर काही त्रास जाणवत असतील, तर तिचे प्रमाण किंवा वेळ बदलण्याची गरज असू शकते.

ॲसिडिटी किंवा छातीत जळजळ: रिकाम्या पोटी ग्रीन टी प्यायल्यावर काही लोकांना पोटात जळजळ किंवा अस्वस्थता जाणवू शकते.

पोट फुगणे किंवा मळमळणे: संवेदनशील पोट असलेल्या व्यक्तींना ग्रीन टी सहन न होण्याची शक्यता असते.

अस्वस्थता किंवा हात थरथरणे: ग्रीन टीमधील कॅफीनमुळे काही लोकांना अस्वस्थ वाटू शकते. रात्री झोप न लागणे: संध्याकाळी किंवा रात्री ग्रीन टी प्यायल्यास कॅफीनमुळे झोपेवर परिणाम होऊ शकतो. डोकेदुखी: कॅफीनची संवेदनशीलता, त्याचे प्रमाण किंवा सेवनाच्या सवयींमधील बदल यांमुळे काही लोकांना डोकेदुखी जाणवू शकते. हे त्रास केवळ ग्रीन टी पिण्याच्या चुकीच्या वेळेमुळेच होतात असे नाही. त्रास वारंवार होत असल्यास तिचे सेवन थांबवून डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

ग्रीन टी पिण्याची योग्य वेळ ही तुमच्या शरीराची प्रकृती, खाण्याच्या सवयी आणि कॅफीन सहन करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असते.

# दुष्काळी दरवाढ!

बराच काळ कळ सोसल्यानंतर रिझर्व्ह बँकेने अखेर 'रेपो' दरवाढ करण्याचा निर्णय घेतला. 'रिपर्चेस' या शब्दाचे 'रेपो' हे लघुरूप. रिझर्व्ह बँक अन्य बँकांना सरकारी रोख्यांच्या तारणावर ज्या व्याज दराने कर्ज देते त्यास 'रेपो रेट' असे म्हणतात. एकदा का या व्याज दरात वाढ झाली की संबंधित सर्वच व्याज दर वाढू लागतात. पक्ष कोणताही असो आणि देशदेखील कोणताही असो. स्वत:च्या सत्ताकाळात व्याज दर वाढवलेले कोणालाच आवडत नाही. अमेरिकेत या संदर्भात अलीकडे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि तेथील मध्यवर्ती बँकेचे 'फेडरल रिझर्व्ह' (फेड) प्रमुख केविन वॉर्श यांच्यात झालेला जाहीर वाद अनेकांस आठवेल. हे वॉर्श ही ट्रम्प यांची अलीकडची नियुक्ती. त्यांचे पूर्वसुरी जेरोम पॉवेल हे ट्रम्प यांस आवडेनासे झाले. कारण 'फेड'चे प्रमुख या नात्याने पॉवेल देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी त्या पदावरील व्यक्तीने जे करणे अपेक्षित आहे ते करत होते. तसे करताना आपल्या अध्यक्षांस काय वाटते याची फिकीर त्यांनी कधी केली नाही. त्यामुळे ट्रम्प यांची त्यांच्यावर खप्पा मर्जी झाली. ते जाहीरपणे पॉवेल यांच्याविषयी वचावचा बोलत. पण पॉवेल आपल्या अध्यक्षाच्या तोंडास कधी लागले नाहीत. त्यांनी स्वत:ला हवे तेच केले. अखेर त्यांचा उत्तराधिकारी नेमण्याची संधी अध्यक्ष ट्रम्प यांस मिळाली आणि त्यांनी वॉर्श यांस या पदी आणले. तथापि या पदी आरूढ झाल्यानंतरच्या पहिल्याच संधीचे सोने या वॉर्श यांनी केले आणि ट्रम्प रागे भरत असतानाही त्यांनी व्याज दरवाढ जाहीर केली. युरोपीय मध्यवर्ती बँक, इंग्लंड अशा अनेक देशांतील बँकांसही व्याज दरवाढ करावी लागली. तीस पर्याय नव्हता.

म्हणून अखेर चार वर्षांनी का असेना आपल्या रिझर्व्ह बँकेने व्याज दरवाढीचा निर्णय घेतला. हा निर्णय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरचा एकट्याचा नसतो. या विषयावर साधक-बाधक चर्चा करून निर्णय घेण्यासाठी तज्ज्ञांची समिती असते. बँकेच्या या पतधोरण समितीच्या बैठकीत याबाबत सगळ्यांचे एकमत झाले. परिणामी संजय मल्होत्रा यांची रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून पहिली व्याज दरवाढ जाहीर झाली. हे अपरिहार्य होते. इस्रायलचे पंतप्रधान नरसंहारी नेतान्याहू यांनी इराणवर लादलेले युद्ध, त्यात अमेरिकेने अकारण घेतलेली उडी आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे या युद्धाचा शेवट काय याचा संबंधितांस कसलाही अंदाज नसणे आदी कारणांमुळे जागतिक अर्थव्यवस्था अकारण अस्थिर झालेली आहे. आखातातील या संघर्षामुळे खनिज तेलाचे दर ११५ डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत गेल्यानंतर, त्यामुळे होणारी चलनवाढ डोळ्यासमोर असताना व्याज दरवाढ न करणे हे शहामृगाने वाळूत मान खुपसून वास्तवाकडे पाठ फिरवण्यासारखे ठरले असते. रिझर्व्ह बँकेच्या स्वायत्ततेबाबत सध्या बरेच काही बोलले जात आहे. बँकेच्या लाभांशाची घसघशीत वार्षिक दक्षिणा रिझर्व्ह बँक मान खाली घालून इमाने-इतबारे केंद्राच्या हवाली करत असतेच. गेल्या काही वर्षांत रिझर्व्ह बँकेने आपल्या कमाईतील अनुक्रमे दोन लाख ६८ हजार कोटी रुपये, त्या पुढील वर्षी दोन लाख ८७ हजार कोटी रुपये इतका लाभांश केंद्राच्या झोळीत टाकला. रिझर्व्ह बँकेचे केंद्रास असे निधी पुरवणे गेल्या काही वर्षांत कसे वाढत गेले ते पुढील आकडेवारीवरून लक्षात यावे. विद्यमान सरकार सत्तेवर आल्यानंतर पहिल्या वर्षात ६५ हजार ८९६ कोटी रु. (२०१५), ६५ हजार ८७५ कोटी रु. (२०१६), ३० हजार ६५९ कोटी रु. (२०१७), ५० हजार कोटी रु. (२०१८), १ लाख ७५ हजार ९८८ कोटी रु.



(२०१९), ५७ हजार १२८ कोटी रु. (२०२०), ९९ हजार १२२ कोटी रु. (२०२१), ३० हजार ३०७ कोटी रु. (२०२२), ८७ हजार ४१६ कोटी रु. (२०२३), दोन लाख १० हजार ८७४ कोटी रु. (२०२४), दोन लाख ६८ हजार ५९० (२०२५) आणि यंदा दोन लाख ८६ हजार ५८८ कोटी रु. असा निधी रिझर्व्ह बँकेने गेल्या काही वर्षांत केंद्रास पुरवला आहे. त्यामुळे बँकेच्या इभ्रतीचा मुद्दा आहेच. त्यात व्याज दरवाढ याहीवेळी टाळली गेली असती तर बँकेच्या स्वायत्ततेबाबतच्या शंका-कुशंकास अधिक समर्थन मिळते. तो धोका टळला. स्वायत्ततेबाबत होणाऱ्या टीकेस कृतीतून उत्तर देणे हाच राजमार्ग असतो. आपली रिझर्व्ह बँक त्या मार्गाने जात आहे किंवा काय याबाबत इतक्यातच भाष्य करणे अयोग्य. पण ही चर्चा तरी आताच्या व्याज दरवाढ निर्णयाने पुढे ढकलली जाईल. आता या निर्णयाच्या परिणामांबाबत.

**बराच काळ कळ सोसल्यानंतर रिझर्व्ह बँकेने अखेर 'रेपो' दरवाढ करण्याचा निर्णय घेतला. 'रिपर्चेस' या शब्दाचे 'रेपो' हे लघुरूप. रिझर्व्ह बँक अन्य बँकांना सरकारी रोख्यांच्या तारणावर ज्या व्याज दराने कर्ज देते त्यास 'रेपो रेट' असे म्हणतात. एकदा का या व्याज दरात वाढ झाली की संबंधित सर्वच व्याज दर वाढू लागतात. पक्ष कोणताही असो आणि देशदेखील कोणताही असो. स्वत:च्या सत्ताकाळात व्याज दर वाढवलेले कोणालाच आवडत नाही.**

अशा निर्णयांचे परिणाम एक दिशी नसतात. म्हणजे निवृत्त, बँकेत जमा केलेल्या पुंजीच्या व्याजाकडे उत्पन्न म्हणून पाहणारे इत्यादींकडून या निर्णयाचे स्वागत होईल. कारण त्यांस बँकेतील ठेवींवर किंचित का असेना; पण अधिक व्याज मिळेल. त्याच वेळी या अशा ठेवींच्या दुसऱ्या बाजूस असलेले- म्हणजे बँकांकडून कर्ज घेणारे-या निर्णयाने खट्टू होतील. कारण त्यांना कर्जावर अधिक व्याज द्यावे लागेल. म्हणजे त्यांच्यासाठी पैसा अधिक महाग होईल. तूर्त ही दरवाढ पाव टक्का इतकीच आहे. पण ती करताना यापुढे रिझर्व्ह बँक 'मोजून-मापून' पावले टाकेल, असेही मल्होत्रा यांनी स्पष्ट केले. हे विधान सूचक म्हणावे असे. ते अमेरिकी वा युरोपीय वा इंग्लिश मध्यवर्ती बँक प्रमुखांइतके धडाडीचे नसेल. पण तरी त्यातून आगामी काळातही व्याज दरवाढ करण्यास रिझर्व्ह बँक कचरणार नाही, असा संदेश जातो. तो महत्त्वाचा आहे. कारण चलनवाढीचा धोका अजूनही संपलेला नाही. युद्ध संपणार कधी, परिस्थिती पूर्वपदावर येणार कधी याचा अंदाजच कोणाला नाही. ज्यांनी युद्ध सुरू केले ते त्याबाबत अनभिज्ञ आहेत आणि युद्धात ज्यांची होरपळ होत आहे त्यांनाही ते संपण्याची घाई आहे असे अजिबात दिसत नाही. त्यामुळे जग अशा विचित्र कात्रीत सापडलेले आहे. ही अशी अस्थिरता अर्थव्यवस्थेच्या मुळावर येते.

आपल्या रिझर्व्ह बँकेने चलनवाढ मर्यादा चार टक्क्यांवर निश्चित केलेली आहे. म्हणजे या मर्यादेपर्यंतची चलनवाढ काळजी निर्माण करणारी नाही. तथापि गेले तीन महिने चलनवाढीचा दर या मर्यादेपेक्षा जास्त आणि ऑगस्टमध्ये तो ४.८२ टक्के इतका राहिलेला आहे. तो लवकरच धोकादायक असा पाच टक्क्यांचा टप्पा ओलांडेल अशी चिंता रिझर्व्ह बँकच व्यक्त करते. आगामी काळात ही चलनवाढ ५.२ टक्के इतकी असेल असे आपल्या मध्यवर्ती बँकेस वाटते. ते वाटणे प्रत्यक्षात आले तर आर्थिक परिस्थिती अधिकच आव्हानात्मक होईल हे उघड आहे. त्यात पश्चिम आशियातील युद्धझळांत जग होरपळून निघत असताना भारतावर दुष्काळ-दाह सहन करण्याची वेळ आलेली आहे. देशभरात सरासरीच्या कित्येक पट कमी पाऊस पडला. त्यामुळे खरिपाची पिके तर हातातून गेल्यात जमा आहेतच; पण हा दुष्काळ रब्बीचा घासही घेतो की काय, अशी चिन्हे दिसतात.

सरकारी पातळीवर अधिकृतपणे अशी चिंता व्यक्त करण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीत सरकारी उधळपट्टीस आवर घालून उपलब्ध निधीतील पै-न-पै उत्पादक कशी होईल याचा विचार आणि तसा प्रयत्न सरकारला करावा लागेल. दुष्काळातील ही दरवाढ अशीच सुरू राहिली तर ते अर्थव्यवस्थेस आणि परिणामी राजकीय स्थैर्यासही आव्हान देणारे ठरेल.

# 'ऑक्टोबर हीट'चा तडाखा

शेतात उभ्या पिकांवर वाऱ्याची मंद झुळूक लाटां सारखी पसरावी आणि पावसाच्या निरोपानंतर निर्माण होणारी प्रसन्न शांतता जनजीवनाला सुखावून जावी, असा आश्विन महिन्यातील निसर्गाचा अलिखित नियम. परंतु यंदा ऋतूंचे हे सगळे आराखडे पार धुळीस मिळाले आहेत. मान्सूनने माघार घेताच महाराष्ट्राच्या माथ्यावर आभाळ निरभ्र झाले खरे, पण बहुतांश ठिकाणी उष्णतेच्या तीव्र झळांनी कडक उन्हाळ्यासारखे वातावरण अनुभवास येत आहे. ऋतू परिवर्तनाच्या काळात वाढलेला हा उकाडा तात्कालिक आहे की, आगामी वर्षभरात राज्याला भेडसावणाऱ्या महाभीषण पर्यावरणीय आणि जलसंकटाची वर्दी देणारा इशारा आहे, असा प्रश्न निर्माण होतो. कारण अल निनो, सुपर अल निनोच्या चर्चा. विषुववृत्तीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान जेव्हा सरासरीपेक्षा जास्त वाढते, तेव्हा वातावरणीय चक्रांमध्ये निर्माण होणाऱ्या या उष्ण स्थितीला हवामानशास्त्रात ?'अल निनो?' म्हटले जाते. हा प्रवाह संपूर्ण जगाच्या वातावरणीय अभिसरणाची चक्रे विस्कळीत करतो. यंदाच्या नैर्ऋत्य मान्सूनवर सुरुवातीपासूनच अल निनोचे दाट सावट होते. प्रशांत महासागरामधील या अतिरिक्त उष्णतेमुळे वाऱ्यांची दिशा बदलून भारतीय उपखंडावर उतरणाऱ्या कोरड्या हवेचे प्रमाण वाढले आणि पावसाचे ढग खेचून आणणारी प्रणाली कमकुवत ठरली.

आता ऑक्टोबर महिन्यात हा अल निनो अधिक तीव्र होत असल्यामुळे भूपृष्ठावरील उष्णता रात्रीच्या वेळी आकाशात उत्सर्जित होण्याची प्रक्रिया मंदावली आहे. राज्यात सरासरीच्या १९ टक्के कमी पाऊस पडला असला तरी काही भागात पर्जन्यतूट ४० टक्क्यांहून अधिक आहे. खरिपाचे बहुतांश पीक करपून गेले आहे. ज्यांच्याकडे सिंचनाची व्यवस्था आहे, त्यांच्यासाठी तापमानाचा वाढता पारा संकट ठरत आहे. 'सुपर अल निनो?'मुळे जगभरात उष्णतेचे बळी मोठ्या प्रमाणात वाढण्याचा धोका आहे. क्लायमेट इम्पॅक्ट लॅबच्या (सीआयएल) अहवालानुसार, अल निनो जूनमध्ये सुरू झाला असून, तो पुढील वसंत ऋतूपर्यंत टिकणार आहे. हवामान बदलामुळे जे तापमान २० वर्षांनंतर अपेक्षित होते, ते अल निनोमुळे अनुभवायला मिळेल, तसेच सामान्य वर्षाच्या तुलनेत अतिउष्ण दिवसांची संख्या ४४ टक्क्यांनी वाढेल. जून २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या काळात सामान्य वर्षाच्या तुलनेत सुमारे ४.५१ लाख अधिक मृत्यू होतील, असा अंदाज या अहवालात वर्तवला आहे. भारतीय हवामान विभागाने मुंबईसह महाराष्ट्राच्या काही भागातून मान्सूनने माघार घेतल्याची घोषणा केली. विशेष म्हणजे मान्सूनने नेहमीच्या तारखेच्या पाच दिवस आधीच माघार घेतली. कमी पाऊस झाल्यामुळे किमान परतीचा पाऊस तरी कसर भरून काढेल, अशी आशा होती. परंतु पदरी निराशाच पडली आहे.

नैर्ऋत्य मोसमी वारे भारतीय उपखंडातून परतीचा प्रवास सुरू करतात, तेव्हा वातावरणातील हवेचा दाब आणि वाऱ्यांची दिशा आमूलाग्र बदलते. पावसाळ्यात अरबी समुद्राकडून जमिनीकडे वाहणारे बाष्पयुक्त आणि शीतल वारे या काळात थंडावतात आणि त्यांची जागा पूर्वेकडून अथवा ईशान्येकडून वाहणाऱ्या कोरड्या, उष्ण वाऱ्यांनी घेतली जाते. आकाशातील पावसाळी ढगांचे




आच्छादन विरळ झाल्यामुळे सूर्यकिरणांना जमिनीवर पोहोचण्यापासून रोखणारा कोणताही नैसर्गिक अडथळा शिल्लक राहात नाही. थेट भूपृष्ठावर येणाऱ्या अतिलख्ख सूर्यप्रकाशामुळे जमीन वेगाने तापते. पावसाळा संपताना उरलेले बाष्प आणि वरून पडणारे हे प्रखर ऊन यांच्या संयोगातून स्थानिक पातळीवर एक प्रकारचा 'हरितगृह परिणाम?' आकारास येतो. हवेतील आर्द्रतेचे प्रमाण जास्त आणि तापमानही उच्च अशा विचित्र परिस्थितीत वातावरणात असह्य, गुदमरवून टाकणारा उकाडा निर्माण होतो. किनारपट्टीच्या प्रदेशात समुद्राचे सान्निध्य आर्द्रता टिकवून ठेवत असल्याने आणि पूर्वेकडचे उष्ण वारे त्यावर येऊन आदळत असल्याने हा त्रास अधिकच दुप्पट होतो. यंदा या नैसर्गिक प्रक्रियेने सर्व जुन्या नोंदी मोडीत काढण्याची भयानक स्पर्धा सुरू केली आहे. विदर्भ आणि खानदेशात तापमानाचा पारा वाढत असून अकोला, चंद्रपूर, अमरावती, मालेगाव, धुळे, सोलापूर आणि जळगाव या पट्ट्यात तापमान ३८ ते ३९ अंशांपर्यंत नोंदवले जात आहे. मुंबई, ठाणे आणि कोकण किनारपट्टीवर पारा ३६ ते ३७ अंशांच्या वर जाऊन आर्द्रतेमुळे जाणवणारे प्रत्यक्ष तापमान चाळिशीच्या पार गेल्याचा अनुभव नागरिक घेत आहेत. मुंबईत ऑक्टोबर महिन्यातील ऐतिहासिक उच्चांक हा ३८.६ अंशांचा आहे, तर किनारपट्टीवरील रत्नागिरीत १४३ वर्षांच्या हवामान इतिहासातील सर्वाधिक ३७.५ अंशांची नोंद ऑक्टोबरमध्ये झाली होती. यंदाचा ऑक्टोबर त्या ऐतिहासिक उच्चांकांच्या दिशेने ज्या झपाट्याने कूच करत आहे, ते पाहता हवामानाची टोकाची स्थिती किती विक्राळ रूप धारण करू शकते, याची कल्पना येते. राज्याच्या ७५ टक्के भागावर दुष्काळाची छाया असताना ऑक्टोबर हीटचे चटके ग्रामीण लोकजीवन त्रस्त करत आहेत. उरल्यासुरल्या पिकांना ऑक्टोबरचा तळपणारा सूर्य जमिनीत ओलावा नसल्यामुळे उभे जाळून टाकत आहे. ओलच शिल्लक नसल्याने रब्बीच्या पेरण्या करायच्या कशा, हा प्रश्न आहे. ज्वारी, हरभरा आणि गव्हाचे रब्बीचे क्षेत्र यंदा निम्म्याहून अधिक प्रमाणात घटण्याची चिन्हे आहेत. ग्रामीण भागात पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पाणीसाठा ऑक्टोबर महिन्यातील उष्णतेमुळे आणि दुष्काळामुळे झपाट्याने खालच्या दिशेने सरकत आहे. अल निनोचा तीव्र प्रभाव हिवाळ्यावरही जाणवणार आहे. महाराष्ट्रात नोव्हेंबरच्या मध्यापासून सुरू होणारी गुलाबी थंडी आणि डिसेंबर-जानेवारीत कडाक्याची थंडी यंदा अनुभवास येणार नाही, असे हवामानतज्ज्ञांचे म्हणणे आहे. हरभरा, गहू या रब्बी पिकांना दाणे भरण्यासाठी रात्रीच्या कडाक्याच्या थंडीची नितांत गरज असते.

**आकाशीचा चंद्र हा जगभरच्या साहित्यातला आवडता विषय. त्यामुळे आपल्या मराठीतही चंद्रावर अनेक गाणी आहेत. चंद्र आणि चंद्रकोरींचे विलोभनीय दर्शन आणि त्यावर आधारित सण हा आपल्या संस्कृतीचा अवकाशाची नातं सांगणारा भाग. फार पूर्वी 'चकाके कोरे चंद्राची' हे कवी स. अ. शुक्ल यांनी लिहिलेले गाणे गंगूबाई हनगल आणि जी. एन. जोशी यांनी गायिलं होते.**

# चकाके 'कोर' शुक्राची!

त्या काळात (किंवा आताही) शुक्राचीसुद्धा 'कोर' असते याची कल्पना सर्वसामान्यांना असणं शक्य नसतं. चंद्रकोर कशी सहज दिसणारी. त्यामुळे 'बघुनी तुला गगनात खंगते कलेकलेने चंद्रकला' अशा काव्यपंक्ती लिहिल्या गेल्या. शुक्र ग्रह मात्र काव्यात 'चांदणी' पिंवा 'तारा' झाला. स्वयंप्रकाशी नसलेला, पण त्यावरील सल्फर-कार्बनच्या दाट ढगांमुळे अधिक सूर्यप्रकाश परावर्तित करणारा शुक्र तेजाळ तारा 'वाटणं' तेव्हा साहजिक होतं. अर्थात, गॅलिलिओ यांनी दुर्बिण अवकाशाकडे रोखल्यावर १६१० पासूनच अनेक ग्रहांचं सहीसही दर्शन झालं. त्यांचं खरं रूप (फीचर्स) समजायला सुरुवात झाली आणि गेल्या शतकभरात तर जगातल्या हजारो खगोलप्रेमींच्या हाती दुर्बिणी आल्या. त्यातून ग्रह तारे न्याहाळण्याचे रात्रभराचे कार्यक्रम होऊ लागले. गेली ४० वर्षे आम्हीही ते केले. अवकाशाचा अपूर्व आनंद मिळवला.

त्यामध्ये अनेकदा शुक्राची 'कोर' पाहण्याचा योग आला. शुक्राची कला खूप मोठी (एकादशीच्या चंद्राप्रमाणे) असते. त्या वेळी त्यावरून परावर्तित होणारा सूर्यप्रकाश 'शुक्राचं चांदणं' आपल्या चेहऱ्यावर पडेल इतपत शक्तिशाली दुर्बिणीतून प्रकाशित दिसेल असं वाटेल, पण तसं नसतं. आठ ते दहा इंच व्यासाचा आरसा असलेल्या दुर्बिणीतून शुक्राची कोरच खरोखर मनोहारी दिसते. त्या सगळय़ाचं स्मरण होण्याचं कारण सध्या त्या तेजस्वी शुक्रकोरीचं दर्शन होतंय. चार-पाच दिवसांपूर्वी शुक्राची चकाकती आणि चंद्रकलेसारखीच दिसणारी कोर पाहण्याचा योग आला. संध्याकाळच्या आकाशात क्षितिजाजवळचा शुक्र स्पष्ट दिसण्याइतका आकाशाचा निरभ्र तुकडा या दिवसात क्वचितच मिळतो, पण तशी संधी मिळाली आणि चार इंची पॅसिग्रेनियन दुर्बिणीतून शुक्राची क्षीण पण तेजस्वी कोर पाहता आली.

अर्थात, त्यासाठी मुंबईपासून सत्तर-ऐंशी किलोमीटर दूर काळोख्या जागी जावं लागलं. आकाशींची 'दौलत' अनुभवायची तेवढे कष्ट आणि वेळ यांची तरतूद करण्याची 'श्रीमंती' (मनात) असावीच लागते. मग मात्र विश्व तुम्हाला विस्मयकारी रूपं दाखवतं!

आता शुक्राच्या या कला पिंवा 'फेजेस'मागचं खगोल-विज्ञान. शुक्राची कला दिसणं हा चंद्रकला दिसण्यासारखाच प्रकार आहे. मात्र तो चंद्रकोर दिसण्याइतका सहजसोपा नाही. तसा तो का नाही याचं



उत्तर मात्र सोपं आहे. चंद्र आपल्या पृथ्वीचा अवघ्या ३ लाख ८४ हजार किलोमीटर अंतरावरचा नैसर्गिक उपग्रह. शुक्र मात्र सूर्यमालेतला सूर्यापासूनच दुसरा स्वतंत्र ग्रह. आपल्या पृथ्वीचा तो आपल्या वर्तुळातला शेजारी. पृथ्वीपासूनचं त्याचं सरासरी अंतर ४ कोटी १० लाख किलोमीटर. अर्थात, ग्रहमालेतले सर्वच ग्रह सूर्याभोवती लंबवर्तुळाकार कक्षेत फिरत असल्याने ते कधी एकमेकांपासून दूर जातात, तर कधी जवळ येतात. आता हे अंतर सुमारे ३ कोटी ८४ लाख किलोमीटर आहे.

सध्या शुक्र पृथ्वीच्या 'जवळ' आहे. त्यामुळे त्याची कोर आपल्याला दिसू शकते. ती शुक्राच्या 'चतुर्थी'च्या स्वरूपातील आहे. शुक्रदर्शनाची गंमत अशी की, तो आपल्याला पूर्णपणे कधीच दिसत नाही. ठसठशीत दिसतो. तेव्हासुद्धा तो पाऊणपट पिंवा ८० टक्के दिसतो. त्याला त्याचं 'गिब्बस' रूप म्हणतात. 'गिब्बस' म्हणजे एखाद्या वर्तुळाकार वस्तूचा निम्म्यापेक्षा अधिक भाग दिसणे. शुक्र 'गिब्बस' दिसतो त्या वेळी तो पृथ्वीपासून खूप लांबच्या कक्षेत आणि सूर्यापलीकडच्या भागात असतो. आता तो जवळ असल्याने त्याची सुंदरशी 'कोर' दिसतेय.

गेल्या आठवडय़ात ती अधिक चांगली दिसली. त्यापूर्वीही अनेक ठिकाणांहून म्हणजे अभ्राच्छादित आकाश नसलेल्या ठिकाणांहून दिसली असेल, परंतु तो काळ आपल्याकडे पावसाळ्याचा होता. पाऊस खूप झाला नाही तरी क्षितिजावर सतत रेंगाळणारे ढग होतेच. परिणामी, मावळतीनंतर थोडाच काळ दिसणारी शुक्राची नाजूक कोर दिसणं शक्य नव्हतं. पाऊस कमी होताच पश्चिम क्षितिज 'क्लिअर' मिळून चंद्रप्रकाशाचा 'अडथळा' नसेल तर शुक्रकोर अधिक छान दिसते.

आपली पृथ्वीसुद्धा आपल्याला अजून नीट समजलेली नाही. ग्रहमालेतील रहस्य तर अनंत आहेत, परंतु सतत काही वर्षे अभ्यास केला तर त्यातल्या 'अमेझिंग' पिंवा विस्मयकारी गोष्टी समजून येतात.

अवकाश दर्शन अगदीच 'रुक्ष' नसतं तर ते अनेक गमती दाखवणारं असतं याची प्रचीती येते. त्यासाठी निरीक्षणाचं सातत्य मात्र हवं. त्यातही नजरेपुढे दुर्बिण असेल तर सोन्याहून पिवळे!

# कैलास-मानसरोवर, बिघडले स्वर्गाचे दार

कैलास-मानसरोवराकडे स्वर्गप्राप्तीसाठी निघालेल्या अनेक हिंदूंना दुर्दैवी मरण आले. नेपाळ-तिबेटमार्गे ते कैलासाला निघाले. पाण्याचा एक अजस्त्र लोट आला व सगळ्यांना पृथ्वीच्याच पोटात घेऊन गेला. कैलासावर भगवान शंकर आहेत. कैलास हे स्वर्गप्राप्तीचे द्वार आहे. स्वर्गाचे दार कसे बिघडले?

**दर्शन बुकिंग करा**

नेपाळ-तिबेट मार्गाने कैलास-मानसरोवराकडे निघालेल्या शेकडो श्रद्धाळूंचा दुर्दैवी अंत झाला आहे. भारतातून अनेक हिंदूंची पथके तेथे निघाली ती तिबेट सीमेवरील इमिग्रेशन सेंटरवरील पाण्याच्या तडाख्याने वाहून गेली. मुंबई-ठाण्यातील यात्रेकरू त्यात आहेत. या सगळ्यांचे अस्तित्वच संपले आहे व भारतातील त्यांचे नातेवाईक आक्रोश करीत आहेत. त्या बेपत्ता नातेवाईकांना शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. तिबेटच्या मार्गाने एक पाण्याचा अजस्त्र लोट उसळत आला व त्यात हजारो 'जीव' कायमचे वाहून गेले. नेपाळची पूर्ण 'तबाही' झाली आहे. एकेकाळच्या या हिंदू राष्ट्रातले देव, त्यांची मंदिरे हजारो भक्तांसह वाहून गेली. नेपाळच्या भूमीवरील धार्मिक शक्तिपीठे हे रौद्ररूप थांबवू शकली नाहीत. कैलासावर भगवान शंकराचे वास्तव्य आहे ही भावना आहे. त्या भगवान शंकराने पाण्याचे तांडव पाहिले, आपल्या भक्तांना गटांगळ्या खात वाहून जाताना पाहिले. भारतात मोदीछाप हिंदुत्वाचा ज्वर वाढला आहे. जे वाहून गेले त्यात काही अंधभक्त असू



शकतात. कारण कैलासावर ईश्वराचा वास आहे व तेच स्वर्गाचे द्वार आहे असे आजही अनेकांना वाटते. ते सर्व लोक स्वर्गाच्या दारातूनच दुर्दैवाने गायब झाले.

□कैलास-मानसरोवराची ओढ हिंदू मनास अनेक शतकांची आहे. पुराणे व संस्कृत काव्यांत या दोन्हींची सुंदर वर्णने केली आहेत. पृथ्वीचा मानदंड असेही कैलासला मानण्यात आले आहे. राजहंस पक्षी स्वर्गात आहे तसा तो मानसरोवरावर आहे. यामुळे या जागेचे आकर्षण अधिकच वाढले. शेकडो वर्षे या दोन्हींची यात्रा भाविक हिंदू करत आहेत, पण ही यात्रा सोपी नाही. भारतीयांना ज्या स्वर्ग शिखरावर पोहोचायचे आहे, त्याचा दरवाजा चीनच्या भूमीतून जातो. नेपाळ, तबिट, चीन व कैलास-मानसरोवर असा हा खडतर प्रवास व मग स्वग. 'चीनने बराच काळ हे स्वर्गाचे दरवाजे भारतीयांसाठी बंदच करून ठेवले. त्यामुळे अनेक वर्षे लोक स्वर्गसुखाला मुकले. १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर हा रस्ता भारतीयांसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला होता.